

# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

रजि. नं. : ई–६९, अहमदनगर

## वार्षिक अहवाल २०१३–१४

# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

पोष्ट : शिर्डी – ४२३ १०९, ता. : राहाता, जि. : अहमदनगर



# प्रशासकीय अहवाल

## सन २०१३-१४

दिनांक १ एप्रिल, २०१३ ते
दिनांक ३१ मार्च, २०१४

# अनुक्रमणिका


| अ.नं. | तपशील | पान क्रमांक |
|---|---|---|
| ०१ | प्रास्ताविक | ०१ |
| ०२ | श्री क्षेत्र शिर्डी चे महत्व व धार्मिक रुढी परंपरा | ०३ |
| ०३ | संस्थानमार्फत साजरे केले जाणारे उत्सव | ०६ |
| ०४ | व्यवस्थापन समिती, छाननी समिती, सल्लागार परिषद इ. | ०८ |
| ०५ | विश्वस्तव्यवस्थेची कर्तव्ये व अधिकार | १० |
| ०६ | प्रशासकीय कामकाज | ११ |
| ०७ | प्रशासनाची रचना | १३ |
| ०८ | भक्तमंडळ | १७ |
| ०९ | विश्वस्तव्यवस्थेमार्फत देणेत येणाऱ्या सेवा-सुविधा | १८ |
| १० | अहवाल सालातील ठळक बाबी | ३१ |
| ११ | इतर उपक्रम - रुग्णालये | ३३ |
| १२ | इतर उपक्रम - शैक्षणिक संकुल | ४१ |
| १३ | इतर उपक्रम - श्री साईलीला (व्दैमासिक) | ४५ |
| १४ | सन २०१३-१४ मधील ठळक आर्थिक बाबी | ४६ |
| १५ | विकासात्मक कामे - पूर्ण करणेत आलेले प्रकल्प | ४८ |
| १६ | विकासात्मक कामे - प्रगतीपथावर असलेले प्रकल्प | ५० |
| १७ | विकासात्मक कामे - संस्थानमार्फत अर्थसहाय्य केलेले सार्वजनिक विकास प्रकल्प | ५४ |
| १८ | नियोजित विकास प्रकल्प / कामे | ५५ |
| १९ | अपारंपारिक ऊर्जा स्त्रोत प्रकल्प | ६२ |
| २० | आर्थिक निधी उपलब्धतेबाबत | ६३ |
| २१ | श्री साईंचे समाधी मंदिरातील दैनंदिन कार्यक्रम सूची | ९४ |

# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी.

## प्रशासकीय अहवाल - सन २०१३-१४

(दिनांक ०१ एप्रिल २०१३ ते दिनांक ३१ मार्च २०१४)

## प्रास्ताविक

श्री साईबाबांचे सन १८५८ च्या सुमारास शिरडी येथे आगमन झाले. त्यांचा धर्म, जात, पंथ, मूळगांव, नांव याबद्दल आजही गूढच आहे. त्याबद्दल कुठलीही खात्रीलायक माहिती मिळत नाही. त्यांना साईबाबा हे नांव शिर्डी येथे आल्यावरच मिळाले. श्री बाबांनी भाविकांमध्ये माणूसकीचा प्रेमभाव जागृत केला. साईबाबा गरीब दीन–दुबळ्यांवर व प्राणीमात्रांवर प्रेम करत. त्यांच्या अडचणी व संकटकाळात त्यांना मदत करीत असत. शिर्डी येथील आपल्या प्रदीर्घ वास्तव्यात त्यांनी अनेक भक्तांचे आजार स्वतः शुश्रुषा करुन बरे केले. बाबांनी स्व:हस्ताने प्रज्वलीत केलेल्या व आजमितीसही अखंडपणे प्रज्वलीत असलेल्या धुनीतील उदीच्या सहाय्याने अनेक भक्तांचे असाध्य रोग बरे झालेले आहेत, होत आहेत. अशा या महान अवतारी पुरुषाची ख्याती लवकरच सर्वदूर जगभर पसरली आणि सर्वधर्मीय भक्तलोक त्यांच्याकडे आकर्षित झाले. भक्तलोक बाबांचे शुभाशिर्वाद घेण्यासाठी येत व त्यांच्या चरणी दक्षिणा किंवा एखादी वस्तू अर्पण करीत. आजही संपूर्ण जगातून सर्वधर्माचे लोक साईसमाधीच्या दर्शनास येत आहेत. म्हणून या श्रध्दास्थानांस, बाबांच्या समाधी मंदिरास आज विश्वमंदिराचे स्वरुप प्राप्त झाले आहे.

असे थोर संत श्री साईबाबा हे **शिर्डी** येथे मंगळवार, **दि.१५ ऑक्टोबर, १९१८** रोजी पंचत्वात विलीन झाले. तद्नंतर साईभक्तांनी बाबांच्या समाधीचे दर्शन घेण्यास आरंभ केला. दि.२७ऑक्टोबर १९१८ पासून साईभक्तांनी एकत्र येऊन समर्थ साईनाथ कोठी या नावाने निधी उभारुन मंदिरात पूजेची व्यवस्था केली. मंदिरामध्ये बाबांनी हाताळलेल्या वस्तूही ठेवण्यात आल्या. बाबांची बसण्याची, भक्तांना भेटण्याची जागा व इतर ठिकाणांची निगा राखण्याची व्यवस्था करण्यात आली.

दिवाणी दावा नं.१३५/१९२१, जिल्हा न्यायालय, अहमदनगर मधील कलम नं.९२ नुसार सदर निधीच्या व्यवस्थापनासाठी योजना (Scheme) तयार केली गेली. सदर योजनेत वेळोवेळी सुधारणाही करण्यात आल्या. पुढे या सर्वाचे रुपांतर विश्वस्तसंस्थेत होऊन, मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम,१९५०नुसार, या विश्वस्त संस्थेची नोंदणी सन १९५२ मध्ये अनुक्रमांक **'ई–६९(अहमदनगर)'** अन्वये करण्यात आली.

कायद्याप्रमाणे सादर केलेल्या पहिल्या ताळेबंदामध्ये जंगम मालमता रु.६,४७,३९५/– व वार्षिक उत्पन्न रुपये २,१४,०००/– असे नमूद करण्यात आले. काही वर्षातच संस्थानच्या उत्पन्नात भरघोस वाढ होऊन सन १९७३ च्या अखेरीस जंगम मालमत्ता रुपये ९० लाखापर्यंत तर वार्षिक उत्पन्न रुपये १८ लाखापर्यन्त पोहोचले.

ट्रस्टच्या एकूण उत्पन्नात होत असलेली लक्षणीय वाढ तसेच भक्तांची दिवसेंदिवस वाढत असलेली संख्या व त्यांना पुरविण्यात येणाऱ्या सुविधा आणि देशाच्या रचनेतील महत्वाचे बदल, समाजाच्या धार्मिक तसेच धर्मादाय संस्थांविषयीच्या संकल्पना यांचा विचार करुन जमा झालेला निधी गोर–गरीब, दीन–दुबळ्या व गरजू जनतेच्या कल्याणासाठी उपलब्ध करण्याचे ठरविण्यात आले. तसेच उत्तम प्रशासन व नियंत्रणासाठी मा. दिवाणी न्यायालय, मुंबई यांचे दिनांक १९ ऑक्टोबर १९८२ (दावा नं.३४५७/६०) चे आदेशानुसार योजना तयार करण्यात आली.

मा. दिवाणी न्यायालय, मुंबई ने तयार केलेल्या योजनेनुसार संस्थान व्यवस्थापनाचा कारभार मा.धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या नियंत्रणाखाली व त्यांनी नियुक्त केलेल्या विश्वस्तमंडळामार्फत सन १९८४ ते माहे ऑगष्ट,२००४ अखेर सुरु होता.

त्यानंतर, महाराष्ट्र शासनाने, मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम,१९५० अन्वये, श्री साईबाबा संस्थान, शिर्डी या नांवाने नोंदणी झालेली श्री साईबाबा संस्थानची सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था पुनर्घटित करण्याकरीता, आणि विश्वस्तव्यवस्थेला जनतेसाठी अधिक व्यापक कल्याणकारी योजना हाती घेणे शक्य व्हावे म्हणून, तिचे अधिक चांगल्या प्रकारे व्यवस्थापन, प्रशासन व नियंत्रण करण्यासाठी **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनयम, २००४** चा कायदा संमत केला.

उपरोक्त अधिनियम २००४ नुसार दिनांक २३ ऑगष्ट,२००४ रोजी अस्तित्वात आलेल्या **पहिल्या व्यवस्थापन समितीव्दारे** संस्थानचे व्यवस्थापन व कामकाज **दिनांक २६ मार्च, २०१२ अखेर** करणेत आले. मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील अधिसूचना क्रमांक सासंवि–२०११ / १७५ / २२ / का. सोळा, दिनांक २७ मार्च, २०१२ अन्वये नवीन व्यवस्थापन समिती गठीत करणेत आली. तथापि, मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनी दिनांक ३० मार्च, २०१२ रोजी जनहित याचिका क्रमांक २७ / २०१२ सह दिवाणी अर्ज क्रमांक ३५४६ / २०१२ या न्यायालयीन दाव्यामध्ये शासनाने दिनांक २७ मार्च, २०१२ रोजी नियुक्ती केलेल्या व्यवस्थापन समितीस **अंतरीम स्थगिती** दिली व संस्थानचे व्यवस्थापन व कामकाज पाहणेसाठी त्रिसदस्यीय समितीची नियुक्ती केली. मा. उच्च न्यायालयाने नियुक्त केलेली त्रिसदस्यीय समिती दिनांक **३० मार्च, २०१२** पासून संस्थानचे दैनंदिन व्यवस्थापन व दैनंदिन कामकाज पहात आहे.



श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

# श्री क्षेत्र शिर्डी चे महत्व व धार्मिक रुढी परंपरा

प्रतिदिनी सुमारे ५० हजार भक्त श्री क्षेत्र शिर्डी येथे भेट देऊन, श्री साईबाबांच्या समाधीचे दर्शन घेतात. उत्सव काळात तसेच उन्हाळी सुट्टया, दीपावली व नाताळच्या सुट्टया, गुरुवार व रविवार तसेच या दिवसांना जोडून येणाऱ्या सरकारी सुट्टया इत्यादी काळात श्री क्षेत्र शिर्डीस भेट देणाऱ्या साईभक्तांची संख्या सुमारे ३ ते ५ लाखांपर्यन्त जाते. श्री क्षेत्र शिर्डी येथे विविध पवित्र स्थाने असून, साईभक्त याठिकाणी आवर्जून भेट देऊन, आपली मनोकामना पूर्ण व्हावी म्हणून श्री साईंना साकडे घालतात.

**श्री क्षेत्र शिर्डी येथील दर्शनाची पवित्र स्थाने**

**०१) समाधी मंदिर**

हे मुख्य मंदीर आहे. मंदिराची ही इमारत नागपूरचे निस्सीम साईभक्त श्री.गोपाळराव तथा बापूसाहेब बुट्टी यांनी बाबांच्या आशीर्वादाने बांधलेली आहे. **'बुट्टी वाडा'** या नावानेही ही वास्तू ओळखली जाते. या ठिकाणी **श्री साईबाबांची पवित्र समाधी व मूर्ती** आहे. श्री साईंच्या महासमाधीनंतर सुरु असणारे नित्यक्रम पूजा–अर्चा, आरत्या, धार्मिक उत्सव आदि या ठिकाणी नित्यनियमाने सुरु आहेत. समाधी मंदिरातील दैनंदिन कार्यक्रम पहाटे ०४.३० ते रात्रौ १०.३० वाजेपर्यन्त सलग सुरु असतात. यामध्ये श्रींची पहाटे ४.३० वा. काकड आरती, मंगलस्नान, दुपारी १२.०० वा. मध्यान्ह आरती, सूर्यास्ताचे वेळी धूपारती व रात्री १०.३० वाजता शेजारती आदि नित्यक्रमांचा समावेश आहे.
तसेच, प्रत्येक गुरुवारी रात्रौ ९.१५ वाजता समाधी मंदिरातून श्री बाबांच्या पवित्र पादुका, सटका व फोटोची मिरवणूक निघून व्दारकामाई मंदिरात जाते व तेथून पालखीने चावडी मंदिरापर्यन्त जाऊन पुन्हा समाधी मंदिरात येते.

**०२) गुरुस्थान मंदिर**

बाबा सोळा वर्षांचे असताना ज्या ठिकाणी प्रथम दृष्टीस पडले ते हे समाधी मंदिर परिसरातील ठिकाण. श्रीसाईबाबा हे ठिकाण त्यांच्या गुरुचे आहे, असे सांगत असत. श्री साईसच्चरित्रात उल्लेख असलेला **प्रसिध्द निंबवृक्ष (लिंब)** येथे आहे. या ठिकाणी गुरुवारी व शुक्रवारी उद (लोबान, धूप) जाळल्यास भाविकांचे दु:ख परिहार होते, असा श्री साईसच्चरित्राचा दाखला आहे.
श्री गुरुस्थान मंदिरात दैनंदिन पूजाअर्चे बरोबरच सकाळी ११.३० वाजता व सायंकाळी धूपारतीनंतर नैवेद्य दाखविला जातो. गुरुस्थान मंदिरासमोर असलेली धुनी दर गुरुवारी व शुक्रवारी पेटविली जाते. गुरुपौर्णिमा उत्सवात गुरुस्थान मंदिरात रुद्राभिषेकाची महापूजा करण्यात येते.

**०३) द्वारकामाई (मशीद)**

बाबा शिर्डीस आल्यापासून समाधिस्त होईपर्यत दिर्घकाळ त्यांचे वास्तव्य सलग ६० वर्षे समाधी मंदिर परिसरात असलेल्या या व्दारकामाईत (मशीद) होते. असंख्य भक्तांना या ठिकाणी बाबांनी

कृपाप्रसाद दिला. बाबा ज्या **शिळेवर** बसत असत ती येथेच आहे. शिवाय बाबांनी प्रज्वलित केलेली पवित्र धुनी याच ठिकाणी आजही प्रज्वलीत आहे. भक्तांच्या मनोकामना पूर्ण करण्यासाठी तसेच विविध आजार बरे करण्यासाठी बाबा याच धुनीतून उदी देत असत. आजही भक्तांना दिली जाणारी **पवित्र उदी** याच धुनीतून प्राप्त होते. बाबा येथेच स्वत: अन्न शिजवून भक्तांना वाढीत असत.

व्दारकामाई मंदिर पहाटे ०३.४५ वाजेपासून रात्रौ ९.३० वाजेपर्यन्त उघडे असते. व्दारकामाई मंदिरात दररोज सकाळी ८ वा. नैवेदय दाखविणेत येतो. त्यानंतर सकाळी ११.३० वाजता अखंड प्रज्वलीत धुनीपुढे वैश्वदेवपूजा व श्रींचे तसबिरीची पूजा करणेत येते. तसेच सायंकाळी धूपारतीनंतर नैवेद्य दाखविला जातो. **दर गुरुवारी** रात्री निघणाऱ्या श्रीं चे पालखीचे आगमन श्री व्दारकामाईत झालेनंतर रात्रौ ०९.१५ ते रात्रौ ०९.३० वाजेपर्यन्त भजन केले जाते.

## ०४) चावडी

हे ठिकाण समाधी मंदिराच्या पूर्वेला असून व्दारकामाईपासून अगदी जवळच आहे. बाबा व्दारकामाईत दिवसाआड **मुक्काम करीत असत.** तसेच प्रत्येक गुरुवारी मिरवणुकीने व्दारकमाईतून चावडीत येऊन मुक्काम करीत असत. आताही प्रत्येक गुरुवारी रात्रौ ९.१५ ते १०.०० या वेळेत समाधी मंदिरातून व्दारकामाईमार्गे चावडीकडे पालखी मिरवणूक निघत असते. या पालखीत बाबांची तसबीर, सटका व पादुका ठेवलेल्या असतात.

चावडी मंदिर पहाटे ०३.४५ वाजेपासून रात्रौ ९ वाजेपर्यन्त उघडे असते. या वेळेमध्ये दैनंदिन पूजाअर्चा केली जाते.

## ०५) लेंडीबाग(प्रधान बाग)

मंदीर परिसरातच असलेल्या या ठिकाणी बाबा फेरफटका मारावयास जात असत. बाबांनी स्वत: या ठिकाणी लावलेल्या पिंपळ वृक्षाशेजारी **नंदादीप** अखंडपणे तेवत ठेवलेला आहे. शिवाय येथे श्री दत्त मंदीर असून बाबांचा आवडता घोडा **श्यामकर्ण (श्यामसुंदर)** जवळच चिरनिद्रा घेत आहे. तसेच जवळच बाबांची शिवडी (विहीर ) आहे. बाबांच्या वेळचे मुंबई येथील एक भक्त रावबहादूर श्री. मोरेश्वर विश्वनाथ प्रधान, यांनी लेंडीबाग खरेदी करुन साईचरणी अर्पण केली म्हणून या बागेला **'प्रधान लेंडीबाग'** असेही म्हणतात. तसेच याच परिसरात भक्तांना श्रीसाई सच्चरित्राचा वाचनासाठी **पारायण कक्ष** उघडणेत आलेला आहे. या पारायण कक्षात एकाच वेळेस सुमारे ५० भक्त सेवाभावाने पारायण करु शकतात, संस्थानमार्फत या भक्तांना पारायणासाठी संस्थान प्रकाशित सर्व भाषांमधील साईचरित्र ग्रंथ उपलब्ध करुन दिले जातात. तसेच वयोवृध्द भक्तांसाठी चष्मेही उपलब्ध करुन देणेत आलेले आहेत.

## ०६) वस्तू संग्रहालय(म्युझियम)

सन २००३ मध्ये मंदीर परिसरातील दीक्षीतवाड्यात व त्या शेजारील नव्या इमारतीत वातानुकूलीत **वस्तूसंग्रहालय** (म्युझियम) तयार करणेत आलेलेआहे. येथे श्रीं नी वापरलेला अंगरखा, जोडे, चिलिमा, श्रींचे महानिर्वाणानंतर त्यांना ज्या लाकडी पलंगावर स्नान घालणेत आले तो पलंग

तसेच श्री साईबाबांनी हाताळलेल्या विविध वस्तु, साहित्यएकत्र करुन, माहितीसह सुसूत्र पध्दतीने ठेवण्यात आलेले आहे. वस्तू संग्रहालय सर्व भक्तांसाठी सकाळी ०६ ते रात्री ०९ वाजेपर्यंन्त विनामुल्य खुले असते.

**०७) इतर स्थाने**

श्री साईबाबांच्या सानिध्यात राहिलेलेत्यांचे परमभक्त कै. श्री तात्या पाटीलकोते, कै. श्री. भाऊ महाराज कुंभार, कै. श्री. व्ही. पद्मनाभ अय्यर, कै. श्री. नानावली,कै. श्री.अब्दुलबाबायांच्या समाध्या मंदीर परिसरातच लेंडीबागेजवळ आहेत.

**०८) इतर ग्रामदेवतांची मंदिरे**

संस्थान मंदीर परिसरातच **''श्री गणेश'', ''श्री शनी'' व ''श्री महादेव''** या ग्रामदेवतांची मंदिरे असून संस्थान मार्फत त्यांचे नुतनीकरण करण्यात आलेले आहे. मंदीर परिसरानजीकच **दक्षिणमुखी श्री हनुमान मंदीर** असून या मंदिरातील दैनंदिन धार्मिक विधी, पूजाअर्चा स्थानिक नगरपंचायत व ग्रामस्थांच्या विनंतीनुसार संस्थानमार्फत करणेत येत आहे. श्री हनुमान मंदिराचा संस्थानमार्फत जीर्णोध्दार करणेत आलेला असून तेथे प्रशस्त अशा नवीन मंदिराची रचना करण्यात आलेली आहे. या जीर्णोध्दार करण्यात आलेल्या मंदिरात श्री हनुमानाची ०५ फुट उंचीची सुंदर मुर्ती बसविणेत आलेली आहे.

**०९) श्री खंडोबा मंदीर**

हे मंदीर शिर्डी बसस्थानकाजवळ, श्री साईबाबा रुग्णालयाशेजारी आहे. औरंगाबाद जिल्ह्यातील धूपखेडा येथील चाँद पाटलाचेपत्नीच्या भाच्याचे लग्नाचेवऱ्हाड जेव्हां शिरडीत आले तेव्हा या मंदिराजवळील वटवृक्षातळी ते उतरले होते. या वऱ्हाडासोबत आलेले बाल फकीर जेव्हा मंदिराच्या पटांगणात सर्वांसमवेत उतरले, तेव्हा मंदिराचे पुजारी म्हाळसापती यांनी या बाल फकिराचे **'आओ साई'** म्हणून स्वागत केले. तेव्हांपासून त्यांचे **'साई'** हे नांव प्रचलित झाले. याशिवाय शिर्डीपासून पुर्वेस३ किलोमीटर अंतरावर बिरेगांव बनामध्ये श्री विरभद्र या ग्रामदेवतेचे मंदीर आहे.

# संस्थान मार्फत साजरे केले जाणारे उत्सव

## ०१) श्री रामनवमी उत्सव

श्री रामनवमी उत्सव श्री क्षेत्र शिर्डी येथे अत्यंत भव्य प्रमाणावर व उत्साहाने साजरा केला जातो. श्री साईबाबांचे हयातीपासून शिर्डी **गांवाची यात्रा** म्हणून श्री रामनवमी उत्सव साजरा केला जातो. या उत्सवास देशभरातून विशेषत: मुंबई येथून हजारोंच्या संख्येने साईभक्त पदयात्रेने बाबांची पालखी घेऊन शिर्डीस येतात. अहवाल सालात, श्री रामनवमी उत्सव पंचांग व तिथीप्रमाणे **दिनांक १८ एप्रिल, २०१३ ते दिनांक २० एप्रिल, २०१३** अखेर साजरा करणेत आला.

## ०२) श्री गुरुपौर्णिमा उत्सव

श्री गुरुपौर्णिमा उत्सवही श्री क्षेत्र शिर्डी येथे उत्साहाने साजरा केला जातो. श्री साईबाबांनी आपल्या हयातीपासून **गुरूविषयी कृतज्ञता** व्यक्त करण्याच्या भावनेने श्री गुरुपौर्णिमा उत्सव साजरा करणेस सुरुवात केली. या उत्सवास विशेषत: मुंबई व कोकणातील कोळी समाज व तसेच पुणे, औरंगाबाद इत्यादी ठिकाणाहून हजारो साईभक्त पदयात्रेव्दारे बाबांची पालखी घेऊन शिर्डीस येतात.
अहवाल सालात, **श्री गुरुपौर्णिमा उत्सव** पंचांग व तिथीप्रमाणे **दिनांक २१ जुलै, २०१३ ते दिनांक २३ जुलै, २०१३** अखेर साजरा करणेत आला.

## ०३. श्री पुण्यतिथी (विजयादशमी / दसरा) उत्सव

श्री साईबाबांचे महानिर्वाण दिनांक १५ ऑक्टोबर, १९१८ साली विजयादशमीस झाले. तेव्हांपासून त्यांचा श्री पुण्यतिथी उत्सव दरवर्षी विजयादशमीस उत्साहाने साजरा केला जातो. या पुण्यतिथी उत्सवास लाखो साईभक्त हजेरी लावतात. बाबा त्यांचे हयातीत दररोज भिक्षा मागून आणीत. त्याचे प्रतीक म्हणून या उत्सवात, मुख्य दिवशी म्हणजे विजयादशमीचे दिवशी सकाळी गांवातून **भिक्षा झोळी** कार्यक्रम आयोजित केला जातो. या कार्यक्रमात मा.व्यवस्थापन समितीच्या सदस्यांसह, ग्रामस्थ व साईभक्तही सहभागी होतात. याचदिवशी समाधी मंदिरात **आराधना विधी (श्राध्दविधी)** केला जातो.
अहवाल सालात, श्री पुण्यतिथी (विजयादशमी) उत्सव पंचांग व तिथीप्रमाणे **दिनांक १२ऑक्टोबर, २०१३ ते दिनांक १४ ऑक्टोबर,२०१३** अखेर साजरा करणेत आला.

श्री साईबाबांचे हयातीपासून व त्यानंतर आजतागायत वरील तीन उत्सव मोठया उत्साहात साजरे केले जातात. या तीनही उत्सवांच्या निमंत्रण–कार्यक्रम पत्रिका व उदीप्रसाद भक्तमंडळाच्या सभासदांना पाठविणेत येतो.

मा. व्यवस्थापन समितीचे मार्गदर्शन व नियंत्रणाखाली, उपरोक्त उत्सवांसह अहवाल

सालात,गुढीपाडवा,रंगपंचमी,गोकुळअष्टमी, महाशिवरात्र, श्री दत्त जयंती, कोजागिरी पौर्णिमा, आषाढी / कार्तिकी एकादशी इत्यादी सण–उत्सव रुढी परंपरेनुसार, धार्मिक रिती–रिवाजानुसार मोठया उत्साहात साजरे करण्यात आले.

याव्यतिरिक्त साईभक्तांसाठी देणगी मुल्य आकारुन, स्वतंत्र कक्षामध्ये दररोज सकाळी श्री साईसत्यव्रत (सत्यनारायण) पुजा व अभिषेक पुजा पार पाडल्या जातात, या दैनंदिन उपक्रमात साईभक्त मोठया प्रमाणावर सहभागी होतात.

श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्याव्यवस्थापनाखाली असलेल्या सर्व मंदिरातीलदैनंदिन कार्यक्रम, पूजा–अर्चा, आरत्या आदि बाबी मंदिर विभागामार्फत नित्यनियमाने, अखंडीतपणे पार पाडल्या जातात.

# व्यवस्थापन समिती

प्रास्ताविकात नमूद केलेप्रमाणे, महाराष्ट्र शासनाने श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीअधिनियम, २००४ मधील कलम ५(२) मधील तरतुदीनुसार दिनांक २३ ऑगष्ट, २००४ रोजी नियुक्त केलेल्या पहिल्या मा. व्यवस्थापन समितीव्दारे **दिनांक २६ मार्च,२०१२** अखेरपर्यन्त वेळोवेळी घेतलेले निर्णय तसेच मार्गदर्शनानुसार संस्थानच्या कामकाजाचे व्यवस्थापन पार पाडणेत आले.

तद्नंतर,महाराष्ट्र शासनाने श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम, २००४ मधील कलम ५(२) मधील तरतुदीनुसार, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचे क्रमांक सासंवि – २०११ / १७५ (२२) / का. १६, दिनांक २७ मार्च, २०१२अन्वये संस्थानचे व्यवस्थापन व कामकाज पाहणेसाठी दुसरी मा. व्यवस्थापन समिती नियुक्त केली होती. तथापि,मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनी दिनांक ३० मार्च, २०१२ रोजी जनहित याचिका क्रमांक २७ / २०१२ सह दिवाणी अर्ज क्रमांक ३५४६ / २०१२ मध्ये दिनांक २७ मार्च, २०१२ रोजी मा. शासन नियुक्त दुसऱ्या व्यवस्थापन समितीस अंतरिम स्थगिती देऊन, संस्थानचे व्यवस्थापन व कामकाज पाहणेसाठी खाली नमुद केलेप्रमाणे मा. त्रिसदस्यीय (व्यवस्थापन)समितीची नियुक्ती केली आहे

**०१) मा. मुख्य जिल्हा न्यायाधिश, अहमदनगर — अध्यक्ष**

**०२) मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर — सदस्य**

**०३) मा. कार्यकारी अधिकारी — सदस्य**

मा. उच्च न्यायालयाने नियुक्त केलेली उपरोक्त मा. त्रिसदस्यीय (व्यवस्थापन समिती)दिनांक ३० मार्च, २०१२ पासून संस्थानचे दैनंदिन व्यवस्थापन व कामकाज पहात आहे.

## अहवाल सालातील, मा. त्रिसदस्यीय समितीचे अध्यक्ष व सदस्य खालीलप्रमाणे

| अ.नं. | पदनाम | नांव | कालावधी |
|---|---|---|---|
| ०१ | अध्यक्ष–तथा– मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर | **मा.श्री. जयंत दत्तात्रय कुलकर्णी** | दि. ३१ मार्च, २०१२ ते दि. २० मार्च, २०१४ |
| | | **मा. श्री. बी. यु. देबडवार (प्रभारी)** | दि. २१ मार्च, २०१४ ते दि. २० एप्रिल, २०१४ |
| ०२ | सदस्य– तथा– जिल्हाधिकारी, अहमदनगर | **मा. डॉ. संजीवकुमार दयाल** | दि. ३१ मार्च, २०१२ तेदि. ०७ फेब्रुवारी, २०१४ |
| | | **मा. श्रीमती रुबल गुप्ता–अग्रवाल** | दि. ०८ फेब्रु., २०१४ तेदि. १५ फेब्रु., २०१४ |
| | | **मा. श्री. अनिल कवडे** | दि. १६ फेब्रु., २०१४ तेदि. ३१ मार्च,२०१४ |
| ०३ | सदस्य – तथा – कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी | **मा. श्री. किशोर रामराव मोरे** | दि. ३१ मार्च, २०१२ तेदि. ३१ जुलै, २०१३ |
| | | **मा. डॉ. यशवंतराव वसंतराव माने** | दि. ०२ ऑगष्ट, २०१३ तेदि. १८ सप्टेंबर, २०१३ |
| | | **मा. श्री. भाऊसाहेब दाजिबा साबळे** (प्रभारी कार्यकारी अधिकारी) | दि. १९ सप्टेंबर, २०१३ तेदि. २७ सप्टेंबर, २०१३ |
| | | **मा. श्री. अजय मोरे** (उपविभागीय अधिकारी, शिर्डी) | दि. २८ सप्टेंबर, २०१३ तेदि. ३१ मार्च, २०१४ |

सन २०१३–२०१४ या अहवाल सालात, उपरोक्त मा. त्रिसदस्यीय समितीने वेळोवेळी घेतलेले निर्णय व तसेच मार्गदर्शनानुसार संस्थानच्या दैनंदिन कामकाजाचे व्यवस्थापन करणेत येत आहे.

## छाननी समिती

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील कलम २१ (२) च्या परंतुकानुसार पहिल्या मा.व्यवस्थापन समितीस सहाय्य करणेसाठी मा. छाननी समितीचे गठन करणेत आलेले होते. तथापि, आता मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील दिनांक ३० मार्च, २०१२ रोजीचे आदेशानुसार संस्थानचे दैनंदिन व्यवस्थापन मा. त्रिसदस्यीय समितीच्या नियंत्रणाखाली पार पाडणेत येत असल्याने सन २०१३ – १४ या अहवाल सालात छाननी समितीचे गठण करणेत आलेले नाही.

## सल्लागार परिषद

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील कलम १८ नुसार मा. व्यवस्थापन समितीस सहाय्य करणेसाठी मा. सल्लागार परिषदेचे गठन करणेत आलेले होते. तथापि, आता मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील दिनांक ३० मार्च, २०१२ रोजीचे आदेशानुसार संस्थानचे दैनंदिन व्यवस्थापन मा. त्रिसदस्यीय समितीच्या नियंत्रणाखाली पार पाडणेत येत असल्याने सन २०१३ – १४ या अहवाल सालात मा. सल्लागार परिषदेचे गठण करणेत आलेले नाही.

## इतर उपसमित्या

मा. व्यवस्थापन समितीने अधिनियमातील तरतुदीनुसार कामकाजाच्या सोयीच्या दृष्टीने व विविध विभागांच्या सेवेशी निगडीत असलेल्या प्रस्तावांवर जलद व त्वरीत निर्णय घेणेकामी पहिल्या व्यवस्थापन समिती सदस्यांच्या अंतर्गत उपसमित्या गठीत केलेल्या होत्या. तथापि, आता मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडील दिनांक ३० मार्च, २०१२ रोजीचे आदेशानुसार संस्थानचे दैनंदिन व्यवस्थापन मा. त्रिसदस्यीय समितीच्या नियंत्रणाखाली पार पाडणेत येत असल्याने सन २०१२ – १३ या अहवाल सालात उपसमित्यांचे गठण करणेत आलेले नाही. अहवाल सालात, संस्थानचे दैनंदिन व्यवस्थापन पाहणेसाठी मा. त्रिसदस्यीय समितीच्या एकुण १७सभा झाल्या आहेत.

# विश्वस्तव्यवस्थेची कर्तव्ये व अधिकार

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी अधिनियम, २००४ मधील कलम १७(२) तसेच (सुधारीत) कलम २१ (१) व (२) अन्वये विश्वस्तनिधीच्या विनियोगासाठी विश्वस्तव्यवस्थेचे ध्येय, उद्देश व कार्याविषयी सविस्तरपणे विवेचन करण्यात आलेले आहे. या प्रमुख कर्तव्ये व अधिकाराबाबत थोडक्यात गोषवारा पुढील प्रमाणे :

(१) विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन पाहणे. मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धामिर्क विधी, पूजा–अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे. भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्धकरुन देणे. श्री साईबाबांचे शिकवणुकीचा प्रचार करणे, अन्नछत्र चालविणे, भक्तांचे निवासासाठी व उपयोगासाठी विश्रामगृहे बांधणे व त्याची देखभाल करणे. या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे,ही समितीची कर्तव्ये असतील.

(२) विश्वस्त व्यवस्थेच्या मालमत्तांचा विकास करण्याच्या व योजना राबविण्याच्या प्रयोजनासाठी, तसेच विश्वस्तव्यवस्थेची उद्दिष्टे व प्रयोजने पार पाडण्यासाठी आवश्यक त्या स्थावर किंवा जंगम मालमत्ता संपादित करील किंवा खरेदी करील.

(३) श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण या बाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार व प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील.

(४) श्री साईबाबांच्या भक्तांमध्ये बंधुभाव, एकता, श्रध्दा आणि समता या भावना वाढीस लावणारे उपक्रम अथवा कार्यक्रम आयोजित करील किंवा हाती घेईल.

(५) सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास सहाय्य करील तसेच, शिरडी येथे वा अन्य ठिकाणी, शैक्षणिक संस्था स्थापन करील.

(६) मानव जातीचे कल्याण करणाऱ्या किंवा मानवाला आपत्तीमध्ये सहाय्य करणाऱ्या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल.

(७) या अधिनियमाच्या तरतुदींस अधीन राहून, समितीला अधिनियमाखाली आपली कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक ते सर्व अधिकार असतील.

# प्रशासकीय कामकाज

- **कार्यकारी अधिकारी**

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी, अधिनियम २००४मधील कलम १३ अन्वये, महाराष्ट्र शासनाकडून विश्वस्तव्यवस्थेचे दैनंदिन प्रशासनाचे कामकाज पाहणेसाठी कार्यकारी अधिकारी यांची प्रतिनियुक्तीनेनेमणूक करण्यात आलेली आहे.कार्यकारी अधिकारी हे राज्य सरकारच्या सेवेमधीलउप–जिल्हाधिकाऱ्याच्या श्रेणीतील अथवा समकक्ष असतात.

अहवाल सालात, मा. महाराष्ट्र शासनाने प्रतिनियुक्तीने नेमणुक केलेले, **श्री. किशोर रामराव मोरे, उपजिल्हाधिकारी** यांनी **दिनांक ३१ जुलै, २०१३ अखेर** कार्यकारी अधिकारी या पदाचे कामकाज पाहिले. तथापि, **श्री. किशोर रामराव मोरे, उपजिल्हाधिकारी** यांचा प्रतिनियुक्तीचा कालावधी **दिनांक ३१ जुलै, २०१३ (मध्यान्होत्तर)** संपुष्टात आल्याने, खाली नमुद केलेल्या अधिकाऱ्यांनी कार्यकारी अधिकारी या पदाचे कामकाज पाहिले आहे

| नांव | कालावधी |
|---|---|
| **श्री. डॉ. यशवंतराव वसंतराव माने**<br>उपजिल्हाधिकारी तथा उपकार्यकारी अधिकारी,<br>श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी | दि. ०१ ऑगष्ट, २०१३ ते<br>दि.१८ सप्टेंबर, २०१३ अखेर |
| **श्री. भाऊसाहेब दाजिबा साबळे**<br>प्रशासकीय अधिकारी,<br>श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी | दि.१९ सप्टेंबर, २०१३ ते<br>दि. २७ सप्टेंबर, २०१३ अखेर |

तद्नंतर, मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील निर्णय क्रमांक सासंवि–२०१३/६/प्र.क्र.३/२०१३, दिनांक २६ सप्टेंबर, २०१३ नुसार कार्यकारी अधिकारी या पदाचा अतिरिक्त कार्यभार पुढील आदेश होईपावेतो मा. उपविभागीय अधिकारी, शिर्डी उपविभाग, शिर्डी,जिल्हा अहमदनगर यांचेकडेस सोपविणेत आला.

या शासन निर्णयानुसार,श्री. अजय सुभाष मोरे, उपविभागीय अधिकारी, शिर्डी उपविभाग, शिर्डी यांनी दिनांक २८सप्टेंबर, २०१३ पासून कार्यकारी अधिकारी या पदाचा अतिरिक्त कार्यभार स्वीकारुन,संस्थान व्यवस्थापनाचे दैनंदिनकामकाज पाहिले आहे.

- **कार्यकारी अधिकारी**

  संस्थानचे वाढते कामकाजाचे स्वरुप पहातां, कार्यकारी अधिकारी यांच्या मदतीसाठी व त्यांच्या अनुपस्थितीत कामकाज सांभाळणेसाठी मा. विधी व न्याय विभाग,महाराष्ट्र शासन यांचेकडील दिनांक १८ मार्च, २००९ रोजीचे आदेशान्वये उपकार्यकारी अधिकारी हे तहसीलदार संवर्गातील पद निर्माण करुन, या पदावर श्री. डॉ. यशवंतराव वसंतराव माने यांची श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेचे उपकार्यकारी अधिकारी म्हणून प्रतिनियुक्तीने नेमणूक केलेली होती.

तथापि,श्री. डॉ. यशवंतराव वसंतराव माने, उपकार्यकारी अधिकारी यांचा प्रतिनियुक्तीचा कालावधी दिनांक १८ सप्टेंबर, २०१३ (मध्यान्होत्तर) संपुष्टात आल्याने,सामान्य प्रशासन शाखेकडील आदेश क्रमांक एसएसएस/वशी–१/२०६७/२०१३, दिनांक २१ सप्टेंबर, २०१३ नुसार श्री. भाऊसाहेब दाजिबा साबळे, प्रशासकीय अधिकारी यांनी दिनांक १९ सप्टेंबर,२०१३ ते दिनांक २७ सप्टेंबर, २०१३ अखेर उपकार्यकारी अधिकारी या पदाचे कामकाज पाहिले.

तद्नंतर, मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील निर्णय क्रमांक सासंवि–२०१३/प्र.क्र.६१/२०१३, दिनांक २६ सप्टेंबर, २०१३ नुसार उपकार्यकारी अधिकारी या पदाचा अतिरिक्त कार्यभार पुढील आदेश होईपावेतो मा. तहसीलदार, राहाता,जिल्हा अहमदनगर यांचेकडेस सोपविणेत आला.

या शासन निर्णयानुसार,श्री. आप्पासाहेब छगनराव शिंदे, तहसीलदार, राहाता यांनी दिनांक २८ सप्टेंबर, २०१३ पासून उपकार्यकारी अधिकारी या पदाचा अतिरिक्त कार्यभार स्वीकारुन,संस्थान व्यवस्थापनाचे दैनंदिनकामकाज पाहिले आहे.

- **प्रशासनाची रचना**

कार्यकारी अधिकारी यांच्यामार्गदर्शन-तथा-नियंत्रणाखाली उपकार्यकारी अधिकारी, प्रशासकीय अधिकारी, विभागप्रमुख व इतर कर्मचारी हे विश्वस्तव्यवस्थेचे दैनंदिन कार्यालयीन कामकाज सुरळीतरित्या पार पाडीत आहेत.

विश्वस्तव्यवस्थेचे दैनंदिन कामकाजाचे सुसुत्रीकरण व्हावे यासाठी कामाचे स्वरुपानुसार व कामकाजात सरळता, सुलभता यावी या दृष्टीने व भक्तांच्या सोयी-सुविधेशी निगडीत कामांच्या दृष्टीने विविध विभागांची रचना केलेली आहे. सध्या खालीलप्रमाणे विभाग कार्यरत असून त्यांचेमार्फत खाली नमूद केल्याप्रमाणे सेवा देणेत येत आहेत.

## (अ) संस्थानचे दैनंदिन कामकाज पार पाडणेसाठी कार्यरत असणारे विभाग

| अ.नं. | विभागाचे नांव | कार्य / सेवा तपशील |
|---|---|---|
| १ | सामान्य प्रशासन शाखा | कार्यासन १ – आस्थापना – कर्मचारी विषयक सर्व प्रशासकीय कामे.<br>कार्यासन ३ – आर्थिक अनुदान<br>कार्यासन ५ – उत्सव व इतर सामाजिक, धार्मिक कार्यक्रम कामकाज<br>कार्यासन ६ – कर्मचारी पाल्य शैक्षणिक शुल्क परतावा<br>कार्यासन ८ – भक्तमंडळ सभासद विषयक कामकाज.<br>कार्यासन ९ – आवक पत्रव्यवहारा विषयक कामकाज<br>कार्यासन १० (अ/ब/क) – कर्मचारी पगारबिले व त्यासंबंधीत इतर अनुषंगिक कामकाज.<br>कार्यासन ११ – जावक पत्रव्यवहारा विषयक कामकाज<br>कार्यासन १२ – टंकलेखन / झेरॉक्स विभाग |
| २ | विधी विभाग (कार्यासन २) | संस्थानसंबंधित सर्व प्रकारचे विधी विषयक काम पाहणे. |
| ३ | सभाकामकाज विभाग (कार्यासन ४) | मा. व्यवस्थापन समितीसह अधिनियमातील तरतुदीनुसार स्थापन करणेत आलेल्या विविध समित्या यांचे सभा कामकाज विषयक काम पाहणे. |
| ४ | कामगार विभाग (कार्यासन ७) | संस्थान आस्थापनेवर काम करणाऱ्या कर्मचारी रजा, सुट्ट्या, शिस्त, गैरवर्तन, दंड, खातेनिहाय चौकशी व न्यायालय विषयक काम पाहणे. |
| ५ | जनसंपर्क विभाग ( कार्यासन १३) | साईभक्तांना श्रीं चे दर्शन विनासायास व सुलभ रितीने व्हावे म्हणून सोयी-सुविधा देणेकामी कामकाज, मान्यवरांच्या शिर्डी भेटीविषयक कामकाज, संस्थान विषयक माहिती व प्रसिध्दी विषयक काम पाहणे. |
| ६ | अ) लेखाशाखा | रोख,मनिऑर्डर,चेक/डी.डी. वस्तु रुपाने देणग्या स्विकारणे, दक्षिणापेटया मोजणी, सोने, चांदी, कापड देणगी, पुरवठादारांची बिले आदा करणे, सर्व हिशोब ठेवणे, गुंतवणूक नियोजन करणे इ. |
| | ब) अंतर्गत लेखापरिक्षण कक्ष | संस्थान चल-अचल मालमत्तेची पडताळणी व जुळवणी विषयक कामे करणे, लेखापरिक्षणास सहाय्य करणे इ. |

| अ.नं. | विभागाचे नांव | कार्य / सेवा तपशील |
|---|---|---|
| ७ | मंदीर विभाग | श्रींची दैनंदिन पुजा अर्चा (अभिषेक पूजा, श्री साई सत्यव्रत पूजा), श्री साईंच्या सर्व आरत्या, दर्शनास येणाऱ्या भक्तांना सुलभतेने दर्शन उपलब्ध होईल याची तजवीज करणे, श्रींचे रामनवमी, गुरुपौर्णिमा, पुण्यतिथी (दसरा) व इतर उत्सव साजरे करणे. |
| ८ | प्रकाशने विभाग | श्रींचे संस्थान प्रकाशित वेगवेगळे फोटो, त्यांचे वेगवेगळया भाषेतील चरित्र, पोथी, दैनंदिनी,दिनदर्शिका यांचे छपाईचे संबंधीत सर्व कामे पहाणे व भक्तांना विक्री करीता उपलब्ध करणे. |
| ९ | आरोग्य विभाग | मंदीर परिसर व निवासस्थाने इ. ठिकाणी स्वच्छता व इतर तद्नुषंगिक कामे. |
| १० | संरक्षण विभाग (फायर ॲण्ड सेफ्टी व सी.सी.टी.व्ही. कंट्रोल सेल या उपविभागासह ) | मंदीर परिसर,निवासस्थान,प्रसादालय व इतर ठिकाणी भक्तांचे व संस्थान मालमत्तेचे संरक्षण व्यवस्था व भक्तांची सुलभ दर्शन व्यवस्था. |
| ११ | बांधकाम विभाग (भूसंपादन कक्षासह) | मंदीर, दर्शनलाईन, निवासस्थाने, उपहारगृहे, प्रसादालय, रुग्णालय, शैक्षणिक संकुल इत्यादी संस्थान इमारती व मालमत्तेची निगा, दुरुस्ती देखभाल, आवश्यक ती नविन बांधकामे करणे, विविध विकास प्रकल्पांसाठी जमिनींची खरेदी / भूसंपादन करणे, जमिनीविषयक बाबी हाताळणे. |
| १२ | पाणी पुरवठा विभाग | भक्त, रुग्णालय,निवासस्थान,प्रसादालय व संस्थान सर्व कार्यालये व इतर ठिकाणी स्वच्छ व निर्जंतुक पाण्याचा पुरवठा करणे. |
| १३ | विद्युत विभाग | मंदीर परिसर, दर्शन रांगा, निवासस्थाने, प्रसादालय, रुग्णालय या सर्व ठिकाणी विद्युत पुरवठा सुरळीत चालू ठेवणे, उत्सव व इतर कार्यक्रम प्रसंगी विद्युत रोषणाई करणे. |
| १४ | ध्वनीक्षेपण विभाग | मंदीरात होणाऱ्या दैनंदिन आरत्या, भजने व विविध कार्यक्रम यासाठी ध्वनीक्षेपण व्यवस्था, संस्थान आयोजित कार्यक्रमांचे छायाचित्रे काढणे, कार्यक्रमांचे रेकॉर्डींग व प्रसारण करणे यासंबंधी कामे. |
| १५ | साईबाबा भक्तनिवासस्थान विभाग | भक्तांना निवासव्यवस्था उपलब्ध व्हावी म्हणून सदरचे ०३ निवासस्थानेविभाग हे स्वतंत्ररित्या २४ तास कार्यरत आहेत. |
| १६ | साईप्रसाद निवासस्थान विभाग | |
| १७ | व्दारावती निवासस्थान विभाग | |
| १८ | साईआश्रम भक्तनिवास | भक्तांना विनासायास व सुलभतेने माफक दरात निवासस्थाने सुविधा उपलब्ध |
| १९ | साईआश्रम धर्मशाळा | व्हावी म्हणून देणगीदार साईभक्ताच्या आर्थिक देणगीतून अद्यायवत निवासस्थाने उभारणेत आलेली असून, सदरची निवासस्थाने भक्तांना अहवाल सालात निवासासाठी उपलब्ध करुन देणे आली आहे. |

| अ.नं. | विभागाचे नांव | कार्य / सेवा तपशील |
|---|---|---|
| २० | प्रसादालय विभाग | भक्तांना सकाळी १० ते रात्रौ १० पर्यंत प्रसाद भोजनाची व्यवस्था करणे. |
| २१ | कॅन्टीन विभाग | भक्तांसाठी चहा, कॉफी, दुध, गावरान तुपाचे प्रसाद लाडु व नाष्टा पाकिटे उपलब्ध करुन देणे. नाष्टा पाकिटे स.७ ते १० वाजेपर्यन्त उपलब्ध करुन दिली जातात. |
| २२ | खरेदी विभाग | प्रसादालयात प्रसादभोजन व कॅन्टीन विभाग या विभागासाठी आवश्यक असणाऱ्या मालांची खरेदी व तसेच संस्थानचे इतर कार्यालयास दुरुस्ती देखभालीसाठी लागणाऱ्या वस्तु व स्टेशनरी विषयक खरेदीचे कामे करणे. |
| २३ | भांडार विभाग | विविध कार्यालयासाठी कामाच्या द्दष्टिने खरेदी केलेल्या मालाची नोंद / साठा घेऊन मागणी पत्रकानुसार विविध विभागांना माल पुरविणे. |
| २४ | वाहन विभाग | श्री साईबाबा भक्तनिवासस्थान विभाग या ठिकाणाहून दर्शनासाठी मंदिर परिसरापर्यन्त, प्रसाद भोजनासाठी श्री साईप्रसादालय विभागापर्यन्त भक्तांची मोफत ने–आण करणे नगरसूल व साईनगर शिर्डी रेल्वेस्टेशन येथून भक्तांची मोफत ने–आण करणे. रुग्णालयासाठी ॲम्बुलन्स, शैक्षणिक संकुलासाठी स्कुल बस व कार्यालयीन कामकाजासाठी वाहने पुरविणे, वाहनांची दुरुस्ती देखभाल करणे इत्यादी. |
| २५ | बगीचा विभाग | मंदीर व परिसरात फुलझाडे, वृक्ष तसेच श्रींचेसाठी हार व त्यासाठी लागणारी फुले यांचे संगोपन करणे व बगीचा विषयक कामे करणे, विविध उत्सवात व कार्यक्रमप्रसंगी फुलांची सजावट करणे. |
| २६ | अभिलेख कक्ष | संस्थानकडील जुन्या वस्तुंचा लिलाव करणे व संस्थानमधील अ,ब,क,ड प्रकारचे रेकॉर्ड ठेवणे व जतन करणे. |
| २७ | माहिती तंत्रज्ञान विभाग | सॉफ्टवेअर, हार्डवेअर डेव्हलपमेंट, मेंन्टेनन्स व नेटवर्कींग, वेबसाईट डेव्हलपमेंट बाबतची सर्व कामे, संस्थानविषयक माहितीबरोबरच श्री साईंचे जीवनावरील प्रकाशने वेबसाईटवर उपलब्ध करुन देणे. |
| २८ | मुंबईकार्यालय | दादर, मुंबई येथे विश्वस्तव्यवस्थेच्या स्व:मालकीचे साईनिकेतन इमारतीत सुरु आहे. साईलिला मासिक छपाई व वितरण विषयक कामे, देणग्या स्विकारणे, मंत्रालयासंबंधातील कामे करणे आदि. |
| २९ | लाडू प्रसाद निर्मिती विभाग | साईभक्तांकरीता प्रसाद रुपाने उपलब्ध करुन द्यावयाचे लाडू निर्मितीचे संपूर्ण प्रक्रियेवर एकसंघ नियंत्रण व देखरेख ठेवून, भक्तांना विनासायास व सुलभ रितीने लाडू प्रसाद उपलब्ध करुन देणे. |
| ३० | सीसीटीव्ही कंट्रोल सेल | मंदिर व मदिर परिसराची दहशतवादी कृत्यांपासून रक्षण व्हावे म्हणून कार्यान्वीत करणेत आलेल्या सीसीटीव्ही यंत्रणेचे नियंत्रण करणे व अंतर्गत व बर्हिगत सुरक्षा विभागांशी समन्वय साधून सीसीटीव्ही यंत्रणा कार्यरत ठेवणे. |

**(ब) संस्थान संचलित इतर उपक्रमांतर्गत शैक्षणिक संकुल**

| अ.नं. | विभागाचे नांव | कार्य / सेवा तपशील |
|---|---|---|
| ३१ | श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण केंद्र, शिर्डी. | औद्योगिक प्रशिक्षण केंद्रामध्ये विद्यार्थी – विद्यार्थिनींना विविध प्रकारचे व्यवसाय आधारित १२ तांत्रिक अभ्यासक्रमांचे शिक्षण दिले जाते. |
| ३२ | श्री साईबाबा इंग्लिश मिडीअम स्कुल, शिर्डी. | इंग्लिश मिडीअम स्कुलमध्ये विद्यार्थी – विद्यार्थिनींना ज्युनिअर के.जी. ते इयत्ता १० वी पर्यत इंग्रजी माध्यमातून शिक्षण दिले जाते. |
| ३३ | श्री साईबाबा कन्या विद्या मंदीर, शिर्डी | कन्या विद्या मंदीर मध्ये इयत्ता ५ वी ते इयता १० वी पर्यत विद्यार्थिनींना मोफत शिक्षण दिले जाते. |
| ३४ | श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी. | कनिष्ठ महाविद्यालयामध्ये विद्यार्थी – विद्यार्थिनींना कला, वाणिज्य व विज्ञान शाखेचेशिक्षण दिले जाते. |

**(क) संस्थान संचलित इतर उपक्रमांतर्गत रुग्णालये**

| अ.नं. | विभागाचे नांव | कार्य / सेवा तपशील |
|---|---|---|
| ३५ | श्री साईनाथ रुग्णालय, शिर्डी (२०० खाटांचे) | आर्थिकदृष्टया दुर्बल रुग्णांबरोबरच उपचारांची गरज असलेल्या रुग्णांना विनामुल्य अथवा माफक व अल्पदरात वैद्यकीय सेवा देणे, विहीत नियमाप्रमाणे आर्थिक वैद्यकीय अनुदान देणे. |
| ३६ | श्री साईबाबा सुपर स्पेशालिटी हॉस्पीटल, शिर्डी.(२०० खाटांचे) | माफक दरात वैद्यकीय सेवा देणे, आर्थिकदृष्टया दुर्बल गरजू रुग्णांना विनामुल्य वैद्यकीय सेवा देणे, विहीत नियमानुसार जीवनदायी योजनेचा रुग्णांना लाभ देणे. |

संस्थान कर्मचाऱ्यांचा विभागवार व वेतनश्रेणीनिहाय ४८२६ पदांचा सर्वसमावेशक आकृतीबंध मंजूर असून, या आकृतीबंधानुसार, संस्थानची पदनिहाय व वेतनश्रेणीनिहाय स्थायी कर्मचारी संख्या २९०८व कंत्राटी कर्मचारी संख्या १९१८ मंजूर करण्यात आलेली आहे.

अहवाल सालात, विश्वस्तव्यवस्थेच्या आस्थापनेवर, दिनांक ३१ मार्च, २०१४ अखेर कार्यकारी अधिकारी, उपकार्यकारी अधिकारी, मुख्यलेखाधिकारी व संरक्षण अधिकारी या पदांवर शासनाकडून प्रतिनियुक्तीवर आलेल्या ०४ अधिकाऱ्यांसह, संस्थान सेवेतील प्रशासकीय अधिकारी, विभागप्रमुख यांचेसह विविध श्रेणीतील एकूण२२१६स्थायी कर्मचारी सेवेत आहेत.

**संस्थानआस्थापनेवरील सर्व स्थायी कर्मचाऱ्यांना खालीलप्रमाणे वेतन व इतर सुविधा देणेत येतात :**

- महाराष्ट्र शासनाने लागू केलेल्या सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे वेतन व भत्ते.
- दिपावली सानुग्रह अनुदान.
- मोफत वैद्यकीय सेवा.
- गृहकर्जावरील व्याजावर ५० टक्के अनुदान.
- ग्रुप ग्रॅच्युइटी.
- कामगार नुकसान भरपाई कायद्यांतर्गत समूह विमा.
- पाल्यांचा शैक्षणिक शुल्क परतावा.
- अद्ययावत निवासस्थाने.

याशिवाय, श्री साईभक्तांच्या वाढत्या गर्दीमुळे त्यांना आवश्यक सोयी–सुविधा उपलब्ध करुन देणेसाठी दररोज कुशल व अकुशल असे सुमारे १२३८ कंत्राटी कर्मचारी व संरक्षण विभागासाठी सुमारे ६०६ कंत्राटी सुरक्षा रक्षक असे एकुण सुमारे १८४४ कंत्राटी कर्मचारी ठेकेदारामार्फत काम करीत आहेत. या कामगारांना किमान वेतन कायद्यानुसार वेतन, सानुग्रह अनुदान दिले जात आहे.

- कंत्राटी कर्मचाऱ्यांनाही त्यांचे सेवेच्या कालावधीनुसार मोफत वैद्यकिय सेवा देणेत येतात.

## भक्तमंडळ

पूर्वी मा. दिवाणी न्यायालय, अहमदनगर यांनी श्री साईबाबा संस्थान, शिर्डीचे व्यवस्थापनासाठी तयार केलेल्या व मान्य केलेल्या योजनेनुसार व आताचे अधिनियमातील तरतुदीनुसार श्री साईभक्तांचे भक्तमंडळ अस्तित्वात असून, या भक्तमंडळ सभासदत्वाचे आश्रयदाते,आजीव व सर्वसाधारण(वार्षिक)सभासद असे तीन प्रकार उपलब्ध आहेत.

मा. धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी पूर्वी मंजूर केलेप्रमाणे, भक्तमंडळ सभासदत्वासाठी निश्चित शुल्क आकारले जाते. भक्तमंडळाचे सर्व सभासदांना संस्थानमार्फत साजऱ्या करण्यात येणाऱ्या तीनही उत्सवाची निमंत्रणपत्रिका व उदीप्रसाद पोष्टाने पाठविला जात आहे. अहवाल वर्षअखेर दिनांक ३१ मार्च, २०१४ रोजी भक्तमंडळाची सभासदांची संख्या खालीलप्रमाणे :

| अ.नं. | सभासद प्रकार | सभासद शुल्क | सभासद संख्या |
|---|---|---|---|
| १ | आश्रयदाते सभासद | रुपये १,५००/– (एका वेळेस) | ३३,८८० |
| २ | आजीव सभासद | रुपये २५१/– (एका वेळेस) | १,६७,५७८ |
| ३ | सर्वसाधारण सभासद | रुपये ११/– (प्रति वर्ष) | २,४३१ |
| | | **भक्तमंडळाची एकूण सभासद संख्या –** | **२,०३,८८९** |

# विश्वस्तव्यवस्थेमार्फत देणेत येणाऱ्या सेवा-सुविधा

श्री क्षेत्र शिरडी येथे भेट देणाऱ्या साईभक्तांना विविध प्रकारच्या सेवा–सुविधा पुरविण्यात येतात. त्याचा थोडक्यात गोषवारा पुढीलप्रमाणे :

**● निवासस्थान सुविधा :–**

विश्वस्तव्यवस्थेकडून साईभक्तांच्या सोयीसाठी सर्वमुलभूत सेवा २४ तास उपलब्ध करविण्यातआलेल्या आहेत. यासेवेत अत्यंत महत्वाच्या अशा निवासव्यवस्थेसाठी विविध प्रकारची, अद्ययावत सोयींनीयुक्त परिपूर्ण निवासस्थाने, सर्व स्तरातीलसाईभक्तांना त्यांच्या आर्थिक
क्षमतेनुसार उपलब्ध आहेत.तसेच अतिमहत्वाच्या व्यक्तींसाठी वातानुकूलीतकक्ष तयार करण्यात आलेले आहेत. सध्या विश्वस्तव्यवस्थेकडे उपलब्ध असलेली निवासस्थाने, त्यांचे प्रकार,खोल्यांची संख्या, सेवाआकार आदि माहिती दर्शविणारा तक्ता पुढीलप्रमाणे :

| अ.नं. | निवास संकुलाची नांवे | प्रकार | एकूण खोल्या | सेवा आकार / प्रति दिवस |
|---|---|---|---|---|
| **(अ) साईप्रसाद निवासस्थान विभाग – २,१७,४७१ साईभक्तांनी लाभ घेतला.** | | | | |
| १ | श्री साईनिवास अतिथीगृह | वातानुकूलीत सूट | २४ | रु.८००/– |
| २ | साईप्रसाद १ इमारत | मध्यम खोल्या | ८५ | रु.१००/– व रु.१५०/– |
| ३ | साईप्रसाद २ इमारत | लहान खोल्या | ५४ | रु.२२५/– |
| | | मध्यम खोल्या | १८ | रु.३००/– |
| | | मोठया खोल्या | ६ | रु.४००/– |
| ४ | साईउद्यान इमारत | हॉल | १२ | रु.४००/– |
| | | मध्यम खोल्या | २० | रु.१००/– |
| | | लहान खोल्या | १६ | रु.५०/– |
| | | लॉकर्स | ९९ | रु.१०/प्रत्येकी |
| ५ | साईनाथ मंगल कार्यालय | हॉल (२०० व्यक्तीं) | २ | रु.१०००/– |
| ६ | साईनाथ छाया इमारत | हॉल (२०० व्यक्ती) | १ | रु.१०००/– |
| ७ | शांतीनिकेतन इमारत | मध्यम खोल्या | १५ | रु.२००/– व रु.३००/– |
| ८ | समर्पण इमारत | साध्या खोल्या | २ | रु.२००/– |
| ९ | सेवाधाम इमारत | साध्या खोल्या | ६० | रु.५०/– |
| **(ब) श्री साईबाबा भक्तनिवासस्थान विभाग–१,५१,०४७१ साईभक्तांनी लाभ घेतला.** | | | | |
| १० | श्री साईबाबा भक्तनिवासस्थान इमारत | वातानुकूलीत खोल्या | १५ | रु.५५०/– |
| | | साध्या खोल्या | ३९९ | रु.१५०/– |
| | | मध्यम खोल्या | ८५ | रु.४५०/– |
| | | हॉल्स (४० व्यक्ती) | २ | रु.५००/– |
| | | स्टोअर हॉल्स | ११ | रु.३००/– |
| | | लॉकर्स | १९८ | प्रती व्यक्ती रु.१०/– |

| अ.नं. | निवास संकुलाची नांवे | प्रकार | एकूण खोल्या | सेवा आकार / प्रति दिवस |
|---|---|---|---|---|
| | **(क) व्दारावती भक्तनिवासस्थान विभाग – ७,८४,७२९ साईभक्तांनी लाभ घेतला.** | | | |
| ११ | व्दारावती भक्तनिवासस्थान विभाग | वातानुकूलित खोल्या | ८० | रु.९००/– |
| | | साध्या खोल्या | २३६ | रु.५००/– |

| अ.नं. | निवास संकुलाची नांवे | प्रकार | एकूण खोल्या | सेवा आकार / प्रति दिवस |
|---|---|---|---|---|
| | **(ड) साईआश्रम भक्तनिवासस्थान विभाग १९,१७,१८४ साईभक्तांनी लाभ घेतला.** | | | |
| १२ | साईआश्रम भक्तनिवासस्थान एकुण १२ इमारती | वातानुकूलीत खोल्या | ३८४ | रु.५००/– (०३ व्यक्तींकरीता) |
| | | मध्यम खोल्या | ११५२ | रु.२००/– (०३ व्यक्तींकरीता) |

| अ.नं. | निवास संकुलाची नांवे | प्रकार | एकूण खोल्या | सेवा आकार / प्रति दिवस |
|---|---|---|---|---|
| | **(इ) साईआश्रम धर्मशाळा विभाग ५,२९,७४७ साईभक्तांनी लाभ घेतला.** | | | |
| १३ | साईधर्मशाळा एकुण ०७ इमारती | हॉल्स | १९२ | पालखी पदयात्री व मोठया गटाने येणा–या साईभक्तांना विनामुल्य निवास व्यवस्था उपलब्ध करुन देणेत येत आहे. भक्तांचे इच्छे नुसार देणगी पावती करणेत येत आहे. |

उपरोक्तप्रमाणे, एकुण विविध प्रकारच्या २८७१खोल्या / हॉल्स व २९७लॉकर्स उपलब्ध आहेत.

निवासस्थान इमारतींपैकी श्री साईबाबा धर्मशाळेच्या इमारतींमध्ये संस्थान तर्फे चालविले जाणारे श्री साईनाथ रुग्णालय हे तूर्त स्थलांतरीत करण्यांत आलेले असल्याने, सध्या या इमारतीतील निवासी खोल्या भक्तांसाठी उपलब्ध करुन दिल्या जात नाही.

तसेच उपरोक्त पैकी साईउद्यान, शांतीनिकेतन, समर्पण, शांतिनिकेतन, सेवाधाम या इमारती पाणीटंचाईमुळे तसेच साईआश्रम प्रकल्पांतर्गत एकाच ठिकाणी नव्याने मोठया प्रमाणावर निवासी व्यवस्था उपलब्ध झाल्याने तूर्त बंद ठेवणेत आलेल्या आहेत.

सर्व साईभक्तांची निवास व्यवस्था व्हावी, त्यांना विनासायास निवासस्थाने उपलब्ध व्हावीत या हेतूने भक्तांना एका वेळेस जास्तीत जास्त ०२दिवस राहण्यासाठी परवानगी दिलीजाते. तसेच आवश्यकतेप्रमाणे अल्प दरात जादा गाद्या, चादरी उपलब्ध करुन दिल्या जातात. या सर्व निवासस्थानांमधून २४ तास पाणी व विद्युत सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

- **सुलभ शौचालय व प्रसाधनगृह :–**

जे साईभक्त मुक्कामी न थांबता, दर्शन घेऊन लगेचच परतणार आहेत, अशा भक्तांसाठी प्राथमिक सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी संस्थानने रुपये १.४३ कोटी खर्च करुन १२० प्रसाधनगृहे व १२० शौचालयाची सोय असलेली दोन मजली सुलभ शौचालयाची इमारत बांधलेली असून, **सुलभ इंटरनॅशनल मार्फत** सदर ठिकाणी दैनंदिन व्यवस्थापन केले जाते.

- **अल्पोपहार सुविधा :–**

संस्थान परिसरातील तसेच दर्शन रांगेतील भक्तांना उपहारगृहाव्दारे (कॅन्टीन) २४ तास **चहा, कॉफी, दूध, बिस्किटे व मिनरल वॉटर** सुविधा पुरविली जाते. तसेच सकाळी ०६ ते १० यावेळेत नाष्टा पाकिटे महिला बचत गटामार्फत तयार करुन घेऊन साईभक्तांना उपलब्ध केली जातात. उपहारगृहामार्फत उपलब्ध करुन देणेत येणारे सर्व पदार्थ सवलतीच्या व वाजवी दरामध्ये भक्तांसाठी उपलब्ध आहेत. नाष्टा पाकिटाच्या एका पाकिटात पुऱ्या, सुकी भाजी, मिष्टान्न असे पदार्थ उपलब्ध करुन दिले जातात. उपहारगृहात पार्ले, ब्रिटानिया, सनफिस्ट आदि कंपन्यांची बिस्किटे कंपनी दरात उपलब्ध करुन दिली जातात.

- **प्रसाद लाडू सुविधा :–**

श्री साईबाबांचा प्रसाद म्हणून साईभक्तांना प्रत्येकी सुमारे ५० ग्रॅमचे ०३ मोतीचूर लाडूचे पाकिट रुपये १०/– या सवलतीच्या दरामध्ये उपलब्ध करुन देण्यात येते. मोतीचूर लाडू शुध्द गावरान तूपात काजू, बेदाणे, वेलची आदि सुकामेव्यांसह बनविले जात असल्याने, ते अत्यंत चविष्ट असतात. भक्तांना लाडू प्रसाद सोबत घेऊन जाणे सोयीचे व्हावे यासाठी हे लाडू चांगले सुकवून प्लॅस्टिक पिशवीत पॅक केले जातात. यामुळे प्रसाद लाडूंना साईभक्तांकडून मोठया प्रमाणावर मागणी असते. प्रतिदिनी सरासरी ४० ते ४५ हजार लाडू पाकिटांची मागणी होत असल्याने, साईभक्तांना ते सुलभपणे उपलब्ध व्हावेत म्हणून दोन स्वतंत्र कंत्राटदारांमार्फत प्रसाद लाडू तयार करुन घेणेत येत आहेत.

अहवाल सालात, गेल्या वर्षाचे तुलनेत उपहारगृह विभागामार्फत भक्तांना विविध ठिकाणी उपलब्धकरुन देण्यांत आलेल्या सोयीमुळे प्रसाद लाडू, चहा, कॉफी, दूध, विक्रीमध्ये मोठी वाढ झालेली आहे. त्याचा तुलनात्मक तपशील खालीलप्रमाणे :

| अ. नं. | तपशील / दर रुपये | सन २०११–१२ एकुण विक्री | सन २०१२–१३ एकुण विक्री | सन २०१३–१४ एकुण विक्री |
|---|---|---|---|---|
| ०१ | **प्रसाद लाडू** (०३ लाडूंचे पाकिट) रु.१०/– प्रति पाकिट | १,७५,२४,१७६पाकिटे | १,८८,७६,४६९पाकिटे | ५६,१०,८६५ पाकिटे |
| | **प्रसाद लाडू** (०३ लाडूंचे पाकिट) रु.२०/– प्रति पाकिट | दिनांक १५ ऑगष्ट, २०१३ पासून | | ३९,४४,२६८ पाकिटे |
| ०२ | **नाष्टा पाकिटे** रु.०४/– प्रति पाकिट | १७,८९,०२५पाकिटे | २०,२५,५९४पाकिटे | ३५,३१,८५७पाकिटे |
| ०३ | **चहा** रु.०१/– प्रति कप | ९१,२८,९१९कप | ९४,६१,४००कप | १,४६,४६,४०१ कप |
| ०४ | **कॉफी** रु.१.५० प्रति कप | १९,३५,२१४कप | १९,५५,२२०कप | ३२,८४,३३८ कप |
| ०५ | **दूध** रु.१.५० प्रति कप | १५,५८,२२०कप | १७,८४,२०३कप | ३३,०७,२०३ कप |
| ०६ | **मोफत प्रसाद लाडू वाटप** (०२ लाडूंचे पाकिट) | दिनांक १५ ऑगष्ट, २०१३ पासून | | १,१७,९२,२५० पाकिटे |

- **प्रसादालय भोजन सुविधा :-**

**( माहे सप्टेंबर, २०१३ मध्ये ISO-२२०००-२००५ मानांकन प्राप्त सुविधा )**

शिर्डीत येणाऱ्या साईभक्तांच्या सुविधेसाठी, मुलभूत सेवेपैकी दुसरी आवश्यक अशी प्रसाद भोजनाची सुविधा आहे. श्री क्षेत्र शिर्डी येथे भेट देणाऱ्या साईभक्तांना प्रसाद भोजनाची सुविधा विनासायास, विनाविलंब प्राप्त व्हावी, या दृष्टीने, तळमजल्यावरील व पहिल्या मजल्यावरील भोजनकक्ष मिळून एकाच वेळेस ५५०० भक्त प्रसाद भोजन घेऊ शकतील अशा क्षमतेची श्रीसाई प्रसादालयही सर्व सोयी-सुविधांयुक्त अद्ययावत इमारत भक्तांच्या सोयीसाठी दिनांक ०८ जानेवारी, २००९ पासून पूर्ण क्षमतेने उपलब्ध करुन देण्यात आली आहे. प्रसाद भोजन जलद व चवदार बनविणेसाठी खालील देशी-विदेशी बनावटीच्या यंत्रणा व मशिनरीचा उपयोग करुन घेणेत येत आहे :

| | | | |
|---|---|---|---|
| १) | चपाती मशिन्स | २) | आटा मळणी यंत्र |
| ३) | डिश वॉशिंग मशिन | ४) | मसाला ग्राईंडर |
| ५) | व्हेजिटेबल / राईस वॉशर | ६) | व्हेजीटेबल प्रोसेसर मशिन |
| ७) | ओनियन पिलर मशिन | ८) | गार्लिक पिलर मशिन |
| ९) | बटर मिक्सर | १०) | ऑनलाईन चक्की युनिट |
| ११) | स्टीम बॉयलर | १२) | सोलर स्टीम कुकींग सिस्टिम |
| १३) | थर्मिक फ्लुईड हिटींग यंत्रणा | १४) | आर. ओ. प्लँन्ट |
| १५) | माऊंटेड एल.पी. गॅस प्लॅन्ट | १६) | भाजीपाला व ड्रायफुट कोल्ड स्टोअरेज |
| १७) | फायर हायड्रन्ट यंत्रणा | १८) | हायड्रोलिक ट्रॉलीज् |

प्रसाद भोजन बनविणसाठी वर नमुद केलेल्या मशिनरींचा वापर केल्याने, मानवी श्रमांत बचत तर झालीच आहे, त्याबरोबर कमी वेळेत भक्तांना स्वच्छ व स्वादिष्ट प्रसाद भोजन उपलब्ध होत आहे.सध्या दररोज सकाळी १० वाजेपासून ते रात्रौ १० वाजेपर्यंत अशी अविरत १२ तास, प्रौढांना रु.१०/- व लहान मुलांना रु.५/- या सवलतीच्या दरात पोटभर प्रसादभोजन उपलब्ध करुन देण्यात येत आहे. प्रसाद भोजनात भात, वरण, चपाती व दोन भाज्या, मिष्टान्न असे पदार्थ देण्यात येतात. प्रसाद भोजनातील चपात्या कंत्राटदाराकडून बनवून घेण्यात येतात, तसेच चपाती मशिन्सचाही वापर करणेत येत आहे.

प्रसादालयासाठी आवश्यक असणारा ताजा भाजीपाला हा शिर्डी, राहाता येथील बाजारातून लिलाव पध्दतीने खरेदी करुन आणला जातो. या व्यतिरीक्त संस्थानच्या शेतीमधून उपलब्ध होणारा ताजा भाजीपाला देखील वापरला जातो. प्रसादालयासाठी आवश्यक किराणामाल, कडधान्य, मसाला वगैरे माल खरेदी विभागामार्फत स्वतंत्रपणे निविदा मागणी करुन, वार्षिक दर निश्चित करुन खरेदी करणेत येतो. प्रतिदिनी साधारणपणे ४० हजारापर्यंत साईभक्त प्रसादालयामध्ये प्रसाद भोजनाचा लाभ घेतात. उत्सव व गर्दीच्या काळात ही संख्या प्रतीदिन ६५ हजारापर्यन्त जाते. गेल्या तीन वर्षात प्रसाद भोजन घेणाऱ्या भक्तांच्या संख्येत होणारी वाढ दर्शविणारा तक्ता खालीलप्रमाणे :

| अ.नं. | वर्ष | वर्षभरात प्रसादभोजन घेणाऱ्या भक्तांची सरासरी संख्या | प्रतिदिन प्रसादभोजन घेणाऱ्या भक्तांची संख्या |
|---|---|---|---|
| ०१ | माहे एप्रिल, २०११ ते मार्च, २०१२ | १,२४,३६,७०६ | ३४,०७३ |
| ०२ | माहे एप्रिल, २०१२ ते मार्च, २०१३ | १,३९,२५,३४१ | ३८,१५२ |
| ०३ | माहे एप्रिल,२०१३ ते मार्च,२०१४ | १,३१,१०,२६३ | ३५,९१९ |

प्रसादालयात अन्नपदार्थ तयार करणेसाठी खरेदी केलेला किराणा माल व अनुषंगिक साहित्य, अन्न व औषध प्रशासनाच्या मानकाप्रमाणे तपासणीकामी स्वतंत्र प्रयोगशाळा उभारणी करणेचे काम प्रगतीपथावर आहे.

- **अन्नदान सुविधा :-**

  जो भक्त शिरडीत येईल तो कधीही भुकेलाकिंवा उपाशी राहू नये यासाठी श्री साईबाबा स्वतः च्या हातांनी व्दारकामाईमध्ये भोजन तयार करीत व गरीब, भुकेल्या भक्तांना जेऊ घालीत असत. ही शिकवण लक्षात ठेवून, प्रतिदिनी सुमारे १५०० गरीब, गरजू व अपंग व्यक्तींना प्रसादालयाजवळील स्वतंत्र अन्नदान कक्षात दिवसातून दोन वेळेस मोफत अन्नदानाची व्यवस्था केलेली आहे.या व्यतिरिक्तपरिसरातील मुकबधीर, अंध, अपंग शाळेतील विद्यार्थ्यांना, वृध्दाश्रमातील वृध्द आदिंना विनामुल्य अन्नदान करणेत येत आहे.

## इतर विभागांच्या सेवा

- **जनसंपर्क विभाग :-**

  या विभागामार्फत श्री क्षेत्र शिर्डी येथे येणाऱ्या साईभक्तांना दर्शन, निवास, प्रसादभोजन आदि सुविधांच्या उपलब्धते बाबत मार्गदर्शन करणे, सहाय्य करणे, श्री साईंच्या जीवनकार्या विषयी, संस्थान मार्फत साजरे करणेत येणारे उत्सव, विविध कार्यक्रम-उपक्रम आदिंची वृत्तपत्रातून प्रसिध्दी करणे, संस्थान व्यवस्थापनाच्या निर्णयानुसार वृत्तपत्रांतून जाहिराती प्रसिध्द करणे इत्यादी कामे केली जातात.

- **लेखाशाखा :-**

  या विभागामार्फत आर्थिक प्रशासनाचे काम पार पाडले जाते. यामध्ये प्रामुख्याने लेख्यांमधील नोंदी, दक्षिणा पेटीतील रोख रक्कम व इतर मौल्यवान वस्तूंची मोजणी, देणगी कार्यालयांचे नियोजन, उपलब्ध होणाऱ्या निधींची गुंतवणूक, विविध देयकांच्या रक्कमांची अदायगी, प्रसाद रुपाने कापड, वस्तू, सोने-चांदीचे पेंडंटस् - नाणी उपलब्ध करुन देणे, संस्थानच्या चल-अचल मालमत्तेचा, सोने-चांदी वस्तूंचा, कर्मचाऱ्यांचा विमा उतरविणे, लेख्यांचे नियमीत लेखापरिक्षण करविणे आदि कामे पार पाडली जातात. संस्थानमधील सर्व प्रकारच्या आर्थिक व्यवहारावर नियंत्रण रहावे, त्याची वेळीच तपासणी व्हावी यासाठी पूर्वलेखापरीक्षक आणि अंतर्गत लेखापरिक्षकांची नेमणूक करण्यात आलेली आहे. देश-विदेशातील साईभक्तांना घरबसल्या संस्थानला देणगी देता यावी म्हणून नेटबँकिंग व पेमेंट गेट-वेव्दारे ऑनलाईन देणगी सुविधा सुरु करण्यात आलेली आहे. नेटबँकिंग सुविधेअंतर्गत स्टेट बँक ऑफ इंडिया,

युनियन बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ बडोदा, एचडीएफसी बँक, आयसीआयसीआय, सेंट्रल बँक ऑफ इंडिया या बँकांच्या सेवा तर पेमेंट गेट–वे अंतर्गत डेबिट / क्रेडिट कार्डव्दारे देणगी स्वीकारणेसाठी एचडीएफसी बँक व आयसीआयसीआयबँक या बँकेच्या सेवा उपलब्ध करुनदेण्यात आल्या आहेत. या ऑनलाईन देणगी सुविधा संस्थानच्या www.sai.org.in व www.online.sai.org.in या अधिकृत संकेतस्थळावर (वेबसाईटवर) तसेच उपरोक्त बँकांच्या संकेतस्थळांवर उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

या व्यतिरिक्त, भक्तांना देणगी देणेसाठी स्वत: सोबत मोठी रोख रक्कम बाळगण्याची व त्यासाठी जोखीम उठविणेची आता गरज नाही. कारण मंदिर परिसरातील देणगी कार्यालयांमध्ये EDC मशीनव्दारे एचडीएफसी व आयसीआयसीआय या बँकांचे डेबिट / क्रेडिट कार्डव्दारे देणगी स्वीकारणेची सुविधा उपलब्ध करुन देणेत आली आहे.

तसेच आठवडयातून साधारणत: दोन वेळेस तसेच भक्तांच्या गर्दीनुसार आवश्यक वेळी दक्षिणा पेटीतील दानाची मोजणी करण्यात येते. या कामी मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर यांचेप्रतिनिधी,राष्ट्रीयीकृत बँकेचे प्रतिनिधी,संस्थानने नेमलेले सोने–चांदीचे मुल्यांकनकार, संस्थानचे अधिकारी यांचेसह संस्थानचे अंदाजे १५० कर्मचारी आणि अंदाजे १५० ते २००साईभक्त हे उपस्थित असतात. साईभक्तांच्या सहभागामुळे दक्षिणा पेटी मोजणीमध्ये अधिकाधिक गतीमानता, पारदर्शकता व विश्वासार्हता निर्माण झाली आहे.

- **संरक्षण विभाग :–**

श्री साईभक्तांना संस्थान परिसरात सुरक्षितपणे वावरता यावे, रांगेमध्ये व गर्दीच्या ठिकाणी शिस्त रहावी आदी सर्व दक्षता संरक्षण विभागाकडून घेणेत येते. सध्या संरक्षण विभागाचे प्रमुख (संरक्षण अधिकारी) म्हणून महाराष्ट्र शासनाकडून प्रतिनियुक्तीवर आलेले पोलिस उपनिरीक्षक या दर्जाचे अधिकारी काम पहात आहेत. संरक्षण अधिकाऱ्याचे अधिपत्याखाली संस्थानचे **१५० स्थायी संरक्षण कर्मचाऱ्यांसह** ०४ खाजगी ठेकेदारांमार्फत सुमारे **७१९ कंत्राटी सुरक्षा रक्षक** (बंदूकधारी सुरक्षारक्षकांसह) सुरक्षा व्यवस्थेसाठी नेमण्यात आलेले आहेत.

याशिवाय सुरक्षेसाठी स्वतंत्र अत्याधुनिकसीसीटीव्ही यंत्रणा उभारण्यातआली आहे. कोणत्याही प्रकारची अनुचित घटना घडू नये यासाठी महाव्दारे तसेच दर्शनरांग,प्रवेशव्दार इत्यादी ठिकाणी नियमीत तपासणीसाठी मेटल डिटेक्टर उभारण्यात आलेले आहेत. तसेच आवश्यक तेथे सशस्त्र पहारेकऱ्यांची व्यवस्था करण्यात आली आहे. याशिवायसुरक्षा रक्षकांना बॅगेज स्कॅनर, डोअरफ्रेम मेटल डिटेक्टर,हॅन्ड मेटल डिटेक्टरही उपलब्ध करवून देण्यात आलेले आहेत. खात्याच्याअंतर्गत संपर्कासाठी वॉकी–टॉकी यंत्रणाही कार्यरत आहे. याशिवाय ज्या भक्तांचे पैसे हरवले,चोरीला गेले अशा भक्तांना भक्त मदत फंडातून आपले स्वस्थळी पोहचण्यासाठी प्रवास भाडे रक्कमेची मदत केली जाते.

देशातील विविध धार्मिक स्थळांमध्ये अतिरेक्यांकडून बॉम्बस्फोट घडवून आणून दहशत निर्माण केली जात आहे. त्यासाठी गृहविभाग,पोलिसखातेइत्यादींचे मार्गदर्शनाने व्यापक अत्याधुनिक संरक्षण व्यवस्था कार्यान्वीत करणेत आली आहे. या सुरक्षा व्यवस्थेचे दररोजचे नियंत्रण व परिक्षण करणेसाठी

स्वतंत्र नियंत्रण कक्ष (कंट्रोलरुम) कार्यान्वीत करणेत आलेले आहे.

भक्तांच्या सुरक्षिततेसाठी शासनाकडून उपलब्ध झालेले पोलिस अधिकारी व कर्मचारी यांचेसाठी मंदिर परिसरामध्ये उदीवाटप केंद्राजवळ कार्यालयासाठी जागा उपलब्ध करुन देणेत आलेली आहे. तसेच अहमदनगर– मनमाड राज्यमार्गावर खाजगी वाहने थांबून भक्तांच्या वाहतुकीस अडथळा निर्माण होतो म्हणून एक क्रेन व एक ४०७ ट्रकटेम्पो शिर्डी पोलिस स्टेशन यांना उपलब्ध करुन देणेत आलेलेआहे.

- **प्रकाशने विभाग :–**

प्रकाशने विभागामार्फत श्री साईबाबांच्या जीवनकार्यावर आधारीत **१६ भाषेतील श्री साईसतच्चरित्र ग्रंथांसह,** वेगवेगळ्या भाषेतीलखालीलप्रमाणे **एकूण ७६ प्रकारचीपुस्तके तसेच ३४ प्रकारचे वेगवेगळे फोटो व ११ प्रकारचे ऑडिओ / व्हिडीओ सीडी** उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. दरवर्षी वार्षिकदैनंदिनी व दिनदर्शिकाछापून प्रकाशित करण्याचे कार्यही प्रकाशने विभाग करत आहे.श्री साईंच्या जीवनावरील सर्व प्रकाशने सवलतीच्या दरात साईभक्तांना पुस्तक विक्री काऊंटर्सवर उपलब्ध करुन देण्यात आली आहेत.

**साईभक्तांना काही निवडक पुस्तकांवर २० टक्के सूट दिली जाते.**

| अ.नं. | भाषा | उपलब्ध पुस्तकांची निवडक नांवे |
|---|---|---|
| ०१ | मराठी | श्री साईसतच्चरित्र, श्री साईंचे सत्यचरित्र, शिलधी, मुलांचे साईबाबा, दैनंदिन साईबोध, साईबाबांची शिकवण व तत्वज्ञान, साईभजनामृत, साईबाबा अवतार व कार्य, सगुणोपासना, आरती, स्तवनमंजिरी, रुद्राध्याय, गुरुपाठ अभंग. |
| ०२ | हिंदी | श्री साईसतच्चरित्र, साई चरित्र दोहावली, खापर्डे डायरी, मुलांचे साईबाबा, साईलीलामृत, सगुणोपासना, स्तवनमंजिरी, साईभजनामृत. |
| ०३ | तेलगु | श्री साईसत्चरित्र, श्री साई सत्य चरित्र, मातृसाई, मुलांचे साईबाबा, पुजाविधी आरती. |
| ०४ | गुजराथी | श्री साईसत्चरित्र, मुलांचे साईबाबा, साईलीलामृत, सगुणोपासना, स्तवनमंजिरी. |
| ०५ | कन्नड | श्री साईसत्चरित्र, मुलांचे साईबाबा, स्तवनमंजिरी. |
| ०६ | तामिळ | श्री साईसत्चरित्र, खापर्डे डायरी, मुलांचे साईबाबा, सगुणोपासना. |
| ०७ | बंगाली | श्री साईसत्चरित्र, सगुणोपासना. |
| ०८ | उर्दू | श्री साईसत्चरित्र. |
| ०९ | पंजाबी | श्री साईसत्चरित्र. |
| १० | सिंधी | श्री साईसत्चरित्र. |
| ११ | नेपाळी | श्री साईसत्चरित्र. |
| १२ | ओरिया | सगुणोपासना. |
| १३ | इंग्रजी | श्री साईसत्चरित्र, खापर्डे डायरी, मुलांचे साईबाबा, साईबाबा ऑफ शिर्डी, सगुणोपासना, स्तवनमंजिरी, स्तवनमंजिरी (झरीन). |

तसेच संस्थान व्यवस्थापनामार्फत अहवाल सालात, **श्री साईबाबा दैनंदिनी व श्री साई दिनदर्शिका** वेगवेगळया प्रकारात प्रकाशित करण्यात येऊन, ना नफा ना तोटा धर्तीवर वाजवी किंमतीत साईभक्तांना उपलब्ध करवून देण्यात आलेल्या आहेत.

संस्थान व्यवस्थापनामार्फत उपलब्ध करुन देणेत आलेल्या विविध मुद्रित, दृकश्राव्य प्रकाशने विक्री संख्येची गेल्या ०३ वर्षातील तुलनात्मक माहिती खालीलप्रमाणे :

| अ.नं. | कालावधी (वर्ष) | मुद्रित ( पुस्तके / फोटो) विक्री संख्या | दृक-श्राव्य प्रकाशने विक्री संख्या | श्री साई दैनंदिनी / दिनदर्शिका विक्री संख्या |
|---|---|---|---|---|
| ०१ | सन २०११-१२ | १६९२५१८ | ७६७९९ | ८९६६३७ |
| ०२ | सन २०१२-१३ | १३१६०२३ | ६२०१२ | ८८६०५९ |
| ०३ | सन २०१३-१४ | १३७९६३९ | ६०११६ | ६६११०० |

याव्यतिरिक्त,संस्थान व्यवस्थापनाने चेन्नई (तामीळनाडू), सिकंदराबाद (आंध्रप्रदेश) व बंगलोर (कर्नाटक) या विविध राज्यातील ०३ महानगरांमध्ये भक्तांना माहिती सुविधा केंद्राची सुविधा उपलब्ध करुन दिलेली आहे. या माहिती सुविधा केंद्रातूनही भक्तांना उपरोक्त प्रकाशने विक्रीसाठी उपलब्ध करुन दिलेली आहेत.

तसेच अहवाल सालात, उपरोक्त संस्थान प्रकाशने ऑनलाईन खरेदीसाठी उपलब्ध करुन देणेत आलेली आहे.

- **माहिती तंत्रज्ञान विभाग :-**

विश्वस्तव्यवस्थेचे दैनंदिन कार्यालयीन कामकाजात गती व अचूकता यावी, वेळेची व मानवी श्रमांची बचत व्हावी यादृष्टीने संगणकीय कार्यप्रणाली कार्यान्वीत करण्यात आलेली असून, सर्व कार्यालये संगणक कार्यप्रणालीव्दारे एकमेकांशी जोडण्यात आलेली आहेत. सध्या संगणकीय कार्यप्रणालीव्दारे देणगी कार्यालयात देणगी स्वीकारणे, अंतर्गत दूरध्वनी योजनेंतर्गत सर्व कार्यालये जोडणे, संगणकीय कार्यप्रणालीचे सुसुत्रीकरण व नियंत्रण करणे आदि कामे केली जातात.

माहिती तंत्रज्ञान विभागामार्फतश्री साईबाबांच्या जीवनकार्याविषयी व विश्वस्तव्यवस्थेच्या कार्यपध्दतीविषयी अधिकृत माहिती देणारी www.sai.org.in इंग्रजी, मराठी व हिंदीतील वेबसाईट (संकेतस्थळ) सुरु करण्यात आलेली आहेत. माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत भक्तांना पुरविणेत येणाऱ्या सुविधा :

०१. श्रीं ची ऑनलाईन दर्शन सुविधा उपलब्ध करुन देणेत आली असून, दररोज साधारणत: ८ ते १० हजार साईभक्त संकेतस्थळास भेट देतात.

०२. संस्थान प्रकाशीत दहा भाषांतील श्री साईसत्चरित्र संकेतस्थळावर उपलब्ध

०३. मंदिरातील दैनंदिन कार्यक्रम, संस्थानच्या विविध सेवा-सुविधा, देणगीबाबतची माहिती,शिर्डी दर्शन, रेल्वे वेळापत्रक आदि माहिती उपलब्ध

०४. संस्थानचेअधिकृत वेबसाईटव्दारे जगातील कोणत्याही देशातून, त्या देशाचे चलनात ऑनलाईन देणगी स्वीकारणेची सुविधा सुरु करणेत आलेली आहे.

०५. साई मंदिरातील Live Darshan ही सुविधा टाटा–स्काय या डीटीएच सेवापुरविणाऱ्या कंपनीमार्फत, टाटा–स्कायची सेवा घेणाऱ्या ग्राहकांसाठी दूरचित्रवाणी व संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे. तसेच साधना व टीव्ही–९ या टी. व्ही. चॅनेल्सवरही सदर सुविधा उपलब्ध करुन देणेत आलेली आहे.

विश्वस्तव्यवस्थेचे दैनंदिन कार्यालयीन कामकाज पार पाडणेसाठी मंदिर व मंदिर परिसरात असलेली विविध कार्यालये अत्याधुनिक अशा डिजीटल अंतर्गत दूरध्वनी यंत्रणेव्दारे एकमेकांशी जोडण्यात आलेली आहेत. तसेच मा.व्यवस्थापन समिती, अधिकारी व इतर कर्मचारी वर्ग यांचेमध्ये कामकाजाचा समन्वय राहावा, संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेशी त्वरीत संपर्क साधून तातडीने कामे व्हावीत या दृष्टीने भ्रमणदूरध्वनी योजना Group Mobile System कार्यान्वीत करण्यात आलेली आहे.

साईभक्तांना सुलभ व सुरळीत सेवा उपलब्ध व्हाव्यात, प्रशासकीय कामांमध्ये अचूकता व गती यावी, त्याचे व्यवस्थापन पारदर्शक पध्दतीने व्हावे याकरीता अद्यायवत संगणकीय जाळे विकसित करणेचा साईटेक् प्रकल्प हा अंदाजे रक्कम रुपये २१.८७ कोटी मात्र खर्च असलेला प्रकल्प आऊटसोर्सिंग पध्दतीने Cognizant Technology Solutions Ltd.,Pune यांचे सहाय्याने हाती घेणेत आला आहे.

या साईटेक् प्रकल्पाव्दारे संस्थानची सर्व निवासस्थाने, श्री साई प्रसादालय, साई आश्रम प्रकल्प भाग १ व २, शैक्षणिक संकुल, रुग्णालये इत्यादी सर्व परिसरामध्ये संगणकीय जाळे उभारण्यात आलेले आहे. संस्थानच्या विविध विभागांसाठी आवश्यक ३६ संगणकीय आज्ञावली, डेटा सेंटर, डेटा रिकव्हरी सेंटर, संगणकीय साहित्य देखभाल दुरुस्ती कक्ष आदि तयार करणेत येत आहेत. याव्यतिरिक्त वायफाय, वायमॅक्स या सारख्या आधुनिक तंत्रज्ञानाव्दारे संस्थानचे मुंबई येथील शाखा कार्यालयासह, सिकंदराबाद, चेन्नई, बंगलोर, दिल्ली इत्यादी ठिकाणची माहिती सुविधाकेंद्रे शिर्डी कार्यालयाशी जोडण्यात आलेली आहेत. सर्वात महत्वाचे,www.online.sai.org.in या संकेतस्थळाव्दारे जगातील साईभक्तांना घरबसल्या निवास, दर्शन, आरती आदि सुविधांचे आरक्षण करता येईल तसेच देणगीही जमा करता येणार आहे.

- **पाणीपुरवठा विभाग :–**

अहमदनगर जिल्हा आणि प्रामुख्याने जिल्ह्याचा उत्तर भाग पर्जन्यमान कमी असल्यामुळे पाण्याच्या बाबतीत दुष्काळी समजलाजातो. श्री क्षेत्र शिर्डी सारख्या पवित्र तीर्थक्षेत्री श्रीसाईभक्तांना स्वच्छ व निर्मळ पाणी उपलब्धकरुन देण्यासाठी श्री साईबाबांच्या आशीर्वादाने संस्थान व्यवस्थापनाने सन १९९५ मध्ये सुमारे १कोटी रुपये गुंतवून राज्यशासनाच्या सहकार्याने स्वतंत्र व परिपूर्ण अशी ३३२ दशलक्ष लिटर्स साठवण क्षमतेची शिर्डी संस्थान–कनकुरी–पिंपळवाडी पाणी पुरवठा योजना कार्यान्वीत केली आहे.

या पाणीपुरवठा योजनेअंतर्गत मौजे कनकुरी, तालुका राहाता शिवारात ०३ साठवण तलाव असून त्यांची साठवणुक क्षमता ९० दशलक्ष लिटर्स, २२७ दशलक्ष लिटर्स व १५ दशलक्ष लिटर्स अशी

आहे. या पाणीपुरवठा योजनेस नाशिक पाटबंधारे विभाग, नाशिक यांचेकडून अहवाल सालात १७१.४० कोटी लिटर्स पाणीपुरवठा करणेत आलेला असून, त्यापोटी संस्थानने रक्कम रुपये ६.४७ लक्ष मात्र पाणीपट्टी कर शासनाकडे भरलेला आहे. या पाणीपुरवठा योजनेतून कनकुरी व पिंपळवाडी या गावासह संस्थानच्या विविध भक्तनिवास इमारती, प्रसादालय, रुग्णालये व कर्मचारी निवासस्थाने इत्यादींना प्रतिदिनी ४० ते ४५ लाख लिटर्स स्वच्छ व शुध्द सुरक्षित पिण्याचे पाणी अखंड पुरविण्यात येत आहे.

स्वच्छ व शुध्द पाणीपुरवठा करणेसाठी संस्थानमार्फत ब्लिचिंग पावडर, ॲलम(तुरटी) व क्लोरीन गॅस योग्य प्रमाणात वापरणेत येत आहे. या योजनेंतर्गत पुरवठा करण्यात येणाऱ्या पाण्याचेविभागांतर्गतयंत्रणेव्दारे तसेच शासनाच्या आरोग्य विभागाच्या प्रयोगशाळेमध्ये नियमीत तपासणी करणेत येते.

तसेच रुग्णालये, व्दारावती निवासस्थान परिसरात वापरणेत येणाऱ्या पाण्यावर सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पाव्दारे प्रक्रिया (रिसायकलिंग) करणेत येऊन, त्याचा साईनगर व व्दारावती परिसरातील बगीचासाठी पुनरवापर करणेत येतो. अशाच प्रकारे साईआश्रम प्रकल्पांमध्येही वापरणेत येणाऱ्या पाण्याचे रिसायकलींग करुन ते प्रसाधनगृहातील फ्लशसाठी वापरण्याचे नियोजन आहे.

गेल्या काही वर्षात साईबाबांच्या दर्शनासाठी शिर्डीत येणाऱ्या साईक्तांच्या संख्येत वाढ झालेली आहे व येथूनपुढेही अशीच वाढ होण्याची शक्यता आहे. त्यासाठी संस्थानने व्दारावती व साईआश्रम प्रकल्प १ व २ हे निवासी प्रकल्प भक्तांच्या तात्पुरत्या निवासव्यवस्थेसाठी उपलब्ध करुन दिलेले आहेत, तसेच एकाचवेळी ५००० साईभक्त प्रसादभोजनाचा लाभ घेऊ शकतील असे श्री साई प्रसादालय कार्यान्वीत केलेले आहे. या सर्वांसाठी पाण्याची फार मोठया प्रमाणावर गरज भासणार आहे. त्यासाठी संस्थानने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे माध्यमातून कार्यवाही सुरु केली आहे.

- **बगीचा विभाग :-**

या विभागामार्फत संस्थानच्या हद्दीत व मंदीर परिसरामध्ये असलेलेवृक्ष, नारळाची झाडे, बगीचा,फुलझाडे व लॉन यांची निगा राखून परिसर सुशोभित करण्यात येत आहे. बगीचा विभागात गुलाब गार्डन, ग्रीन हाऊस इत्यादी तयार केलेली असून मंदिरास लागणारी फुले याच बगीचामधून उपलब्ध होत आहेत.

बगीचा विभागामार्फत व्दारावती भक्तनिवास परिसरात नयनरम्य बगीचा विकसित करणेत आला असून, यामध्ये मुलांसाठी विविध प्रकारची खेळणी उपलब्धकरुन देणेत आली आहे. या बगीचामध्ये सुश्राव्य संगीताच्या श्रवणात सर्व वयोगटातील ग्रामस्थ, कर्मचारी व साईभक्त फिरणे, व्यायाम करणे आदि प्रकारांचा आनंद दररोज लुटतात.

राहाता नगरपरिषद, शिर्डी नगरपंचायत व संस्थान यांचे संयुक्त विद्यमाने१५ मेट्रीक टन क्षमतेचा घनकचरा विघटन प्रकल्प कार्यान्वीत केला असून, हा प्रकल्प कार्यान्वीत करुन संस्थानने सामाजिक बांधिलकी जोपासली आहे.

- **विद्युत विभाग :-**

मंदिर व मंदिर परिसरासह संपूर्ण संस्थान परिसरातील निवासस्थान इमारती, धर्मशाळा,

रुग्णालये, कर्मचारी वसाहत आदि ठिकाणी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीतर्फे पुरविण्यात येणाऱ्या वीज वितरणावर विद्युत विभागामार्फत नियंत्रण व संचलन ठेवले जाते. वीज वितरण कंपनीचा वीज पुरवठा खंडीत झालेस विद्युत विभागामार्फत संस्थान परिसरात विविध ठिकाणी विविध क्षमतचे **एकूण १७ विद्युत जनित्रे** कार्यान्वीत असून, त्याव्दारे विनाखंडीत विद्युत पुरवठा करण्यात येत आहे. याव्यतिरिक्त श्री साईंचे नियमित निघणारे रथ–पालखी मिरवणुकीसाठी १५ केव्हीए क्षमतेच्या ०१ स्वतंत्र जनरेटरची सुविधा उपलब्ध करुन देणेत आली आहे. एनर्जी सेव्हींगसाठी सुधारीत यंत्रणा वापर करणेत येत आहे. तसेच पोष्ट भोयरे पठार, तालुका व जिल्हा अहमदनगर येथे रुपये १५.४० कोटी खर्चून २.५ मेगावॅट क्षमतेचा पवन ऊर्जा प्रकल्प कार्यान्वीत केलेला असून, त्याव्दारे अहवाल सालात **५०,६२,३०८ युनिट वीज** निर्मिती करण्यात येऊन महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी यांना उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. सदर पवन ऊर्जा प्रकल्पाव्दारे सन २०१३–१४ या वर्षात संस्थानला रुपये २,१८,०५,३१५/– मात्र इतकी रक्कम वीज विक्रीतून मिळाली आहे.

- **बांधकाम विभाग :–**

संस्थान परिसरातील सर्व इमारतींची देखभाल–दुरुस्ती करणे, बांधकामाची विकासात्मक कामे हाती घेऊन ती पूर्णत्वास नेणे आदि कामे बांधकाम विभागामार्फत केली जातात. सध्या या विभागामार्फत संस्थान परिसर व अनुदान तत्वावर शिर्डी गांवात विविध विकासकामे सुरु असून, त्यावर नियंत्रण ठेवणे, त्यांचे नियोजन करणे, भूसंपादन करणे आदि कामे बांधकाम विभागामार्फत केली जात आहेत. सुरु असलेल्या विकासकामांची माहिती स्वतंत्ररित्या दिली आहे.

- **वाहन विभाग :–**

श्री साईभक्त, विद्यार्थी, रुग्ण, अधिकारी व इतर कर्मचारी वर्गास वाहन विभागामार्फत वेगवेगळ्या वाहनांद्वारे सेवा दिलीजाते. वाहन विभागाकडे असलेल्या वाहनांपैकी ०९ बसेस मंदिर ते श्री साईबाबा भक्तनिवासस्थान व श्री साई प्रसादालय परिसर अशी विनाशुल्क वाहतूक सुविधा साईभक्तांसाठी पूर्णवेळ उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. संस्थानच्या शैक्षणिक संकुलात शिक्षण घेणाऱ्या परिसरातील व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची ने–आण करण्याकरीता नाममात्र शुल्क आकारुन ०९ स्कूल बसेस उपलब्ध करवून देण्यांत आलेल्या आहेत.

संस्थानच्या श्री साईनाथ व श्री साईबाबा सुपर स्पेशालिटी रुग्णालयातील रुग्णांच्या सोयी–सुविधेसाठी रुग्णवाहिका व शववाहिका नाममात्र दराने उप?ब्ध करुन दिल्या जातात.

यासाठी स्वतंत्ररित्यावाहन विभाग कार्यरत असून, या विभागाकडे, कार्यालयीन कामकाजाकरीता १० वाहने, रुग्णांलयासाठी ०६ रुग्णवाहिका, ०२ शववाहिका, शैक्षणिक संकुलासाठी ०९ बसेस, भक्तांच्या सुविधेसाठी ०९ बसेस, मालवाहतुकीकरीता लहान–मोठी ११वाहने, ०३ ट्रॅक्टर (०५ ट्रेलरसह), क्रेन ०१, टॉयलेट व्हॅन ०२ आणि कॅश व्हॅन ०१ अशी विविध १८ वाहने उपलब्ध आहेत तसेच ३ दुचाकी वाहने उपलब्ध आहेत.

या व्यतिरिक्त साई आश्रम निवासस्थान प्रकल्पाचा परिसर मोठा असल्याने, वृध्द–अपंग भक्तांच्या सोयी–सुविधेसाठी बॅटरीवर चालणारी ०४ वाहने (इलेक्ट्रीक कार) खरेदीकरणेत आलेली आलेली आहेत. अशा प्रकारे वाहन विभागाकडे सर्व प्रकारची वाहने मिळून एकुण ६८वाहने उपलब्ध आहेत.

- **खरेदी विभाग :–**

या विभागामार्फत प्रसादालय, कॅन्टीन तसेच इतर विविध विभागांना आवश्यक असणाऱ्या मालाची वार्षिक खरेदी करणेसाठी विहीत पध्दतीने निविदा / दरपत्रके, ई–निविदा यांची मागणी करुन पारदर्शकपणे कार्यवाही करण्यात येते. त्यामुळे साईभक्तांना अखंडपणे प्रसाद भोजन, प्रसाद लाडू व कॅन्टीन सुविधा पुरविल्या जातात.

यामध्ये प्रामुख्याने प्रसादालयासाठी लागणारा दैनंदिन किराणा माल, गावरान तूप, विद्युत, पाणीपुरवठा व बांधकाम विभागांना दैनंदिन देखभाल दुरुस्तीसाठी आवश्यक असणारे साहित्य, दैनंदिन कार्यालयीन कामकाजासाठी आवश्यक असणारे स्टेशनरी, फर्निचर इत्यादी साहित्य यांचा समावेश आहे.

वरीलप्रमाणे खरेदी केलेल्या तेल, तूप व इतर किराणा मालाची शासकीय प्रयोगशाळा अहमदनगर, नाशिक येथून वेळोवेळी तपासणी करण्यात येते.

- **भांडार विभाग :–**

या विभागामार्फत संस्थानच्या प्रसादालयासाठी आवश्यक गहू, हरभरा, तांदूळ, तूप व इतर किराणा माल तसेच अन्य विभागांसाठी आवश्यक विद्युत साहित्य, स्टेशनरी, पुस्तके, फोटो, कॅलेन्डर्स, सीडी/डिव्हीडी, स्वच्छता साहित्य आदिंची योग्य प्रकारे साठवणूक करुन, वेळोवेळी आवश्यकतेनुसार संबंधित विभागांना त्यांचे मागणीप्रमाणे पुरविण्यात येते.

संस्थानच्या प्रसादालय विभागासाठी मुख्यत: खरेदी केलेल्या गहू, तांदूळ, हरबरा, तेल, तूप, दाळी व इतर किराणा माल, प्रकाशने विभागांकडील विविध साईचरित्र व इतर पुस्तके, सीडी / डीव्हीडी, विविध प्रकारचे फोटो, आरोग्य, बांधकाम, बगीचा, विद्युत विभागासाठी आवश्यक विविध साहित्य व सर्व विभागांसाठी आवश्यक स्टेशनरी इत्यादी साहित्याची योग्य प्रकारे साठवणूक करणेसाठी संस्थानने शिर्डी येथील सर्व्हे नंबर १२४/१ पैकी मधील जागेत ४००० मेट्रिक टन साठवण क्षमतेचे गोडाऊन बांधलेले आहे. तसेच दैनंदिन वापरातील माल व इतर साहित्य साठवणूकीसाठी साईप्रसाद निवासस्थाने परिसरात १००० मेट्रिक या क्षमतेचे गोडाऊन उपलब्ध आहे.

- **आरोग्य विभाग :–**

या विभागामार्फत संस्थान परिसरात २४ तास स्वच्छता रहावी, या दृष्टीने दैनंदिन कामकाजाचे नियोजन करणेत आलेले आहे. दैनंदिन १६१स्थायी व २०८कंत्राटी कर्मचाऱ्यांमार्फत संस्थान परिसराची

स्वच्छता करण्यात येते. तसेच साईभक्तांचे आरोग्याचे दृष्टीने शिर्डी शहरात ही स्वच्छता राखणेकामी शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना काही प्रमाणात संस्थान मदत करीत असते. त्यामुळे एकूणच शिर्डी व संस्थान परिसरातील स्वच्छतेमुळे भक्तांचे निश्चितच समाधान होते. श्री साई प्रसादालय, साईबाबा व साईनाथ रुग्णालये, व्दारावती निवासस्थान, साईआश्रम भक्तनिवासव साई धर्मशाळा येथील स्वच्छता आऊटसोर्सिंग पध्दतीने कंत्राटदारामार्फत करण्यात येते.

- **कामगार विभाग :–**

  या विभागामार्फत संस्थान कर्मचाऱ्यांच्या रजा, सुट्टया, गैरवर्तन, कर्मचारी विषयक न्यायालयीन कामकाज पाहिले जाते. तसेच वेळोवेळी कंत्राटदार नियुक्ती व त्यांचेमार्फत संस्थानच्या विविध विभागांना आवश्यकतेनुसार कंत्राटी कर्मचारी पुरवून संस्थानचे दैनंदिन कामकाज सुरळीत पार पडेल याची दक्षता घेणेत येते.

- **अभिलेख कक्ष :–**

  या विभागामार्फत संस्थानचे विविध रेकॉर्ड, फाईल्स, दस्तऐवज शासकीय नियमानुसार अ, ब, क व ड प्रकारात जतन करुन ठेवणेत येतात. त्यासाठी आवश्यक ती उपाययोजना करणेत आलेली आहे. तसेच संस्थानच्या विविध विभागांच्या निरुपयोगी वस्तू / साहित्याचे लिलावाची कार्यवाही करणेत येते.

- **ध्वनीक्षेपण विभाग :–**

  या विभागामार्फत साई मंदिरात होणाऱ्या सर्व आरत्या व इतर कार्यक्रमांचे ध्वनीक्षेपण करणे. तसेच दर्शन रांगा व परिसरातील साईभक्तांच्या सोयीसाठी कार्यान्वीत करणेत आलेल्या सीसीटीव्ही यंत्रणेव्दारे समाधी मंदीरातील कार्यक्रम दाखविणेत येतात. तसेच संस्थान परिसरात भक्तांसाठी सूचना केंद्र चालविणेत येत आहे.

- **विधी विभाग :–**

  या विभागामार्फत संस्थानच्या विविध न्यायालयातील दाव्यांचे कामकाज पहाणे, विविध विभागांना कराव्या लागणाऱ्या करारांचे मसुदे तयार करुन देणे, तपासून देणे, भक्तांना सोयी–सुविधा उपलब्ध करुन देणेसाठी संस्थान परिसरातील उपलब्ध असलेले दुकान गाळे लिलाव पध्दतीने भाडे तत्वावर उपलब्ध करणे आदि कामे केली जातात तसेच संस्थानच्या सर्व स्थावर मालमत्तेचे अद्ययावत रेकॉर्ड ठेवणेत येते. मा. न्यायालयाने नियुक्त केलेली मा. त्रिसदस्यीय समिती संस्थान व्यवस्थापनाचे दैनंदिन कामकाज पाहत असल्याने, या समितीचे निर्णयानुसार विविध कामांसाठी मा. न्यायालयाची मंजुरी घेणेचे काम विधी विभागामार्फत करणेत येत आहे.

# अहवाल सालातील ठळक बाबी

०१) अहवाल सालातील सर्वात ठळक बाब म्हणजे, संस्थान प्रशासनाने मा. व्यवस्थापन समितीचे (मा. न्यायालयाने नियुक्त केलेल्या त्रिसदस्यीय समितीचे) निर्णयानुसार व मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांचे मान्यतेने, श्रीं चे दर्शनासाठी येणा–या साईभक्तांना दर्शन रांगेतच श्री साईंचा प्रसाद म्हणून लाडू प्रसाद (०२ लाडूंचे प्रसाद पाकिट) दिनांक १५ ऑगष्ट,२०१३ पासून मोफत वितरीत करणेस सुरुवात केली आहे. याबाबत साईभक्तांनी समाधान व्यक्त केले आहे.

०२) अहवाल सालात, श्री साई सत्यव्रत (सत्यनारायण) महापूजेचा ६५,७६० भक्तांनी तर श्री अभिषेक पूजेचा २०,३४२भक्तांनी लाभ घेतला.

०३) श्री दासगणू महाराजांची ५१ वी पुण्यतिथी दिनांक ०१ डिसेंबर, २०१३ रोजी साजरी करणेत आली, या दिवशी श्री व्दारकामाई मंदिर परिसरातील खुल्या जागेत साईभक्त व ग्रामस्थ यांचे सक्रिय सहभागातून सामुहिक स्तवनमंजिरीचा पाठ संपन्न झाला.

०४) दिनांक ०७ ऑगष्ट, २०१३ ते दिनांक १५ ऑगष्ट, २०१३ अखेर श्री साईसत्चरित्र पारायण सोहळासाजरा करणेत आला.

०५) दिनांक३१ डिसेंबर,२०१३ रोजी शिर्डी महोत्सव साजरा करणेत येऊन, नाताळ व नववर्षारंभाच्या दिवशी श्री साईंचे दर्शनासाठी होणाऱ्या अलोट गर्दीचा विचार करुन, गतवर्षी प्रमाणेच दिनांक ३१ डिसेंबर, २०१३रोजी श्री साईंचे समाधी मंदिर दर्शनासाठी रात्रभर खुले ठेवणेत आले होते.

०६) संस्थान व्यवस्थापनामार्फत श्रीं साईनाथ सगुणोपासना (आरती) ही पुस्तिका ओरिया भाषेत प्रकाशित करणेत आली.

०७) संरक्षण विभागामार्फत बिनधनी रोख रक्कम रुपये २,४९,२४९/– मात्र व रुपये ६,२०,१६९/– मात्र किंमतीच्या बिनधनी वस्तू (सोने, चांदी,घडयाळे,मोबाईल्स,कॅमेरे इत्यादी) लेखाशाखेकडे जमा करणेत आलेल्या आहेत.

०८) साईभक्तांना लाडू प्रसाद विनासायास उपलब्ध करुन देणेसाठी त्याची निर्मिती करणे, त्याचे विहित पध्दतीने संबंधित विभागांना विक्री व मोफत वाटपासाठी वितरण करणे आदि कामकाजाचे प्रभावीपणे नियंत्रण व्हावे म्हणून मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेने दिनांक ०३ जानेवारी, २०१४ पासून लाडू प्रसाद निर्मिती हा विभाग स्वतंत्ररित्या कार्यरत करणेत आला आहे.

०९) मंदिर व मंदिर परिसरात कार्यान्वीत करणेत आलेल्या सी.सी.टि.व्ही. व अद्यायवत सुरक्षा यंत्रणेचे दैनंदिन कामकाजाचे नियोजन व त्याची देखभाल सुरळीतपणे व्हावी म्हणून सी.सी.टी.व्ही. कंट्रोल सेल हा उपविभाग दिनांक २७ जानेवारी, २०१४ पासून स्वतंत्ररित्या कार्यरत करणेत आला आहे.

१०) साईभक्तांना जादा निवास व्यवस्था उपलब्ध व्हावी यादृष्टीकोनातून उभारणेत आलेल्या साईआश्रम प्रकल्पातील भाग १–साईआश्रमभक्तनिवास हा सर्वसोयींनीयुक्त असा निवासी प्रकल्प दिनांक ११ एप्रिल,२०१३ पासून भक्तांसाठी खुला करणेत आला.

११) साईभक्तांना विशेषतः पालखी पदयात्रेव्दारे येणा–या मोठया समुहाच्या / गटातील साईभक्तांना विनासायास निवास व्यवस्था उपलब्ध व्हावी यादृष्टीकोनातून उभारणेत आलेल्या साईआश्रम प्रकल्पातील भाग २–साईआश्रम धर्मशाळा हा सर्वसोयींनीयुक्त असा निवासी प्रकल्पदिनांक १८ जुलै, २०१३ पासून भक्तांसाठी खुला करणेत आला.

१२) बगीचा विभागामार्फत अहवाल सालातील तीन ही उत्सवास तसेच गुढीपाडवा, श्री दत्त जयंती निमित्त इच्छुक साईभक्तांकडून समाधी मंदिर व परिसरात देणगीदाखल फुलांची सजावट करणेत आली.

१३) संरक्षण विभागांतर्गत तूर्त सुरु असलेल्या फायर ॲण्ड सेफ्टी विभागामार्फत संस्थान आस्थापनेवरील स्थायी व अस्थायी स्वरुपात काम करणारे सुमारे ३३०० कर्मचा–यांना अग्नीप्रतिबंधक प्रशिक्षण देणेत आले.

१४) अहवाल सालात, जनसंपर्क विभागामार्फत ३,१२,४७५भक्तांनी सशुल्क दर्शन / आरती पासेस सुविधेचा लाभ घेतला, त्यापासून संस्थानला ४,९९,६२,९००/– मात्र उत्पन्न मिळाले, तर ऑनलाईन दर्शन / आरती पासेस सुविधेचा ४,८२,५५२ भक्तांनी लाभ घेतला, त्यापासून संस्थानला १०,७९,९६,६००/– मात्र उत्पन्न मिळाले.

१५) संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावरुन श्रीं ची आरती व दर्शन, देणगी, प्रसाद भोजन, खोली आरक्षण या सुविधांसाठी Online Booking System सुरु करणेत आली आहे. या खोली आरक्षण सुविधेमध्ये व्दारावती भक्तनिवास, साईबाबा भक्तनिवासस्थानव साईआश्रम भक्तनिवास इमारतीतील अनुक्रमे २७६, ३०५ व १३८२ खोल्या Online Room Booking सुविधेसाठी उपलब्ध करुन देणेत आल्या आहेत.

१६) ध्वनीक्षेपण विभागामार्फत मंदिर व मंदिर परिसर, दर्शन रांग, निवासस्थाने परिसर, श्री साई प्रसादालय परिसर आदि ठिकाणी भक्तांना श्री साईंचे दर्शन वेळोवेळी व्हावे, मंदिरातील दैनंदिन पूजा–अर्चा, आरती यांचा लाभ सुलभतेने व्हावा म्हणून ठिकठिकाणी विविध आकाराचे एलसीडी टि.व्ही. बसविणेत आलेले आहेत.

# इतर उपक्रम - रुग्णालये

अधिनियमातील कलम १७ व २१ मधील तरतुदीस अनुसरुन, विश्वस्तव्यवस्थेच्या ध्येय-धोरणांशी सुसंगत राहून, संस्थानने श्री साईबाबांची शिकवण व बाबांनी त्यांचे हयातीत गरीब व गरजूंची केलेली रुग्णसेवा लक्षात घेऊन बाबांचा रुग्णसेवेचा वारसा पुढे चालू ठेवण्यासाठी शिर्डी व परिसरातील ग्रामीण भागातील सर्वसामान्य, गोर-गरीब जनतेला वैद्यकीय सेवा उपलब्ध व्हाव्यात यासाठी साईनाथ रुग्णालय तसेच गंभीर आजारावरील उच्च दर्जाचे उपचारांचे सोयीसाठी श्री साईबाबा सुपर स्पेशालिटी हॉस्पीटल सुरु केलेले आहे. त्यांची थोडक्यात माहिती पुढीलप्रमाणे :

● **श्री साईनाथ रुग्णालय,शिर्डी** (SHRI SAINATH HOSPITAL)

गरीब व गरजू रुग्णांची सेवा हे बाबांच्या शिकवणीतलेएक मोठे तत्वज्ञान आहे आणि त्यालाच अनुसरुन श्री साईबाबा संस्थान, शिर्डी ने १९६४ साली श्री साईनाथ रुग्णालय सुरु केले आहे.

शिर्डी व शिर्डी शहराच्या जवळपास चांगली वैद्यकीय सेवा उपलब्ध नव्हती. श्री साईनाथ रुग्णालयामुळे अशी वैद्यकीय गरज पूर्ण करण्यात आली आहे. गरीब आणि गरजू रुग्णांसाठी अत्यल्प दरात वैद्यकीय सेवा येथे दिलीजाते. सध्या रुग्णालयात विविध विभागांतर्गत ३१३ खाटा उपलब्ध असून, यामध्ये ०८ खाटांच्या अतिदक्षता विभागाचाही समावेश आहे. तसेच ०२ सुसज्ज ऑपरेशन थिएटरची सुविधा उपलब्ध करुन देणेत आली आहे.

**०१) रुग्णालयातील सेवा :-**

या अत्याधुनिक तंत्रज्ञान व उपकरणाने सुसज्ञ असे रुग्णा ?यात बाह्यरुग्ण, अंतर्रुग्ण, अतिदक्षता,शस्त्रक्रिया,क्ष-किरण, सोनोग्राफी, प्रयोगशाळा आदि विभागांमार्फत गरजु रुग्णांना विविध सेवा अत्यल्प दरात पुरविल्या जातात. मंदिर परिसरातील भक्तांच्या सोयीसाठी मंदिर परिसरामध्ये कायमस्वरुपी प्रथमोपचार केंद्र असून तेथेही प्राथमिक उपचार करणेत येतात. गेल्या ०३ वर्षात रुग्णालयात विविध आजारांवर उपचार घेणाऱ्या रुग्णांची संख्या खालीलप्रमाणे :

| अ.नं. | विभागाचे नांव | उपचारार्थी रुग्णांची संख्या | | |
|---|---|---|---|---|
| | **अहवाल वर्ष** | **सन २०१०-११** | **सन २०११-१२** | **सन २०१२-१३** |
| ०१ | बाह्यरुग्ण विभाग | २,६१,८४६ | ३,०३,६६८ | २,९८,२२६ |
| ०२ | अंतर्रुग्ण विभाग | १२,००० | १३,४७० | १४,१४२ |
| ०३ | शस्त्रक्रिया विभाग | ९,००१ | १०,८९४ | १०,८९१ |
| ०४ | क्ष-किरण फोटो (एक्स-रे) | २२,४८६ | २३,८३१ | २०,७६५ |
| ०५ | सोनोग्राफी चाचणी | १०,३०६ | १०,५३० | ९,११६ |
| ०६ | प्रयोगशाळा चाचणी | ५९,७८६ | ५१,८१२ | ५१,६३२ |
| ०७ | प्रथमोपचार केंद्र - मंदिर परिसर | ३२,९९१ | ४५,०२५ | ६३,२३७ |
| ०८ | आय.सी.टी.सी. विभाग | ५,३२४ | ३,८२३ | ४,३१४ |
| ०९ | डॉट.सेंटर विभाग | १३१ | १५९ | १५१ |
| १० | दंतरोग विभाग रुग्ण | ६,०६१ | ६,६२८ | ६,०५८ |

श्री साईनाथ रुग्णालयात आकारले जाणारे दर हे इतर सर्वसाधारण रुग्णालयांच्या तुलनेत अत्यल्प आहेत. तसेच रुग्णांच्या तातडीच्या सेवेसाठी वाजवी व अल्पदरात २४ तास रुग्णवाहिका व शववाहिका उपलब्ध करुन देणेत आलेली आहे.

**२) फिरता दवाखाना :–**

अहवाल सालात, माहे जानेवारी – फेब्रुवारी, २०१३ मध्ये नांदुर्खी, वेस, बहादरापुर, रांजणगाव देशमुख, काकडी या गावांना फिरता दवाखान्याची सुविधा उपलब्ध करुन देणेत आली. तद्नंतर माहे मार्च, २०१३ पासुन या गावांमध्ये वाढ होऊन, वाळकी, पिंपळस, केलवड, निर्मळपिंप्री, चोळकेवाडी, मोरवाडी, रांजणगाव खुर्द, न.पा.वाडी, रामपुरवाडी, एकरुखे ईत्यादी गावांमध्ये फिरता दवाखान्याची सुविधा उपलब्ध करुन देणेत आली आहे. या सुविधेचा लाभ याविविध गावातील गरजू रुग्णांना झाला आहे.

रुग्णालयामार्फत शिर्डी येथील वृध्दाश्रमातील रुग्णांना विनामुल्य वैद्यकिय सेवा उपलब्ध करुन दिली जाते तसेच महिन्यातून दोन वेळेस वृध्दाश्रमात फिरते वैद्यकिय पथक पाठविले जाते.

श्री रामनवमी उत्सव काळात शिर्डी – नाशिक या रस्त्यावर पालखीतील पदयात्री साईभक्तांना फिरते वैद्यकिय पथकामार्फत वैद्यकिय सेवा उपलब्ध करुन दिली जाते.

**३) डायबेटीक केअर सेंटर :–**

अहवाल सालात, रुग्णालयात माहे नोव्हेंबर, २०१२ पासून डायबेटीक केअर सेंटर सुरु करणेत आले आहे. या डायबेटीक केअर सेंटरमध्ये प्रत्येक आठवडयास, एक दिवस (मंगळवार) डायबेटीज् रुग्णांचे निदान व औषधोपचाराचे मार्गदर्शन केले जाते. अहवाल सालात, या सुविधेचा २०३६रुग्णांनी लाभ घेतला आहे.

**४) रक्तपेढी :–**

रुग्णालयामध्ये आधुनिक व अतिशय सुसज्ज अशी रक्तपेढी कार्यान्वीत आहे. रक्तपेढीमध्ये आधुनिक पध्दतीने रक्ताची साठवण करुन गरजू रुग्णांना ते वाजवी दरात त्वरीत उपलब्ध करुन दिलेजाते. रक्तदानासारख्या महत्वाच्या दानाविषयी लोकांनाजागृत करुन रक्तपेढीने अहवाल सालात ४५० मिली. च्या एकूण ११,२९५ बाटल्या रक्त जमा करुन रुग्णांना उपलब्ध करुन देणेत आले आहे.
अहवाल सालात, मंदिर परिसरात प्रत्येक आठवडयातील गुरुवारी व रविवारी असे १०६ वेळेस तसेच शिर्डी परिसरातील विविध गावांमध्ये वेळोवेळी रक्तदान शिबीरे आयोजित करुन४,४९८ पिशव्या रक्त जमा करणेत आले.

**५) वैद्यकिय शिबीरांचे आयोजन :–**

अहवाल सालात, खाली नमुद केलेप्रमाणे विविध वैद्यकिय शिबिरांचे यशस्वीरित्या आयोजन करणेत आले :

| अ.नं. | शिबिराचे नांव | शिबिर कालावधी | लाभार्थी रुग्ण संख्या |
|---|---|---|---|
| ०१ | मोतीबिंदु शस्त्रक्रिया शिबीर | दि.०१एप्रिल, २०१३ ते ०४एप्रिल, २०१३ | १२५ |
| ०२ | किडनी स्टोन शिबीर | दि. १७ मे, २०१३ ते १९ मे, २०१३ | ०५३ |
| ०३ | मोतीबिंदु शस्त्रक्रिया शिबीर | दि. १५ जुलै, २०१३ ते १७ जुलै, २०१३ | १०१ |
| ०४ | किडनी स्टोन शिबीर | दि. ०४ ऑक्टो.,२०१३ ते ०८ ऑक्टो.,२०१४ | ०६३ |
| ०५ | किडनी स्टोन शिबीर | दि. १७ जाने., २०१४ ते १९ जाने., २०१४ | ०६७ |
| ०६ | मोतीबिंदु शस्त्रक्रिया शिबीर | दि. १६ फेब्रु.,२०१४ ते १९ फेब्रु.,२०१४ | ०२५ |

वरीलसर्व शिबीरांमध्ये संस्थानचे वैद्यकीय अधिकारी, तांत्रिक कर्मचारी तसेच बाहेरीलतज्ञ मानद डॉक्टर्सकडून आवश्यकतेनुसार सर्व सहाय्य दिले जाते. शिबीरांमध्ये उपचार करण्यात येणाऱ्या रुग्णांकडून कोणत्याही प्रकारचे शुल्क न आकारता त्यांना संपूर्ण वैद्यकीय सेवा, रहाण्याची व्यवस्था व जेवणाची व्यवस्था विनामूल्य पुरविलीजाते.

**६) वैद्यकीय आर्थिक मदत व धर्मादाय सेवा :–**

गरीब आणि गरजू रुग्णांना भारतातील धर्मादाय संस्थांनी,निमशासकीय किंवा शासकीय संस्थांनी, सार्वजनिक संस्थांनी, सहकारी संस्थांनी चालविलेल्या रुग्णालयात शस्त्रक्रिया केल्यास / उपचार घेतल्यास एकूण खर्चाच्या १५ टक्के किंवा जास्तीत जास्त रुपये २०,०००/– मात्र मदत रुग्णालयाचे नावे डिमांड ड्राफ्टव्दारे पाठविली जाते. खाली नमूद केलेल्या शस्त्रक्रियांसाठी /आजारावरील उपचारांसाठी संस्थान व्यवस्थापनामार्फत वैद्यकिय आर्थिक मदत (वैद्यकिय अनुदान) दिले जाते :

१) हृदयशस्त्रक्रिया व नंतरचे उपचार
२) किडनी शस्त्रक्रिया व नंतरचे उपचार
३) मेंदुची शस्त्रक्रिया व नंतरचे उपचार
४) रक्तासंबंधीचे उपचार (उदा.हिमोफिलिया)
५) कर्करोग शस्त्रक्रिया व नंतरचे उपचार
६) मणका शस्त्रक्रिया व नंतरचे उपचार
७) Guillain Barre Syndrome
८) कॉक्लीअर इम्प्लांट

उपरोक्त आजारांपैकी नेत्ररोगासंबंधीत ज्या शस्त्रक्रिया संस्थानच्या रुग्णालयांमध्ये होऊ शकतात,त्याव्यतिरिक्त इतर नेत्रशस्त्रक्रियांसाठी वैद्यकिय अनुदान उपलब्ध करुन दिले जाते.

संस्थानचे वैद्यकिय आर्थिक अनुदान नियमावलीनुसार रुग्णास गंभीर आजारासाठी फक्त एकदाच अनुदान देण्याची तरतूद आहे, परंतु मा.व्यवस्थापन समितीने गंभीर आजारासाठी रुग्णाने पाच वर्षाने मागणी केल्यास त्यास ०५ वर्षानंतर पुन्हा वैद्यकिय अनुदान देणेबाबत निर्णय घेतलेला आहे.

गेल्या ०३ अहवाल सालात गरजू रुग्णांना उपलब्ध करुन देणेत आलेल्या वैद्यकिय अनुदान रक्कमेचा व लाभार्थी रुग्णांचा गोषवारा खालीलप्रमाणे :

| अ.नं. | आर्थिक वर्ष | अनुदान लाभार्थी रुग्ण संख्या | अनुदान वाटपाची रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| ०१ | सन २०१०–२०११ | २६७३ | ४,४६,३७,३५८/– |
| ०२ | सन २०११–२०१२ | २२१७ | ४,१४,३२,९६५/– |
| ०३ | सन २०१२–२०१३ | २४२७ | ४,९२,४९,६६६/– |
| ०४ | सन २०१३–२०१४ | २५७२ | ५,४५,५७,४८७/– |

## श्री साईबाबा हॉस्पीटल (सुपर स्पेशालिटी), शिर्डी
(SHRI SAIBABA HOSPITAL (SUPER SPECIALITY)

शिर्डी व शिर्डी परिसरातील ग्रामीण भागातील गरीब व गरजू रुग्णांना गंभीर आजार तसेच इतर तपासण्यांसाठी मुंबई, पुणे, नाशिक इत्यादी शहराच्या ठिकाणी जाऊन उपचार घ्यावे लागत असत. या गरीब व गरजू रुग्णांना उच्च दर्जाच्या वैद्यकिय सेवा–सुविधा शिर्डीमध्ये उपलब्ध व्हाव्यात या उदात्त हेतूने मा. व्यवस्थापन समितीने माहे मे, २००६ पासून श्री साईबाबा सुपर स्पेशालिटी हॉस्पीटल सुरु केलेले आहे. या रुग्णालयाविषयी थोडक्यात माहिती खालीलप्रमाणे :

| | | | |
|---|---|---|---|
| **०१)** | **रुग्णालयाची क्षमता** | **:** | **२३० बेडस्.** यापैकी |
| | (अ) हृदयरोग अतिदक्षता विभाग | : | १० बेडस् |
| | (ब) सामान्य अतिदक्षता विभाग | : | १० बेडस् |
| | (क) न्युरोसर्जरी व ट्रॉमॅटॉलॉजी अतिदक्षता विभाग | : | ०४ बेडस् |
| | (ड) कॅज्युअल्टी इर्मजन्सी केअर वार्ड | : | ०६ बेडस् |
| | (इ) कार्डियक रिकव्हरी वार्ड अतिदक्षता युनिट – १ | : | २० बेडस् |
| | (ई) कार्डियक रिकव्हरी वार्ड युनिट – २ | : | २० बेडस् |
| | (फ) कार्डियक रिकव्हरी वार्ड युनिट – ३ | : | १० बेडस् |
| | (ग) कार्डियक रिकव्हरी वार्ड युनिट – ४ | : | ३२ बेडस् |
| | (च) इतर अंतरुग्णासाठी उपचार सुविधा | : | ११८ बेडस् |
| **०२)** | **विविध शस्त्रक्रियेसाठी सुविधा** | : | **०७ कक्ष + कॅथलॅब.** |
| | (अ) हृदय शस्त्रक्रिया कक्ष | – | ०२ |
| | (ब) अस्थिरोग शस्त्रक्रिया कक्ष | – | ०१ |
| | (क) सामान्य शस्त्रक्रिया कक्ष | – | ०२ |
| | (ड) न्युरो सर्जरी व ट्रॉमॅटॉलॉजी कक्ष | – | ०२ |

**०३) रुग्णालयात उपलब्ध असणाऱ्या सुविधा :–**

| | | | |
|---|---|---|---|
| ०१) रेडिओलॉजी विभाग | ०२. | पॅथॉलॉजी विभाग |
| ०३) डायग्नोस्टिक्स् विभाग | ०४. | रक्तपेढी |
| ०५) मध्यवर्ती ऑक्सिजन वायुपुरवठा यंत्रणा | ०६. | मध्यवर्ती वायु व सक्शन सुविधा |
| ०७) बायोमेडिकल इंजिनिअरींग विभाग | ०८. | सोलर वॉटर हिटींग यंत्रणा |
| ०९) काही विशिष्ट विभागांसाठी मध्यवर्ती वातानुकूलन यंत्रणा | १०. | लॉन्ड्री |

**०४) रुग्णालयात उपलब्ध असणाऱ्या रोग निदान चाचण्या व उपचार सेवा :–**

| | | |
|---|---|---|
| ०१) कार्डिऑलॉजी | ०२. | कार्डिओ–थोरॅसिक सर्जरी |
| ०३) न्युरो सर्जरी – ट्रॉमॅटॉलॉजी | ०४. | युरॉलॉजी |
| ०५) नेफ्रॉलॉजी – डायलिसिस | ०६. | ॲड्व्हान्सड् ऑर्थोपेडिक्स् |
| ०७) जनरल मेडिसिन | ०८. | जनरल सर्जरी |
| ०९) रेडिओलॉजी | १०. | पॅथॉलॉजी |
| ११) मॅक्सिलोफेसिअल सर्जरी | | |

### ०५) गेल्या ०३ अहवाल सालात श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये उपचार घेतलेल्या रुग्णांची संख्या :–

| अ.नं. | विभाग / उपचार | रुग्णांची संख्या | | |
|---|---|---|---|---|
| | अहवाल वर्ष ⟶ | २०११–२०१२ | २०१२–२०१३ | २०१३–२०१४ |
| ०१ | बाह्यरुग्ण विभाग | १,२७,०२७ | १,४९,६६३ | १,५५,३७१ |
| ०२ | अंतर्रुग्ण विभाग | ०,१५,५३३ | ०,१७,२६६ | ०,१७,२२६ |
| ०३ | रेडिओलॉजी विभाग व इतर | ०,८७,३३१ | ०,९७,०४० | ०,९५,६४२ |
| ०४ | पॅथॉलॉजी लॅबोरेटरी विभाग | ३,१३,६४२ | ३,४१,५९२ | ३,६७,२११ |
| ०५ | हृदय शस्त्रक्रिया विभाग | ०,०१,४९१ | ०,०१,५७१ | ०,०,१,७०० |
| ०६ | हृदयरोग – अँजिओग्राफी | ०,०४,१८६ | ०,०५,०८१ | ०,०५,३४२ |
| ०७ | हृदयरोग – अँजिओप्लास्टी | ०,०२,१३९ | ०,०३,०२३ | ०,०३,४५२ |
| ०८ | हृदयरोग – बी.एम.व्ही व इतर | ०,००,५९९ | ०,००,६७४ | ०,००,५३० |
| ०९ | न्युरो सर्जरी विभाग | ०,००,६११ | ०,००,५८६ | ०,००,३३७ |
| १० | युरॉलॉजी विभाग | ०,००,५४८ | ०,००,५७० | ०,००,६१५ |
| ११ | अन्य शस्त्रक्रिया (ऑर्थोपेडिक्स, जनरल सर्जरी, दंतरोग,ईएनटी) | ०,०३,३४४ | ०,०३,३६० | ०,०४,१२६ |

### ०६) रुग्णालयासाठी औषधे व इतर आवश्यक साहित्य :–

श्री साईनाथ व श्री साईबाबा या दोन्ही रुग्णालयांसाठी रुग्णांच्या रोगनिदान व उपचारांसाठी आवश्यक असलेली औषधे, उपकरणे आदि साहित्य खरेदीसाठी मध्यवर्ती औषध भांडार स्थापन करण्यात आलेले आहे. अहवाल सालात, अंदाजे रु. ३६.७७ कोटी मात्रची औषधे, सर्जिकल इन्स्ट्रूमेंटस व इतर आवश्यक साहित्य आदि उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे.

तसेच दोन्ही रुग्णालयाकडील रुग्णांचे कपडे व इतर लिनन स्वच्छ करणे, धुणे व इस्त्री करणे यासाठी स्वतंत्र लॉन्ड्रीची व्यवस्था करण्यात आली आहे.

### ०७) रुग्णालयाचे संगणकीकरण :–

श्री साईनाथ व श्री साईबाबा सुपर स्पेशालिटी रुग्णालय या दोन्ही रुग्णालयात संगणकीय कार्यप्रणालीव्दारे रुग्णाची वैयक्तिक माहिती, रोग निदान व उपचार पध्दती, बिलींग, व्हिडिओ कॉन्फरन्स,इंटरनेट आदि सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.

**०८) रुग्णांना वैद्यकिय उपचार बिलातील सवलतीच्या विविध योजना :-**

**अ) आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील रुग्णांना सवलत :**

बी.पी.टी.ॲक्ट,१९५० व मा. उच्च न्यायालयाची योजना, विविध शासकीय योजना, मा. व्यवस्थापन समितीचे नियमानुसार, दारिद्र्य रेषेखालील गरीब, गरजु व दुर्बल घटकातील रुग्णांना वैद्यकिय उपचार बिलात नियमानुसार सवलत देण्यात येत आहे. त्याचा गेल्या ०३ वर्षाचा तपशील :

| अ.नं. | अहवाल वर्ष | लाभार्थी रुग्णांची संख्या | आर्थिक सवलत रुपये (कोटी) |
|---|---|---|---|
| ०१ | सन २०११-२०१२ | ११,३५० | ४.७९ कोटी |
| ०२ | सन २०१२-२०१३ | १२,०४४ | ५.५१ कोटी |
| ०३ | सन २०१३-२०१४ | २५,२५० | ७.८३ कोटी |

**ब) जीवनदायी योजना, शालेय आरोग्य तपासणी (NRHM) :**

सदर योजनेच्या अंतर्गत द्रारिद्र्य रेषेखालील, तसेच शालेय विद्यार्थी रुग्णांच्या ह्रदय शस्त्रक्रिया करण्यात येतात,अशा शस्त्रक्रियांपोटी शासन अनुदान प्राप्त करण्याची कार्यवाही संबंधित विभागामार्फत करणेत येत आहे.गेल्या ०३ वर्षातील तपशील खालीलप्रमाणे :

| अ.नं. | अहवाल वर्ष | एकुण शस्त्रक्रिया | एकूण बिल रुपये (कोटी) | प्राप्त अनुदान रुपये (कोटी) |
|---|---|---|---|---|
| ०१ | सन २०११-१२ | ३,८६३ | ३९.०० | २६.६३ |
| ०२ | सन २०१२-१३ | ४,८३४ | ४७.८० | ०९.५१ |
| ०३ | सन २०१३-१४ | ३,०२९ | २६.२३ | ३४.९० |

माहे एप्रिल, २०११ पासून NRHM शालेय विद्यार्थी रुग्णांचा जीवनदायी योजनेमध्ये समावेश करणेत आलेला आहे.

**(क) राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना :**

शासनाच्या धोरणानुसार जुनी जीवनदायी योजना बंद करण्यात येऊन, त्या ऐवजी, नवीन राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना ही आरोग्य योजना दिनांक २१ ऑक्टोबर, २०१३ पासून संपुर्ण राज्यात लागू करणेत आलेली आहे. या नवीन योजनेचे कामकाज राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना सोसायटी यांच्या नियंत्रणाखाली,पूर्णत:ऑनलाईन पध्दतीने चालत असल्याने, सदरची योजना रुग्णांसह व्यवस्थापनासकामकाजाच्या सोयीच्या दृष्टीने अधिक सुलभ आहे. सदर योजनेचा दिनांक ३१ मार्च, २०१४अखेरचा अहवाल खाली नमुद केला आहे:

## लाभार्थी बाहयरुग्णांचा अहवाल
## Free OPD Investigations

| अ.नं. | तपशील | लाभार्थी रुग्ण संख्या | रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| ०१ | सन २०१२-२०१३ | २१० | १,२०,५८५/- |
| ०२ | सन २०१३-२०१४ | ०८८ | ०,४०,९२०/- |

सदर योजनेच्या कराराअंतर्गत तरतुदीनुसार, रुग्णांच्या आवश्यक त्या वेद्यकिय तपासण्या पुर्णपणे मोफत करणेत आलेल्या आहेत.

## लाभार्थी अंर्तःरुग्णांचा अहवाल (IPD Clamis)

| अ.नं. | तपशील | लाभार्थी रुग्ण संख्या | रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| ०१ | सन २०१२-२०१३ | ०००४ | २,४८,१०२/- |
| ०२ | सन २०१३-२०१४ | १०३१ | ७,८२,३४,४६५/- |

दिनांक ३१ मार्च, २०१४ अखेर एकुण १०३५ रुग्णांच्या बिलापोटी रुपये ७,८४,८२,५६७/- इतकी रक्कम ( १० टक्के आयकर कपात होऊन ) ऑनलाईनचे माध्यमातून संस्थानचे बँक खात्यात जमा झालेली आहे.

**(ड) वैद्यकिय आर्थिक मदत :**

श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये उपचार घेणाऱ्या रुग्णांना विविध धर्मादाय संस्थांकडून वैद्यकिय आर्थिक अनुदान मिळणेबाबत मार्गदर्शन केले जाते. अशा रुग्णांच्या उपचारापोटी गेल्या ०३ अहवाल वर्षामध्ये विविध धर्मादाय संस्थांकडून खालीलप्रमाणे वैद्यकिय अनुदान श्री साईबाबा हॉस्पीटलला प्राप्त झालेले आहे. त्याचा गेल्या ०३ वर्षाचा प्राप्त आर्थिक मदतीचा तपशील :

| अ.नं. | अहवाल वर्ष | रुग्ण संख्या | प्राप्त वैद्यकिय अनुदान रुपये |
|---|---|---|---|
| ०१ | सन २०११-२०१२ | २३० | ४०.२४ लक्ष |
| ०२ | सन २०१२-२०१३ | १२६ | १९.७२ लक्ष |
| ०३ | सन २०१३-२०१४ | ०३८ | ०७.७४ लक्ष |

**(इ) डॉ.आंबेडकर मेडिकल–एड स्किम २००४ :**

केंद्र शासनाच्या योजनेंतर्गत अनुसुचित जाती / जमातीच्या रुग्णांस किडनी, हृदय, लिव्हर, कॅन्सर, मेंदु/मज्जारज्जू व इतर गंभीर आजारांवरील शस्त्रक्रियांसाठी रुपये ०१ लाखापेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असलेल्या कुंटूंबातील रुग्णांस रुपये ०१ लाखापर्यन्त आर्थिक मदत देणेत येते.

तथापि, बहुतेक रुग्णांच्या जादा खर्चाच्या हृदय शस्त्रक्रिया राज्य शासनाच्या राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेंतर्गत पार पडत असल्याने तसेच अंतर्गत रुग्णांनी मदत मागणीचे प्रस्ताव सादर केलेले नसल्याने, या योजनेंतर्गत कोणत्याही रुग्णांस आर्थिक मदत प्राप्त झालेली नाही.

**(ई) मा. पंतप्रधान राष्ट्रीय मदत निधी :**

सदर योजनेंतर्गत, श्री साईबाबा हॉस्पीटलची नोंदणी करणेबाबतची कार्यवाही केंद्र व राज्य शासनाच्या स्तरावरुन पूर्ण करणेत आलेली आहे. तथापि, बहुतांशी रुग्णांच्या जादा खर्चाच्या हृदय शस्त्रक्रिया राज्य जीवनदायी योजनेअंतर्गत मंजूर होत असल्याने मा. पंतप्रधान राष्ट्रीय मदत निधी योजनेंतर्गत आर्थिक मदत प्राप्त झालेली नाही.

# इतर उपक्रम - शैक्षणिक संकुल

संस्थानच्या ध्येय–उद्देशांस अनुसरुन, संस्थान व्यवस्थापनामार्फत शैक्षणिक संकुलाची स्थापना करण्यात आली आहे. हे शैक्षणिक संकुल, गांवापासून अर्धा किलोमीटर अंतरावर असलेल्या संस्थानच्या मालकीच्या नयनरम्य परिसरात आहे.

शैक्षणिक संकुलात खालील शैक्षणिक संस्थांचा समावेश आहे.

अ) श्री साईबाबाऔद्योगिक प्रशिक्षण केंद्र, शिर्डी.
ब) श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कूल,शिर्डी.
क) श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर, शिर्डी.
ड) श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी.

**(अ) श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण केंद्र , शिर्डी. (आय. टी. आय.)**

शिर्डी व परिसरातील ग्रामीण भागातील विद्यार्थी – विद्यार्थीनींना व्यवसायाभिमुख प्रशिक्षण मिळावे व त्यांना स्वयंरोजगार उपलब्ध व्हावा यादृष्टीने संस्थान व्यवस्थापनामार्फत शिर्डी येथे औद्योगिक प्रशिक्षण केंद्र सुरु करणेत आलेले आहे. अहवाल सालात, औद्योगीक प्रशिक्षण संस्थेत प्रगत व प्रचलित तंत्रज्ञानावरआधारीत बारा व्यवसाय असून या व्यवसायांच्या एकूण तेवीस तुकड्या आहेत.तसेच प्रशिक्षण केंद्रामार्फत महाराष्ट्र ज्ञान महामंडळाचा शासनमान्य संगणक अभ्यासक्रमाचा (MS-CIT) उपक्रम व यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे संगणक प्रशिक्षण वर्ग चालविले जातात. या प्रशिक्षण केंद्रात प्रशिक्षित ३३निदेशकाकडून प्रशिक्षण देण्यात येत आहे.

गेल्या ०३ अहवाल वर्षामध्ये या प्रशिक्षण केंद्रात प्रशिक्षण घेणाऱ्या प्रशिक्षणार्थ्यांची संख्या खालीलप्रमाणे :

| अ.नं. | तपशील | प्रशिक्षणार्थी संख्या | | |
|---|---|---|---|---|
| | अहवाल वर्ष → | सन २०११–१२ | सन २०१२–१३ | सन २०१३–१४ |
| ०१ | व्यवसाय प्रशिक्षणार्थी | २६८ | २१० | २३१ |
| ०२ | संगणक अभ्यासक्रम प्रशिक्षणार्थी | १४० | १७५ | ११९ |

**ठळक बाबी :**

१) सदरहू औद्योगिक प्रशिक्षण केंद्र हे डायरेक्टोरेट जनरल ऑफ एम्प्लॉयमेंट ॲण्ड ट्रेनिंग (DGE T), श्रम मंत्रालय, भारत सरकार,नवी दिल्ली यांचेशी कायमस्वरुपी संलग्नता व मान्यताप्राप्त केंद्र आहे.

२) औद्योगिक प्रशिक्षण केंद्र हे संपूर्णपणे विनाअनुदानित तत्वावर चालविणेत येत असून, या केंद्रात प्रवेश घेणाऱ्या प्रशिक्षणार्थींकडून शासन नियमानुसार शैक्षणिक शुल्क घेतले जाते.

३) प्रशिक्षण केंद्राची प्रवेश प्रक्रिया शैक्षणिक गुणवत्तेवर आधारित असून, शासनाच्या आरक्षण धोरणानुसार पूर्णत: संगणकीय कार्यप्रणालीव्दारे पार पाडली जाते.

४) अहवाल सालात औद्योगिक प्रशिक्षण केंद्राचा एकत्रित निकाल ९८ टक्के लागलेला आहे.

५) अहवाल सालात, संस्थेतील मेकॅनिक मोटर व्हेईकल, टर्नर, मेकॅनिक रेफ्रीजरेशन ॲण्ड एअर कंडिशननिंग या ०३ व्यवसायाचे प्रशिक्षणार्थी ५०व्या राज्यस्तर कौशल्य स्पर्धा परिक्षेमध्ये राज्यात सर्वप्रथम क्रमांकाने उत्तीर्णझालेले असुन, अशा रितीने यश मिळविण्याचे संस्थेचे हे चौथे सलग वर्ष आहे.

६) अहवाल सालात, संस्थेच्या टर्नरया व्यवसायाचा प्रशिक्षणार्थी ५०व्या अखिल भारतीय कौशल्य स्पर्धेत देशपातळीवर पात्र ठरला. याचबरोबर संस्थेने देशात संस्थेचा प्रशिक्षणार्थी सर्वप्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होण्याचा मान पटकावत, राष्ट्रीय पातळीवर पोहोचण्याचे सलग ५ वे वर्ष संस्थेने साजरे केले.

७) संस्थेने आजपावेतो, विविध व्यवसाय प्रशिक्षणात केंद्र शासनाचे राष्ट्रीय स्तरावर पाच **''सर्वोत्कृष्ट संस्था पुरस्कार''** जिंकले आहेत. तसेच संस्थेच्या प्राचार्य यांची ५० व्या अखिल भारतीय कौशल्य स्पर्धेसाठी संरक्षक तथा राज्य व्यवसाय प्रशिक्षण संचालनालयाचे प्रतिनिधी म्हणून सलग ०५व्यांदा निवड झाली आहे.

## (ब) श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कूल, शिर्डी.

शिर्डी व शिर्डी परिसरातील ग्रामीण भागातील मुला–मुलींना इंग्रजी माध्यमाचे शिक्षण विनासायास प्राप्त व्हावे म्हणून संस्थान व्यवस्थापनामार्फत इंग्लिश मिडियम स्कूल सुरु करणेत आलेले आहे. या शाळेसाठी शासनाकडून कोणतीही आर्थिक मदत वा अनुदान घेतले जात नाही. विद्यार्थ्यांकडूनही शैक्षणिक शुल्क आकारतांना ते आर्थिकदृष्ट्या सर्वसामान्यांना परवडेल,असेच ठेवण्यात आलेले आहे.

या इंग्लिश मिडियम स्कूल मध्ये, ज्युनिअर केजी ते इयत्ता दहावी पर्यंत वर्ग चालविले जातात. गेल्या ०३ अहवाल वर्षात या शाळेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या खालीलप्रमाणे :

| अ.नं. | अहवाल वर्ष | विद्यार्थी संख्या | विद्यार्थिनी संख्या | एकूण संख्या | एस.एस.सी. निकाल |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | सन २०११–२०१२ | ११२० | ७२७ | १८४७ | १०० % |
| ०२ | सन २०१२–२०१३ | ११०२ | ७८२ | १८८४ | ९८.९८ % |
| ०३ | सन २०१३–२०१४ | १२१४ | ८७२ | २०८६ | १०० % |

**ठळक बाबी :–**

१) विद्यार्थ्यांची ने–आण करणेकरीता वाजवी दरामध्ये बस सेवा उपलब्ध करुन देणेत आलेली आहे.

२) **हिंदी राष्ट्रभाषा – बालबोधिनी प्रवेशिका, सुबोध प्रवेशिका, शिष्यवृत्ती परिक्षा** या परिक्षांमध्ये विद्यालयांच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन निकालाची यशस्वी परंपरा राखली.

३) **चित्रकला इलेमेंटरी व इंटरमिजिएट** या शासकीय चित्रकला परिक्षेमध्ये विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन अनुक्रमे १०० टक्के व ९० टक्के निकालाची यशस्वी परंपरा कायम राखली.

४) शाळेच्या विद्यार्थ्यांनी गणित विज्ञान प्रदर्शनामध्ये सहभाग घेऊन यश संपादन केले.

५) शाळेच्या विद्यार्थ्यांनी राज्यस्तरीय वर्क्तृत्व स्पर्धेत सहभाग घेऊन उल्लेखनिय यश मिळविले.

६) राष्ट्रीय व महाराष्ट्र प्रज्ञा शोध परिक्षेत सहभाग घेऊन यश संपादन केले.

७) क्रिडा क्षेत्रामध्ये श्री साईबाबा इंग्लिश मिडियम स्कूलने अहमदनगर जिल्हयातील अग्रगण्य शाळा म्हणून नांवलौकिक मिळविला असून, अहवाल सालात १७खेळांडूची विभागीय पातळीवर, ०२ खेळांडूची राज्य पातळीवर व ०१ खेळाडूची राष्ट्रीय पातळीवर निवड होऊन, त्यांना क्रिडा स्पर्धांमध्ये सहभाग घेण्याची संधी मिळाली.

**(क) श्री साईबाबा कन्या विद्या मंदीर, शिर्डी.**

श्री साईबाबा कन्या विद्या मंदीर, शिर्डी या शैक्षणिक संकुलात राज्य शासनाच्या निर्णयानुसार विद्यार्थीनींना इयत्ता दहावीपर्यन्त मोफत शिक्षण देणेत येत असून, त्यांचेकडून कोणत्याही प्रकारचे शैक्षणिक शुल्क आकारले जात नाही. तसेच या विद्यालयासाठी शासनाकडून आर्थिक मदत वा अनुदान घेतले जात नाही.

श्री साईबाबा कन्या विद्या मंदिरमध्ये गेल्या ०३ अहवाल वर्षामध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थीनींची संख्या खालील प्रमाणे :

| अ.नं. | अहवाल वर्ष | विद्यार्थिनी संख्या | एस.एस.सी. निकाल |
|---|---|---|---|
| १ | सन २०११–२०१२ | ६९९ | ९४.६७% |
| २ | सन २०१२–२०१३ | ७१८ | ९९.०६% |
| ३ | सन २०१३–२०१४ | ७३६ | ९९.०६% |

**ठळक बाबी :**

१) शासनाने आयोजित केलेल्या चित्रकला इलेमेंटरी व इंटरमिजिएट परिक्षेचा निकाल अनुक्रमे ९१ टक्के व ८८ टक्के लागला आहे.

२) कन्या विद्या मंदिराने याही वर्षी गणित विज्ञान प्रदर्शनात सहभाग घेऊन सलग ०६वर्षे यशस्वी होण्याचा मान पटकवला आहे. तसेच राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेसह, राज्यस्तरीय निबंध लेखन स्पर्धेत घवघवीत यश मिळविले.

३) कन्या शाळेतील संगीत विभागाने विविध संगीत परिक्षा तसेच गायन स्पर्धेत भाग घेऊन यश संपादन केले.

४) कन्या विद्या मंदिरामध्ये२५ संगणकासह अद्ययावत तांत्रिक संगणकीय सुविधेची प्रयोगशाळा विद्यार्थ्यांनींना उपलब्ध करुन दिली आहे.

५) कन्या विद्या मंदिरात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थीनींना सुसज्ज ग्रंथालयाची सुविधा उपलब्ध करुन देणेत आली आहे.

६) क्रिडा क्षेत्रामध्ये श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर ने अहमदनगर जिल्हयातील अग्रगण्य शाळा म्हणून नांवलौकिक मिळविला असून, अहवाल सालात ०४ खेळाडूंची राष्ट्रीय, राज्यस्तरीय व विभागीय विविध क्रिडा स्पर्धेकरीता निवड झाली.

**(ड) श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी.**

श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी या शैक्षणिक संकुलात विद्यार्थी / विद्यार्थीनींना विज्ञान, कला व वाणिज्य या तीनही शाखेतील शिक्षण देणेत येत असून, शासन निर्णयानुसार मुलींना मोफत शिक्षण देणेत येत आहे. तसेच या विद्यालयासाठी शासनाकडून आर्थिक मदत वा अनुदान घेतले जात नाही.तूर्त सदर कनिष्ठ महाविद्यालय हे जागेच्या कमतरतेमुळे संस्थानने जिल्हा परिषद, अहमदनगर यांना बांधून दिलेल्या प्राथमिक शाळेच्या इमारतीमध्ये भरविण्यात येत आहे. श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयात, गेल्या ०३ अहवाल वर्षामध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांची संख्या खालील प्रमाणे :

| अ.नं. | अहवाल वर्ष | विद्यार्थी / विद्यार्थिनी संख्या | एच.एस.सी. निकाल |
|---|---|---|---|
| ०१ | सन २०११-२०१२ | ९१९ | ८८.००% |
| ०२ | सन २०१२-२०१३ | ९८० | ८९.००% |
| ०३ | सन २०१३-२०१४ | १०९३ | ८९.००% |

**ठळक बाबी :**

१) गेल्या शैक्षणिक वर्षात कनिष्ठ महाविद्यालयामार्फत निबंधलेखन, काव्य वाचन, रांगोळी व पाककला,वादविवाद,वक्तृत्व, सामान्य ज्ञान, प्रश्नमंजुषा अशा विविध स्पर्धांचे तसेच शिक्षक-पालक सभा, आरोग्य तपासणी आदि शिबीरांचे आयोजन करणेत आले.

२) माहे मार्च, २०१४ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता १२ वी चे परिक्षेत, विज्ञान शाखेचा ९९टक्के, वाणिज्य शाखेचा ९८टक्के, कला शाखेचा ९७टक्के तर सर्व शाखांचा मिळून सरासरी ९५ टक्के निकाल लागला.

३) माहे मार्च, २०१४ मध्ये झालेल्या एच.एस.सी. परिक्षेत कनिष्ठ महाविदयालयाची विद्यार्थिनी गणित विषयात पुणे विभागात प्रथम आली.

# इतर उपक्रम - श्री साईलीला (द्वैमासिक)

महाराष्ट्र शासनाने पारित केलेल्या श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी अधिनियम, २००४ च्या घटनेत, विश्वस्तव्यवस्था श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीलाव त्यांची शिकवण या बाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार व प्रसार करीलआणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील, या उद्देशाचा प्रामुख्याने समावेश करण्यात आला आहे. या उद्देशास अनुसरुन, श्री साईंच्या कार्याचा प्रचार व प्रसार व्हावा यासाठी संस्थानमार्फत साईलीला(व्दैमासिक)मराठी आणि संयुक्त हिंदी– इंग्रजी भाषेतील प्रसिध्द करणेत येत आहे.

मा.व्यवस्थापन समितीने हाती घेतलेल्या विविध विकासात्मक प्रकल्पांची तसेच मंदिर व संस्थान परिसरात होणाऱ्या विविध कार्यक्रमांची माहिती ही या व्दैमासिकांव्दारे साईभक्तांपर्यन्त पोहोचविण्यात येते.सध्या श्री साईलीला व्दैमासिक मुंबई येथून प्रकाशित करण्यात येत आहे. गेल्या ०३ अहवाल वर्षातील या श्री साईलीला व्दैमासिकाची सदस्य संख्या पुढीलप्रमाणे :

| अ.नं. | सदस्य प्रकार | श्री साईलीला मराठी | | | श्री साईलीला हिंदी–इंग्रजी | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | अहवाल वर्ष | २०११–१२ | २०१२–१३ | २०१३–१४ | २०११–१२ | २०१२–१३ | २०१३–१४ |
| ०१ | वार्षिक सदस्य | ६,२८२ | ४,८४३ | ५,२६२ | ८,१७१ | ८,४९६ | ६,०८८ |
| ०२ | आजीवन सदस्य | ३,९४५ | ३,२३७ | ३,६०८ | ७,१४२ | ७,५७२ | ८,०७२ |
| ०३ | परदेशस्थ सदस्य | ०,००२ | ०,००० | ०,००० | ०,०८६ | ०,०९६ | ०,०५० |
| | एकूण– | १०,२२९ | ८,०८० | ८,८७० | १५,३९९ | १६,१६४ | १४,२१० |

# सन २०१२-१३ मधील ठळक आर्थिक बाबी

सन २०१३–१४ या आर्थिक वर्षात संस्थानला विविध मार्गाने मिळालेले **एकूण उत्पन्न रक्कम रुपये ५३०.८० कोटी मात्र मिळालेले आहे.** त्यापैकी विविध कारणांसाठी एकुण **रुपये ३२२.२७ कोटी मात्र इतकी रक्कम खर्च** करण्यात आलेली आहे. दिनांक ३१ मार्च,२०१४ अखेर संस्थानने ठेवीच्या स्वरुपात **रुपये १,०९८.५७ कोटी मात्र** विविधराष्ट्रीयीकृत बँकामध्ये **गुंतवणूक** केलेली आहे.

अधिनियमातील तरतुदीनुसार सन २०१३–१४ या आर्थिक वर्षाचे लेखापरिक्षण पूर्ण करण्यात आलेले आहे. सोबत लेखापरिक्षण अहवाल स्वतंत्ररित्या सादर करणेत आलेला आहे.

या लेखापरिक्षण अहवालातील दिनांक ३१ मार्च, २०१४ अखेर गुंतवणूक, उत्पन्न व खर्च दर्शविणाऱ्या ठळक बाबी खालील तक्त्यात नमुद केल्या आहेत :

**गुंतवणूकीचा सारांश**

| अ.नं. | बँक | रक्कम कोटींमध्ये |
|---|---|---|
| ०१ | शासकीय कर्जरोखे | – |
| ०२ | राष्ट्रीयीकृत बँका | १,०९८.५७ |
| | **एकूण** | **१,०९८.५७** |

**ठळक उत्पन्नाच्या बाबी**

| अ.नं. | तपशील | रक्कम कोटींमध्ये |
|---|---|---|
| ०१ | दक्षिणा पेटी | १७७.२३ |
| ०२ | गुंतवणुकीवरील व्याज | ९८.४३ |
| ०३ | सर्वसाधारण देणगी | ५०.८६ |
| ०४ | प्रसादालय | ३५.९८ |
| ०५ | इमारत दुरुस्ती व देखभाल निधी | ३५.०७ |
| ०६ | अन्नदान निधी | १८.६३ |
| ०७ | वैद्यकीय निधी | ७.९४ |
| ०८ | वस्तुरुप देणगी | ७.८६ |
| ०९ | पुस्तके, फोटो, दैनंदिनी, दिनदर्शिका व कॅसेट विक्री | ७.०७ |
| १० | शैक्षणिक निधी | ६.७४ |

**ठळक खर्चाच्या बाबी**

| अ.नं. | तपशील | रक्कम कोटींमध्ये |
|---|---|---|
| ०१ | प्रसादालय खर्च | ६८.६० |
| ०२ | रुग्णालये (औषधे, मशिनरी व इतर अनुषंगिक खर्च ) | ६७.४४ |
| ०३ | वेतन व भत्ते | ६४.१३ |
| ०४ | शिर्डी नगरपंचायत व इतर अनुदाने | ३६.२० |
| ०५ | कंत्राटी कर्मचारी वेतन | २४.१० |
| ०६ | दुरुस्ती देखभाल खर्च | २२.४३ |
| ०७ | वैद्यकीय अनुदान | १३.२४ |
| ०८ | चल मालमत्तेवर झालेला भांडवली खर्च | १०.०४ |
| ०९ | पुस्तके, फोटो, दैनंदिनी, दिनदर्शिका छपाई खर्च | ६.०५ |
| १० | अचल मालमत्तेवर झालेला भांडवली खर्च | २.५७ |

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ मधील सुधारित कलम २९(१) अन्वये,विश्वस्तव्यवस्थेकडून ज्या संस्थांना / व्यक्तींना वित्तीय सहाय्य, वस्तुरुपाने अनुदाने देण्यात आली आहेत अशा संस्थांची नांवे, अनुदान रक्कम व अनुदान देणेमागील उद्देश दर्शविणारा तक्ता खालीलप्रमाणे :

| अ.नं. | लाभार्थींचे नांव | रक्कम | उद्देश/बाबी |
|---|---|---|---|
| **(अ) रोख रक्कमेच्या स्वरुपातील अनुदान :-** | | | |
| ०१ | शिर्डी नगरपंचायत, शिर्डी | ९,१४,९८,४६९/- | शिर्डी एकात्मिक रस्ते विकास योजना |
| ०२ | महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ | १,६३,१७,९४२/- | शिर्डी बसस्थानक तथा यात्री निवास बांधकाम |
| ०३ | शिर्डी नगरपंचायत, शिर्डी | ४१,८०,२५३/- | हेलीपॅड लिंक रोड |
| ०४ | शिर्डी नगरपंचायत, शिर्डी | २५,००,००,०००/- | महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त भागासाठी मदत |
| | **एकूण (अ)** | **३६,१९,९६,६६४/-** | |
| **(ब) विविध रुग्णालये आणि गरीब / गरजू रुग्णांकरीता अनुदान** | | | |
| ०१ | गरीब व गरजू रुग्णांना अनुदान | ८,१२,९१,७०६/- | गरीब व गरजू रुग्णांना वैद्यकीय मदत |
| ०२ | जीवनदायी शस्त्रक्रियेसाठी अनुदान | ५,११,१५,९४४/- | जीवनदायी शस्त्रक्रियेसाठी गरजू रुग्णांना मदत |
| | **एकूण ( ब )** | **१३,२४,०७,६५०/-** | |
| | **एकूण (अ + ब )** | **४९,४४,०४,३१४/-** | |

# विकासात्मक कामे

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम, २००४ मधील तरतुदीस अधिन राहून, मा.व्यवस्थापन समितीने घेतलेल्या विविध निर्णयांन्वये, साईभक्तांकरीता तसेच शिर्डी व आसपासचे परिसरात विकासकामे सुरु केलेली आहेत. या विकास कामांमुळे शिर्डी व आसपासचे परिसरांतील ग्रामस्थ, रहिवासी व भक्तांना अनेक प्रकारच्या सेवा-सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. त्यापैकी महत्वाचे प्रकल्पांची थोडक्यात माहिती खालीलप्रमाणे :

## ✻ पूर्ण करणेत आलेले प्रकल्प ✻

**०१ साईआश्रम प्रकल्प (भाग १ व भाग २) :-**

श्री क्षेत्र शिर्डी येथे साईंच्या दर्शनासाठी येणाऱ्या साईभक्तांना निवासस्थाने व धर्मशाळा या सुविधा उपलब्ध करुन देणेसाठी शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई या संस्थेचे देगणीदार साईभक्त श्री. के.व्ही. रमणी व संस्थान व्यवस्थापन यांचेमध्ये दि.०४ फेब्रुवारी, २००६ रोजी शिर्डी येथे समझोता करारनामा करण्यात आलेला होता. सदरहू करारनाम्यानुसार श्री क्षेत्र शिर्डी येथे साईआश्रम प्रकल्प भाग १ व भाग २ चे बांधकाम पूर्ण करण्यात आले आहे. त्याचा थोडक्यात तपशिल खालीलप्रमाणे :

| अ.नं. | तपशील | साईआश्रम प्रकल्प | |
|---|---|---|---|
| | | भाग १ | भाग २ |
| ०१ | प्रकल्पाचे स्थान | शिर्डी<br>सर्व्हे नंबर १०७,१०८व<br>१०९ पैकी मधील जमीन | निमगांव कोऱ्हाळे<br>गट नंबर१७२ पैकी मधील<br>जमीन |
| ०२ | बांधकामासाठी जागेची उपलब्धता | ०५ हे ८० आर | ०३ हे ७९ आर |
| ०३ | निवासासाठी उपलब्ध होणाऱ्या खोल्या | १५३६ खोल्या | १९२ खोल्या (हॉल्स) |
| ०४ | निवास उपलब्ध होणाऱ्या भक्तांची संख्या | अंदाजे ६१४४ व्यक्ती | अंदाजे ३४५६ व्यक्ती |
| ०५ | शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांचेतर्फे करण्यात आलेला बांधकामावरील खर्च | अंदाजे रुपये १११.२० कोटी | |
| ०६ | संस्थानतर्फे करण्यात येणारा परिसर विकासासह इतर सुविधेवरील खर्च | अंदाजे रुपये ४३.५२ कोटी | |
| ०७ | एकूण खर्च | अंदाजे रुपये १५६.२२ कोटी | |
| ०८ | संस्थानमार्फत करण्यात आलेल्या सुविधा | वाहनतळ, प्रशस्त अंतर्गत रस्ते, विद्युतीकरण, पाणी पुरवठा, परिसर सुशोभिकरण आदि. | |
| ०९ | शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई बांधकाम ठेकेदार | पार्श्वनाथ डेव्हलपर्स लि. नवी दिल्ली. | |
| १० | प्रकल्पाचे वास्तुविशारद | आर्किटेक्ट डि.ओ. निकम, पुणे. | |
| ११ | परिसर विकास कामाचे बांधकाम ठेकेदार | शापुरजी पालोनजी ॲण्ड कंपनी, नाशिक | |
| १२ | प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार | डॉर्श कन्सल्ट इंडिया प्रा.लि., मुंबई | |
| १३ | सांडपाणी प्रक्रिया सयंत्र उभारणी ठेकेदार | साई एनव्हायरो इंजिनिअर्स प्रा.लि., पुणे. | |

**साईआश्रम भाग ०१ व ०२ ची एकत्रित माहिती :-**

०१ एकूण उपलब्ध होणाऱ्या खोल्या : खोल्या १५३६ + डॉरमेट्री हॉल्स १९२ = एकूण १७२८.

०२ निवासव्यवस्था होणाऱ्या भक्तांची संख्या : १५२००

०३ शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांच्यामार्फत बांधकामासाठी झालेला खर्च : अंदाजे रुपये ११२.२० कोटी.

०४ संस्थानतर्फे परिसर विकासाचे बांधकामासाठी आजअखेर झालेला खर्च : अंदाजे रु.४३.५२ कोटी.

०५ साई आश्रम भाग १ व भाग २ या निवासस्थानप्रकल्पांचे परिसर विकासासह बांधकाम पूर्ण झाले असून, अहवाल सालात, साईआश्रम निवासस्थान प्रकल्पसाईभक्तांचे निवास व्यवस्थेसाठी खुला करणेत आला आहे.

**०२ श्री साई प्रसादालय इमारतीत असणाऱ्या साईटेक प्रकल्पाचे डेटा सेंटर हॉलवरील डोमचे नूतनीकरण करणे :**

संस्थानचे विविध विभागांसाठी साईटेक प्रकल्पांतर्गत नविन अद्ययावत संगणक प्रणाली व संगणकीय जाळे उभारणेची कार्यवाही माहिती तंत्राज्ञान विभागामार्फत पूर्ण करण्यात आलेली आहे. सदर प्रकल्पासाठी संस्थानचे श्री साई प्रसादालय इमारतीचे पहिल्या मजल्यावरील उत्तरेकडील हॉलमध्ये डाटा सेंटर रुमचे बांधकाम पूर्ण करुन साईटेक प्रकल्प सुरु केलेला आहे.

डाटा सेंटर हॉल डोमचे नूतनीकरण करणेकामी मा. त्रिसदस्य समितीची मान्यता घेऊन निविदा मागविणेत आल्या होत्या सदरचे नूतनीकरण कामात डोमवरील कौलाऐवजी मेटल शिट बसविणेत आलेले आहेत. मध्यवर्ती भागातील डोमवर १० एम एम जाडीचे (मल्टीवॉल ) पॉलिकार्बोनेट शिट बसविणेत आलेले आहेत. याकामी एकूण रु.१५.३४ लक्ष मात्र इतका खर्च आलेला आहे.

**०३. धर्मशाळा व साईनगर जनरेटर रुम जवळ टॉयलेट बांधकाम व धर्मशाळा जनरेटर रुम जवळ पेव्हींग ब्लॉक बसविणे :-**

धर्मशाळा (साईनाथ रुग्णालय) जनरेटर रुम परिसरात स्वच्छता राहावी, पावसाळयात चिखल होऊ नये यासाठी या परिसरात पेव्हींग ब्लॉक बसविणेत आले असून, कर्मचाऱ्यांचे सोयीसाठी संडास बाथरुम बांधणेत आले आहे. या कामासाठी रु.३.१५ लक्ष इतका खर्च झालेला आहे.

**०४. साईबाबा भक्त निवास (५०० रुम) कार्यालयाचे नूतनीकरण करणे :-**

संस्थानचे साईबाबा भक्त निवास (५०० रुम) कार्यालयाचे नूतनीकरण करणे, अंतर्गत रंगकाम, फरशी बदलणे, फर्निचर इ. कामे करणेत आली असून, त्यासाठी रु.८.०५ लक्ष इतका खर्च झालेला आहे.

**०५. श्री साईनाथ रुग्णालय - टॉयलेट मध्ये वेस्टर्न टाईप कमोड बसविणे :-**

संस्थानचे साईनाथ रुग्णालयातील भारतीय पध्दतीच्या संडास भांडयाचा वापर करणेस अडचण असलेल्या ऑर्थोपेडीक व इतर रुग्ण तसेच नातेवाईक यांचे सोयीसाठी वेस्टर्न टाईप कमोड भांडे असलेले टॉयलेटची आवश्यकता असल्याने २२ टॉयलेट मध्ये कमोड भांडे बसविणेत आले आहे. त्यासाठी रु.१.४६ लक्ष इतका खर्च आलेला आहे.

**०६. साईबाबा इंग्लिश मिडियम स्कुलचे स्टेज भोवती पेव्हींग ब्लॉक बसविणे :-**

श्री साईबाबा इंग्लिश मिडियम स्कुलचे परिसरात असलेले स्टेज भोवती पेव्हींग ब्लॉक बसवित आले आहे. त्यासाठी रु.४.७३ लक्ष खर्च झालेला आहे.

**०७. साई आश्रम व साई धर्मशाळा येथे रुम/हॉलमध्ये कपडे वाळविणेसाठी एस.एस.पाईप बसविणे :–**

साई आश्रम भक्तनिवास व साई धर्मशाळा हे भक्तनिवास प्रकल्प साई भक्तांकरीता सन २०१३ मध्ये खुले करण्यात आले आहे. साई भक्तांना रुममध्ये अधिकाधिक सुविधा देण्याचे दृष्टीने मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयान्वये प्रत्येक रुममध्ये व हॉलमध्ये कपडे वाळविणेसाठी एस.एस. पाईप फिटींग करण्यात आले आहेत. त्यासाठी रु.२१.७२ लक्ष मात्र इतका खर्च आलेला आहे.

## ※ प्रगतीपथावर असलेले प्रकल्प ※

**०१. मनोरंजनात्मक उद्यान उभारणी :–**

मा. व्यवस्थापन समितीचा मौजे निमगांव कोऱ्हाळे शिवारातील संस्थान मालकीच्या २० एकर जमिनीमध्ये साईभक्तांसाठी सेवार्थ मनोरंजनात्मक उद्यान उभारणीचा मानस आहे. या उद्यानामध्ये मनोरंजनात्मक लेजर शो, म्युझियम, सुशोभित कारंजे, बहूउद्देशीय हॉल आदि बाबींचा समावेश करण्यात येणार आहे. याकामी नवी दिल्ली येथील प्रसिध्द वास्तुविशारदाकडून आराखडे व खर्चाचे अंदाजपत्रक बनविण्यात आले आहे. या प्रकल्पांतर्गत लेजर शो, उभारणीचे कामासाठी Laser Vision Mega -Media Ltd, Hong Kong या कंपनीस रक्कम US$ ५५,००,००० मात्रचा कार्यादेश देणेत आलेला आहे. लेजर शो उभारणी साठी आवश्यक असणारे अनुषंगीक बांधकामे जसे, ॲम्फ़ीथिएटर, प्रेक्षागृह, उपहारगृहे, प्रसाधन गृहे, संरक्षक गृहे आदि उभारणीसाठी रक्कम रु.३२.७५ कोटी मात्र खर्च अपेक्षित आहे. सदर बांधकामे ठेकेदार मे के. आर. आर. इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा.लि. हैद्राबाद यांचेमार्फत करण्यात येत होते. परंतु त्यांचे कामाची प्रगती समाधानकारक नसल्याने त्यांना दिलेला कार्यादेश रद्द करण्यात आलेला असून, फेर निविदा मागविणेकरीता मा. उच्च न्यायालयाचे मंजुरीसाठी दिवाणी अर्ज दाखल करणेत आलेला आहे.

**०२. मौजे निमगांव – कोऱ्हाळे हद्दीतील चारी क्रमांक ११ बंदीस्त करुन त्यावरुन रस्ता तयार करणे :–**

मौजे निमगांव कोऱ्हाळे हद्दीतील शेती महामंडळाच्या जमिनीचे मोठे क्षेत्र संस्थानला भूसंपादनाच्या माध्यमातून मिळालेले असून, या जमिनींमध्ये सध्या संस्थानमार्फत विविध विकास प्रकल्प जसे हेलिपॅड, साई आश्रम प्रकल्प, साई गार्डन प्रकल्प, आदि हाती घेणेत आलेले आहेत. राबविणेत आलेले आहेत. सदरच्या जमिनींकडे जाणेसाठी जलसंपदा विभागाने संस्थान खर्चाने, सदर चारी क्रमांक ११ बंदिस्त करुन त्यावरुन १२ मीटर रुंदीचा व २.५० किमी लांबीचा रस्ता विकसित करणेस मान्यता दिलेली आहे. त्यानुसार मा. व्यवस्थापन समितीने सदरचा चारी रस्ता विकसित करणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.७.१० कोटी मात्र खर्चास मान्यता दिलेली आहे. सदर काम ठेकेदारामार्फत पूर्ण करणेत आले आहे.

**०३. सर्व्हे नं. १२४ मधील जागेत द्वारकामाई धुनीसाठी गोवरी शेडचे बांधकाम करणे :–**

द्वारकामाई धुनीसाठी लागणारे गोवरी व सरपण साठविणेसाठी शेडचे बांधकाम करणेत येत असून, ठेकेदार यांनी शेडचे प्लिंथलेव्हलचे काम पुर्ण केले आहे. याकामी एकूण रु.१४.३६ लक्ष इतका खर्च अपेक्षित आहे.

**०४. संस्थानचे वाहन विभागासाठी कार व कर्मचारी वाहने पार्किंग शेड तयार करणे :–**

वाहन विभागातील दुचाकी व चारचाकी वाहनांकरिता स्ट्रक्चरल स्टील व कलर कोटेड शिटमध्ये शेड उभारणेत आले असून याकामी रक्कम रु.५,२२,९६४/– मात्र खर्च आला आहे.

**०५. मौजे पांढुर्ली ता. सिन्नर येथील पालखी थांबा शेडचे नूतनीकरण करणे**

संस्थानचे मौजे पांढुर्ली ता. सिन्नर येथे पदयात्री पालखी घेऊन येणारे साईभक्तांचे निवासाकरिता पालखी थांबा उभालेला आहे. भक्तांचे विश्रांतीसाठी उभारणेत आलेल्या मुख्य शेडची उंची जास्त असल्याने वादळी पावसात पाणी शेडमध्ये येऊन भक्तांची धावपळ व गैरसोय होते. याकरिता मुख्य शेडचे दुरुस्तीसह नूतनीकरण करणे व परिसर विकास करणेकामी ठेकेदार यांना रक्कम रु.१८,७६,७८५/– मात्र रकमेचा कार्यादेश देण्यात आलेला आहे. सदर कामात खालील बाबींचा समावेश करुन ठेकेदारामार्फत काम सुरु आहे.

१) मुख्य शेडचे पश्चिमेस आठ फुट लेव्हलपर्यंत बांधकाम करणे व उर्वरीत भागात कलर कोटेड पत्र्याचे क्लॅडींग करणे.

२) मुख्य शेडमध्ये पश्चिम बाजूकडील भागात स्त्रीयांकरिता स्वतंत्र व्यवस्था करणेकामी दोन खोल्यांचेबांधकाम पूर्ण झाले आहे.

३) मुख्य शेडमध्ये पाणी आत येवू नये याकामी शेडचे एकूण उंचीचे (१५ फुट) वरुन सात फुटापर्यंत कलर कोटेड पत्रे बसविणे व ५ फुट रुंदीचे पत्र्याचे प्रोजेक्शन करणेकामी फॅब्रीकेशनचे काम ठेकेदार यांनी पूर्ण केले आहे.

४) परिसर सुशोभिकरण करणेकामी लॅन्डस्केपींग करणे व ब्लॉक बसविणेचे काम ठेकेदार यांनी सुरु केले आहे.

५) पालखी थांब्याचे मुख्य गेटवर कमान तयार करणे काम बाकी आहे.

**०६. मंदिर परिसराचे दक्षिण बाजूकडील कंम्पाउंड भिंतीवर परफोरेटेड एम.एस. शिटचे कंम्पाउंड करणे :**

शिर्डी येथील श्री साईबाबा समाधी मंदिर परिसराचे सुरक्षा ऑडीटनुसार दि. २५ ऑक्टोबर, २०१३ रोजी मा. पोलीस अधिक्षक यांनी घेतलेल्या बैठकीमध्ये श्री साईबाबा मंदिराचे सुरक्षिततेसाठी करावयाच्या उपाय योजनेनुसार मंदिर परिसराचे दक्षिण बाजुकडील कंम्पाउंड भिंतीचे राहीलेल्या भागातील बांधकाम करुन संपूर्ण भिंतीवर एम.एस परफोरेटेड शिटसचे व त्यावर स्पायरल बारबेड तारेचे कंम्पाउंड करणेचे कामासाठी ठेकेदार यांना रक्कम रु.५,७७,१५६/– मात्र रक्कमेचा कार्यादेश देणेत आलेला आहे. ठेकेदार यांनी एम एम परफोरेटेड शीटचे फ्रेमवर्क तयार करुन आणलेले असून सदर जाळया बसविणेचे काम सुरु केलेले आहे.

**०७. समाधी मंदिराजवळील देणगी काऊंटर नं. १ चे विस्तारीकरण करणे :–**

शिर्डी येथे श्रींचे दर्शनासाठी येणारे साईभक्तांचे प्रमाणात दिवसेंदिवस मोठया प्रमाणात वाढ होत आहे, तसेच सार्वजनिक सुट्टया व शाळा कॉलेजच्या सुट्टया या कालावधीत हे प्रमाण अधिकच असते. मंदिरात श्रींचे दर्शन करुन झालेनंतर साईभक्त संस्थानला विविध प्रकारे रोख रक्कम, चेक, डी.डी. परकीय चलन, कपडे, तसेच इतर वस्तु दान म्हणून देतात. सध्या सदरचे दान देणगी घेणेकामी संस्थानमार्फत तीन देणगी काऊंटर्स कार्यरत आहे. पैकी देणगी काऊंटर नं. १ हे समाधी मंदिरासमोर

आहे. सदरचे काऊंटर वर कायम गर्दी असते. याकरिता सदरहू काऊंटरचे अद्ययावत फर्निचर करुन विस्तारीकरण करणेचे ठरले आहे. याकामी ठेकेदारयांना रु.७,३९,६१०/– मात्र रक्कमेचा कार्यादेश देणेत आलेला आहे.

**०८. साई कॉम्प्लेक्स इमारतीतील देणगी कार्यालयाचे इंटेरिअर काम करणे :–**

साईभक्तांना गर्दीच्या काळामध्ये देणगी देणेसाठी मंदिर परिसरात न येता बाहेर देणगी देता यावी या हेतूने साईकॉम्प्लेक्स इमारतीमध्ये देगणी स्वीकरणेसाठी एक संगणकीय काऊंटरवर सुविधा उपलब्ध केलेली आहे. सदरचा साई कॉम्प्लेक्समधील गाळा तीनही बाजूने मोकळा आहे. साई कॉम्प्लेक्स येथील देणगी काऊंटरला सुरक्षेच्या व शांततेच्या दृष्टीने बंदिस्त व आकर्षक करणेकामी इंटेरिअर काम करणेकामी ठेकेदार यांना रु.८,३१,३७०/– मात्र रक्कमेचा कार्यादेश देणेत आलेला आहे.

**०९. मंदिर परिसरातील कापड कोठी विक्री काऊंटर रुमचे इंटेरीअर काम करणे :–**

श्रींना अर्पण केलेल्या वस्तू व कापड यांची तसेच सोने चांदीचे नाणेची विक्री कापड कोठी विक्री काऊंटरवर केली जाते. सदर ठिकाणी श्रींचे वस्तुंची भक्तांना व्यवस्थीत माहीती व्हावी तसेच वस्तु ठेवणेकरिता आवश्यक अशी सोय उपलब्ध व्हावी याकरिता सुनियोजीत स्वरुपात इंटेरिअर करणे आवश्यक असल्याने कॅश व विक्री काऊंटर, सोने चांदीचे नाणे ठेवणेसाठी शोकेस, कपडे ठेवणेकरिता हँगर व रॅक, इ. फर्निचर करणेकरिता ठेकेदारयांना रु. ८३,३७०/– मात्र रक्कमेचा कार्यादेश देण्यात आलेला आहे.

**१०. संस्थान मालकीच्या मौजे निमगाव कोऱ्हाळे व कनकुरी प्लॉटमधील विहीरींची खोली वाढविणेचे काम करणे :–**

संस्थानचे प्रसाद भोजन व्यवस्था व निवासव्यवस्थेकरीता बांधण्यात आलेल्या इमारतीकरिता पाणी पुरवठा करणेकामी कनकुरी येथे साठवण तलाव असून, सदर तलावातील पाण्याचे शुध्दीकरण करुन प्रत्येक भागातील इमारतीकरिता पाणी पुरवठा करणेकामी तयार करणेत आलेल्या अंडरग्राऊंड टाकीत सोडले जाते. तसेच संस्थानचे मालकीच्या विहीरींच्या पाण्याचा वापरही करणेत येतो.

दिवसेदिवस पावसाचे प्रमाण कमी होत असून तसेच भूगर्भातील पाण्याची पातळी खोल गेल्यामुळे संस्थानचे प्लॉटमधील विहीरीची खोली वाढविणे गरजेचे असल्यामुळे संस्थानचे मौजे निमगाव कोऱ्हाळे व कनकुरी येथील प्लॉटमधील पाच विहीरींची खोली वाढविणेकामी ठेकेदार यांना रु.९,९९,०००/– मात्र रक्कमेचा कार्यादेश देण्यात आला असून ठेकेदार यांनी पाचपैकी ३ विहीरींची खोली वाढविणेचे काम पूर्ण केले आहे.

**११. संस्थानचे सेवाधाम इमारतीमध्ये साईभक्तांचे सुविधेसाठी टॉयलेट ब्लॉकबनविणे :**

मौजे शिर्डी चे गावठान हद्दीत शिर्डीच्या मध्यवर्ती भागात असलेली सेवाधाम इमारत मंदिर परिसराजवळ असल्याने त्या भागात साईभक्तांची कायमच ये – जा असते. सेवाधाम इमारत नगर – मनमाड रोडच्या लगत व पालखी रोड लगत असल्याने तेथे पुरुष व महिलांकरीता शौचालय व मुताऱ्यांचे बांधकाम करणेत येत असून याकामी अंदाजे रु.९,६३,०००/– मात्र खर्च अपेक्षित आहे.

**१२. श्री साई प्रसादालय इमारतीमधील व्ही.आय.पी. डायनिंग हॉल वरील पॉलिकार्बोनेट डोमचे नूतनीकरण करणे :–**

संस्थानचे श्री साईप्रसादालय इमारतीचे पहिल्या माळयावरती दक्षिणेकडील हॉलमध्ये व्ही.आय.पी. भक्तांसाठी प्रसाद भोजन व्यवस्था करणेत येते. सदर हॉलकरिता मुळचे प्रसादालय बांधकामामध्ये डोमचे आकर्षक छत तयार करण्यात आलेले आहे. सदर डोमचे मध्यवर्ती भागास नैसर्गिक रित्या प्रकाश येणेकरिता पॉलिकार्बोनेट शिटचे डोम हे २००७ साली तयार करणेत आले होते. वातावरणाच्या परिणामामुळे सदरचे पॉलिकार्बोनेट शिट खराब झाले असून त्यातून व्ही.आय.पी. डायनिंग हॉलमध्ये काही ठिकाणी पावसाचे पाण्याची गळती होत होती. याकरिता सदर डोमचे पॉलिकार्बोनेट शिट बदलणेकरीता ठेकेदार यांना रक्कम रु.३,४९,०००/– मात्रचा कार्यादेश देणेत आला असून, ठेकेदार यांचेमार्फत काम प्रगतीपथावर आहे.

**१३. संस्थान जनरेटर रुम भोवती पेव्हींग ब्लॉक बसविणे :–**

श्री साई प्रसादालय परिसरातील जनरेटर रुम, पार्कींग व मौजे निमगांव को-हाळे येथील वर्ग चार कर्मचारी परिसरातील जनरेटर रुम भोवती पेव्हींग ब्लॉक बसविणेचे काम ठेकेदारांकडून पूर्ण करुन घेणेत आले असून याकामी रक्कम रु. ५,४९,६३०/– मात्र खर्च आला आहे.

**१४. श्री साईबाबा हॉस्पीटलमधील डोमचे पॉलिकार्बोनेट शिट बदलणे व Turbo Ventilator बसविणे :–**

संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पीटलचे नूतनीकरणसन २००६ मध्ये करणेत आले होते. हॉस्पीटलचे ओपीडी मध्ये मध्यवर्ती ठिकाणी व्हेन्टीलेशनचे दृष्टीने पॉलिकार्बोनेट शिट वापरुन डोम तयार करणेत आलेला आहे. सदर डोमचे पॉलिकार्बोनेट शिट कमकुवत झाल्याने सदरचे शिट बदलणे तसेच व्हेंन्टीलेशन करीता Turbo Ventilator बसविण्यात आले आहेत. याकरिता रक्कम रु. ४,३९,०००/– मात्र खर्च आला आहे.

**१५. श्री साई प्रसादालयातीलअन्नपदार्थाची क्वालिटी कंट्रोल व पृथ्थ:करणासाठी प्रयोगशाळा उभारणी करणे :–**

श्री साई प्रसादालयातील अन्न पदार्थांचे क्वालिटी कंट्रोल व पृथ्थ:करण करणेसाठी प्रयोगशाळा उभारणेत येत असून, त्यातील आवश्यक इंटेरीअर व फर्निचरचे काम करणेसाठी ठेकेदार यांना रक्कम रु. ९,००,०००/– मात्र रक्कमेचा कार्यादेश देणेत आला असून, प्रयोगशाळा फर्निचरचे काम अंतिम टप्प्यात आहे.

# संस्थानमार्फत अर्थसहाय्य केलेले सार्वजनिक विकास प्रकल्प

**०१. शिर्डी शहर एकात्मिक रस्ते विकास प्रकल्प :-**

शिर्डी शहर एकात्मिक रस्ते विकास योजना प्रकल्पातर्गत पहिल्या टप्प्यातील ११ रस्त्यांच्या भूसंपादनासह रुंदीकरण, मजबुतीकरण, सुशोभिकरण आदि कामासाठी अंदाजित एकूण रक्कम रुपये ८८ कोटी मात्रचा निधी उपलब्ध करुन देणेस मा. शासनाचे विधी व न्याय विभागाने मान्यता दिलेली आहे. शिर्डी शहरातील विविध एकूण २५ रस्त्यांपैकी ११ रस्त्यांचे रुंदीकरण मजबुतीकरण, डांबरीकरण / कॉंक्रीटीकरण व सुशोभिकरणासह रस्ते विकसित करण्याचे काम हाती घेणेत आले आहे. या प्रकल्पासाठी सर्व निधी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेमार्फत उपलब्ध करुन देण्यात येत आहे. मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेमार्फत भूसंपादन अधिकारी म्हणून मा. उपविभागीय अधिकारी, शिर्डी भाग, शिर्डी यांनी प्रथम प्राधान्य गटातील ११ रस्त्यांपैकी भूसंपादन आवश्यक असणाऱ्या ०९ रस्त्यांपैकी ०८ रस्त्यांच्या भूसंपादनाची कार्यवाही पूर्ण केली असून, सदर रस्त्यांची कामे सुरु आहेत. तसेच उर्वरीत एका रस्त्याची भूसंपादनाची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे.

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, पुणे / मुंबई यांचेमार्फत प्रथम प्राधान्य गटातील ११ रस्त्यांपैकी ०५ रस्ते विकसित करण्याचे काम अंदाजित रक्कम रु.१० कोटी मात्र खर्चाचे काम पूर्ण करणेत आले आहे. या प्रथम प्राधान्य गटातील ११ रस्त्यांपैकी ०६ रस्ते थेट संस्थानमार्फत विकसित करण्याचे अंदाजित खर्च रक्कम रुपये ३३.८३ कोटी मात्रचे कामापैकी उपलब्ध भागातील रु.२३ कोटी खर्चाचे काम पुर्णत्वावर असून उर्वरीत कामे अंतिम टप्प्यात आहे.

**०२. शिर्डी येथे अद्ययावत बसस्थानक तथा यात्रीनिवास विकसित करणे :-**

श्री क्षेत्र शिर्डी येथे श्री साईंच्या दर्शनासाठी देश - विदेशातून हजारो साईभक्त दररोज येत असतात. या साईभक्तांना निवारा, प्रसादभोजन या मुलभूत सोयी - सुविधांबरोबरच इतर अनुषंगिक सेवा संस्थान व्यवस्थापनामार्फत उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. या प्रयत्नांचाच एक भाग म्हणून, मा. व्यवस्थापन समितीने विविध निर्णयान्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे आर्थिक सहकार्यातून रा.प. महामंडळाचे मालकीच्या जमिनीत शिर्डी येथील बसस्थानक - तथा - यात्रीनिवास अद्ययावत सोयींनी युक्तअशा पध्दतीने विकसित करणेचा प्रकल्प सुरु करणेत आला आहे. याकामी मा. शासनाने रक्कम रुपये ७.६६ कोटी मात्र इतका निधी उपलब्ध करुन देणेस मान्यता दिलेली आहे. सदरहू बसस्थानक इमारतीचे बांधकाम प्रगतीपथावर असून आर.सी.सी., विट बांधकाम, आतीलव बाहेरील प्लास्टर टेरेस वॉटरप्रुफींग, इ. कामे पूर्ण झालेली आहे. पहीला, दुसराव तिसऱ्या मजल्यावरील रुम व पॅसेजमधील व्हिट्रीफाईड टाईल्स, फलोअरिंग व डॅडोचे काम पूर्ण झालेले आहे. तळमजला ग्रॅनाईट फ्लोअरिंगव व्हिट्रीफाईड टाईल्स डॅडोचे काम प्रगतीपथावर आहे. तसेच परिसर विकास कामातील कंम्पाउंड भिंतीचे बांधकाम व ट्रीमिक्स कॉंक्रीट करणेचे काम प्रगतीपथावर आहे.

**०३. शिर्डी शहरातील दुसऱ्या टप्यातील एकूण २४ पैकी भूसंपादनाची आवश्यकता नसलेले १७ रस्ते विकसन करणे :-**

शिर्डी शहरातील दुसऱ्या टप्यातील एकूण २४ रस्ते विकसन करण्याचे नियोजित असून भूसंपादनाची आवश्यकता नसलेले १७ रस्त्यांचे सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत विकसनासाठी रु.४७.०२ कोटी खर्चास शासन मान्यता प्राप्त झाली आहे. शासनाचे निर्देशानुसार खर्चास परवानगीसाठी मा. उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठात अर्ज सादर करणेत येत आहे.

**०४. शिर्डी शहरातील दुसऱ्या टप्यातील एकूण २४पैकीभूसंपादनाची आवश्यकता असलेले ०७ रस्ते भूसंपादनासह विकसित करणे :-**

मा. शासनाचे विधी व न्याय विभागाचे निर्देशानुसार सदर प्रकल्पासाठी अपेक्षित खर्च रु.१११.५४५ कोटी खर्चास परवानगीसाठी मा. उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठात अर्ज सादर करणेत आला आहे.

# विश्वस्तव्यवस्थेचे नियोजित विकास प्रकल्प

**०१. सुपर स्पेशालिटी हॉस्पीटल :-**

मौजे नांदुर्खी ता. राहाता येथील संस्थानला विनामुल्य प्राप्त होणाऱ्या जमिनीमध्ये नियोजित सुपर स्पेशालिटी हॉस्पीटल, जनरल हॉस्पीटल व वैद्यकीय अधिकाऱ्यांकरीता निवासस्थाने बांधकामाचे नियोजन आहे. सदर प्रकल्पासाठी आर्किटेक्ट व तज्ञ सल्लागार संस्था नेमणेत आलेली आहे.

**०२. वाढीव पाणीपुरवठा योजना राबविणे :-**

संस्थानची भविष्यातील वाढत्या पाण्याची गरज लक्षात घेता, वाढीव पाणी पुरवठा योजना राबविणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने संस्थान परिसरात नवीन जलवाहिन्या टाकणे, वाढीव क्षमतेचा जलशुध्दीकरण प्रकल्प उभारणे, ओव्हरहेड पाण्याच्या टाक्यांचे बांधकाम करणे, पाणी वितरण व्यवस्था वाढविणे, पाणीपुरवठा प्रकल्पाचे संगणकीकरण करणे आदि बाबींचा समावेश असलेला प्रकल्प महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या माध्यमातून राबविणेसाठी कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे.

**०३. मंदिर परिसर पुनर्विकास व दर्शन रांग इमारत विकसित करणेचा प्रकल्प राबविणे :-**

शिर्डी येथे श्री साईंच्या दर्शनासाठी येणाऱ्या साईभक्तांच्या वाढत्या गर्दीचे नियोजनासाठी व भक्तांना दर्शन सुलभ, सोयीस्कर व्हावे, दर्शन रांगेत भक्तांना सर्व सुविधा उपलब्ध व्हाव्यात या दृष्टीने मंदिर व जुने प्रसादालय परिसराचे पुन:र्नियोजन करण्याचा निर्णय मा. व्यवस्थापन समितीने घेतलेला आहे. या पुनर्विकास प्रकल्पात साईभक्तांना सुधारीत दर्शन रांग, प्रतिक्षा गृह, चप्पल स्टॅण्ड, मोबाईल व लगेज लॉकर्स, बुकस्टॉल, कापडकोठी, लाडू प्रसाद काऊंटर्स, देणगी काऊंटर्स, उपहारगृहे आदि सुविधांचा तसेच सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक त्या सर्वंकष बाबी समाविष्ट करुन मंदिर परिसर पुनर्विकास प्रकल्पासाठी नामांकीत वास्तुविशारदांकडून संकल्पना चित्र व प्राथमिक अंदाजपत्रक तयार करुन घेण्यात आले असून याकामासाठी येणाऱ्या खर्चास मा. मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांचे मान्यतेसाठी सिव्हील अर्ज दाखल करणेबाबत कार्यवाही करणेत येत आहे. मा.उच्च न्यायालयाची मान्यता मिळालेनंतर त्यानुसार मंदिर परिसर पुनर्विकास व दर्शन रांग इमारत करण्याचा प्रकल्प सुरु करण्यात येणार आहे.

**०४. शिर्डी शहरातुन जाणारे अहमदनगर - मनमाड (राज्यमार्ग क्रमांक १०) रस्त्याखालून पादचाऱ्यांसाठी भुयारी मार्ग करणे :-**

शिर्डी शहर हे मुंबई, पुणे, नाशिक, अहमदनगर, औरंगाबाद इत्यादी मोठया शहरांना जोडणाऱ्या अहमदनगर - मनमाड या राज्यमार्ग क्रमांक १० लगत आहे. या राज्यमार्गाचे पुर्व बाजूस श्री साईबाबा समाधी मंदिर, भक्तनिवासस्थाने आदि परिसर असून पश्चिम बाजूस श्री साई प्रसादालय, रुग्णालये व कर्मचारी निवासस्थाने आहेत. त्यामुळे सदरचा राज्यमार्ग ओलांडणाऱ्या साईभक्त व स्थानिक नागरिक पादचाऱ्यांची संख्या मोठया प्रमाणावर आहे. दिवसेंदिवस वाढणारी भक्तांची गर्दी व वाहतुकीमुळे भक्तांसह स्थानिक नागरींकांना सदरचा राज्यमार्ग ओलांडणे अत्यंत कठीण व धोकादायक झालेले आहे.

सदरचे राज्यमार्गाचे मजबुतीकरणासह विस्तारीकरणाचे काम शासनमार्फत करण्यात येणार आहे. त्यास

अनुसरुन शिर्डी शहरातून जाणाऱ्या राज्यमार्गावर आवश्यक अशा पाच ठिकाणी रस्ता ओलांडणेसाठी प्रशस्त भुयारी मार्ग (Under Pass Subway) करणेसाठी येणारे एकूण रु.१८.२४ कोटी मात्रचे खर्चास संस्थानचे मा. व्यवस्थापन समितीने मान्यता दिलेली असून याकामी शासन मान्यतेस्तव प्रस्ताव सादर करणेत येत आहे.

**०५. सर्व्हे नंबर १२४ मधील जागेत नविन भांडार इमारत बांधकाम करणे :–**

दिवसेंदिवस संस्थानचा व्याप वाढत असल्याने अन्नधान्य, किराणा माल व इतर मटेरिअल साठविणेकामी सध्याची व्यवस्था अपूरी पडत असल्यामुळे नविन भांडार इमारत बांधकाम प्रस्तावित आहे. याकामी रुपये ८.५० कोटी खर्चास मा. त्रिसदस्य समितीचे सभेत मान्यता देणेत आली असून याकामी आर्किटेक्ट यांचेकडून आराखडे व अंदाजपत्रक तयार करुन घेणेबाबत कार्यवाही सुरु आहे.

**०६. संस्थानचे अधिकारी व कर्मचाऱ्यांकरीता निवासस्थानांचे बांधकाम करणे :–**

श्री साईंचे दर्शनासाठी साई भक्तांची दिवसेंदिवस गर्दी वाढत असल्याने साईभक्तांना पुरविण्यात येणाऱ्या सोयी – सुविधांमध्ये वाढ होत आहे. भक्तांना अधिक तत्पर सेवा उपलब्ध करण्याचे दृष्टीने संस्थानमार्फत शिर्डी व निमगांव कोऱ्हाळे हद्दीत अधिकारी व कर्मचारी निवासस्थान बांधण्यात आलेले आहेत. सदरची व्यवस्था अपुरी पडत असल्याने बरेच अधिकारी व कर्मचारी यांना १५ – २० कि.मी. पेक्षा पुढील अंतरावरुन शिर्डी येथे कामावर यावे लागते. याकरीता नव्याने ४३० सदनिका बांधणे प्रस्तावीत आहे. याकरीता अंदाजे ७४.६९ कोटी मात्र खर्च अपेक्षित आहे. याकामी आर्किटेक्टचरल प्लानिंग करीता सेवा घेणेसाठी RFP (Request for Proposal) मागविण्याची कार्यवाही करणेत येत आहे.

**०७. साईबाबा भक्तनिवास व शैक्षणिक संकुल परिसरात रेन वॉटर हार्वेस्टींगप्रकल्प राबविणे :–**

परिसरातील जमिनीतील पाणी पातळीत दिवसेंदिवस घट होत आहे. पर्यावरणाचा समतोल राखणेसाठी या परिसरात रेन वॉटर हार्वेस्टींग प्रकल्प राबविणेचे प्रस्तावीत आहे. याकामी येणारे रु.९,४८,३८४/– मात्रचे खर्चास मान्यता देणेत आली आहे.

**०८. मौजे निमगांव कोऱ्हाळे गट नं. १७२ मधील संस्थानचे साई धर्मशाळा परिसरात साईभक्तांना श्रींची पालखी ठेवणेसाठी शेड करणे :–**

श्री साई धर्मशाळा इमारत दि.१८/०७/२०१३ रोजी पासून साईभक्तांचे वापरासाठी खुली करण्यात आली आहे. सदरहू इमारतीचे A व F या दोन इमारतीचे मधिल मोकळया जागेत स्टेज कार्यक्रमाकरिता ओटा करण्यात आला आहे. सदर ठिकाणी २१ x ३१ मीटर आकाराचे कलर कोटेड शिट रुफचे शेड साईभक्तांना पालखी ठेवण्यासाठी प्रस्तावीत आहे. याकामी मा. त्रिसदस्य समितीचे सभेत येणारे अंदाजे ३२ लक्ष मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली असून, याकामी मा. मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे परवानगी घेणेकामी सिव्हील अर्ज दाखल करणेत येणार आहे.

**०९. संस्थानचे मौजे निमगांव–कोऱ्हाळे गट नं. १९ पैकी मधील हेलीपॅड भोवती पेव्हींग ब्लॉक बसविणे :**

संस्थानचे हेलीपॅड भोवती पेव्हींग ब्लॉक बसविणे व वेटींग लाँज मधील अल्यु. स्लायडींग खिडक्या बसविणे, अंतर्गत भिंतीना लस्टर पेंट करणे फॉल्स सिलींग इ. कामे करणे प्रस्तावीत आहे. याकामी

येणारे अंदाजे रु. १५,३५,८७०/– मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली असून, याकामी मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाचे मान्यतेस्तव प्रस्ताव सादर करणेत आला आहे.

**१०. श्री साईबाबा हॉस्पीटल व द्वारावती भक्तनिवास इमारत प्रवेशद्वार, गेट व सुरक्षा केबीन बांधकाम करणे :–**

संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पीटल व द्वारावती भक्तनिवास इमारतीचे मेनगेटवर साईभक्त व नागरीकांचे मार्गदर्शनार्थ प्रवेशद्वार, गेट व सुरक्षा केबीन बांधकाम प्रस्तावीत आहे. याकामी रुपये १३.४० लक्ष खर्च अपेक्षित आहे. सदर कामासाठी मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांची परवानगीसाठी सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करणेत येत आहे.

**११. श्री साईनाथ माध्यमिक विद्यालय इमारत कंम्पाउंड बांधकाम व रंगकाम करणे :–**

श्री साईनाथ माध्यमिक विद्यालय इमारतीचे पश्चिम बाजूकडील कम्पाउंड वॉल बांधणे आवश्यक असल्याने तसेच सदर इमारतीचे रंगकामही खराब झालेले असल्याने सदरची कामे करणेस मा. त्रिसदस्य समितीचे सभेत मान्यता दिली असून त्यासाठी रु.१२.४३ लक्ष खर्च अपेक्षित आहे. सदर कामासाठी मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांची परवानगीसाठी अर्ज सादर करणेत येत आहे.

**१२. समाधी मंदिर परिसर फ्लोअरिंगचे नूतनीकरण करणे :–**

श्री साईबाबा मंदिर परिसर पुनर्विकास प्रकल्प संस्थानतर्फे यापुर्वी १९९९ मध्ये पुर्ण करणेत आलेला आहे. त्यावेळी मंदिर परिसरात रफ शहाबाद फरशी बसविण्यात आलेली आहे. सदर फलोरिंगचे काम पूर्ण होऊन आता तेरा वर्षा पेक्षाही अधिक कालावधी झालेला आहे. काळाचे ओघात सदर फलोरिंग बऱ्याच ठिकाणी खराब झालेले आहे. त्यासाठी सदर फलोरिंगचे नूतनीकरण करणे आवश्यक आहे. मा. त्रिसदस्य समितीचे दिनांक ०७ फेब्रुवारी २०१३ रोजी झालेल्या सभेत श्री साईबाबा मंदिर परिसरातील फलोरिंगचे नूतनीकरण करणेसाठी रु.२.०० कोटी मात्रचे खर्चास मान्यता दिलेली आहे. सदरहू निर्णयास परवानगी मिळणेसाठी मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडेस सिव्हील ऍप्लीकेशन नं.७८९६/२०१३ दाखल करण्यात आलेले असून अद्याप त्यावर मे. न्यायालयाचेआदेश झालेले नाहीत.

**१३. संस्थानचे प्रवेशद्वारावर कायमस्वरुपी मोर्चे तयार करणे :–**

संस्थानचे मंदिर परिसरातील गेट नं.१ मधुन मंदिरात दर्शनासाठी व्ही.आय.पी. येत असतात व त्यालगत नगर मनमाड राज्य मार्ग क्रमांक १० असल्याने मंदिर सुरक्षेसाठी कार्यरत असलेल्या पोलीस कर्मचारी यांचेसाठी कायमस्वरुपी मोर्चा तयार करणेबाबत विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक परिक्षेत्र यांनी संस्थानला कळविले आहे.

तसेच मा. त्रिसदस्य समितीचे निर्णयानुसार मंदिर परिसरातील सुरक्षा व्यवस्थेसाठी श्री साईबाबा मंदिर परिसराचे चार महाद्वारांचे लगत संस्थानतर्फे मोर्चे उभारणेत यावेत व त्यासाठीचे आराखडे पोलीस विभागाकडून प्राप्त करुन घ्यावेत असे ठरले आहे. त्यानुसार मंदिर परिसराचे चारही प्रवेशद्वारावर कायमस्वरुपी सुरक्षा मोर्चे उभारणेकामी ठेकेदार यांना कार्यादेश देणेत आला असून याबाबत कार्यवाही सुरु आहे.

**१४. मौजे निमगांव को-हाळे हद्दीतील नगर मनमाड रोड ते गोदावरी उजवा कालवा लगत चर रस्त्यांचे डांबरीकरण करणे :–**

मौजे निमगांव को-हाळे हद्दीतील नगर मनमाड रोड ते गोदावरी उजवा कालवा (संस्थानचे गट नं.२२१ व २४५)लगतच्या चर रस्त्याचे डांबरीकरणाचे काम सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत संस्थान निधीतून यापूर्वी करणेत आलेले आहे. सदर रस्त्यावरुन परिसरात सुरु असलेल्या बांधकाम साहित्याचे डंपर्स तसेच पाण्याचे टँकर व इतर जड वाहतुक सुरु असल्याने काही भागात रस्ता खचलेला असून रस्त्यावर जागोजागी खड्डे पडलेले आहेत.

सदर रस्त्यालगत संस्थानच्या जमिनी, कर्मचारी निवासस्थाने व साई आश्रम भाग २ भक्तनिवास असल्याने रस्त्याचे डांबरीकरण करणे आवश्यक असल्याने अंदाजे २ कि.मी. लांबीचा व ३.७० मीटर रुंदीच्या रस्त्याचे खडीकरणासह डांबरीकरण करणेकामी मा. त्रिसदस्य समितीचे सभेत रक्कम रुपये ३६.२९ लक्ष मात्रचे खर्चास मान्यता दिलेली आहे. सदर रस्ता नाशिक जलसंपदा विभाग, नाशिक यांचे अखत्यारित असल्याने त्यांची परवानगी मिळणेकामी प्रस्ताव पाठविलेला असता, सदर काम जलसंपदा विभागामार्फत या विभागाकडून संस्थान निधीतून डिपॉझिट ठेव तत्वावर करण्यात येईल. यासाठीचा निधी संस्थानचे या विभागाकडे वर्ग करावा तसेच नियोजित कामाचे प्लॅन व एस्टिमेट विभागीय कार्यालयास सादर करावे असे मा.उप विभागीय अधिकारी उजवा तट व कालवा, राहाता यांनी संस्थानला कळविले आहे. मा. व्यवस्थापन समितीचे दि.०८/०१/२०१४ रोजीचे सभेतील निर्णयास अनुसरुन, संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपिठाचे मार्गदर्शन घेण्यात यावे व त्यानंतर फेर प्रस्ताव सभेपूढे सादर करणेत यावा, असे ठरले. त्यानुसार विधी विभागामार्फत मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांचे न्यायालयात दिवाणी अर्जदाखल करणेबाबत संस्थान वकील यांना कळविणेत आलेले आहे.

**१५. साईनगर कर्मचारी निवासस्थान (साईचिंतन, समर्पण, साईनगर)इमारतीभोवती उर्वरीत भागात पेव्हींग ब्लॉक बसविणे :–**

साईनगर परिसरातील इमारतीचे भोवती विशेषत: पश्चिम व दक्षिणेकडील कंम्पाउंडचे आतील बाजूने ड्रेनेज लाईन जात असल्याने व त्या भागात उंदिर घुशींची बिळे असल्याने साफसफाई करणे अडचणीचे होते. तसेच या भागात गवत वाढून डासांचा प्रादुर्भाव होतो. करीता याभागात पेव्हींग ब्लॉक बसविणेस मा. त्रिसदस्य समितीने मान्यता दिली असून या कामासाठी अंदाजे रु.१४ लक्ष खर्च अपेक्षित आहे. सदर कामासाठी मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांची परवानगीसाठी अर्ज सादर करणेत येत आहे.

**१६. साईबाबा भक्तनिवास (५०० खोल्या) मधील २०० खोल्यांचे नूतनीकरण करणे :–**

श्री साईच्या दर्शनासाठी येणाऱ्या साईभक्तांना निवासस्थान सुविधा उपलब्ध करुन देणेसाठी सन १९९५ मध्ये साईबाबा भक्तनिवास ही ५०० खोल्या असलेली इमारत साईभक्तांचे निवास व्यवस्थेसाठी खुलीकरण्यात आली. सततचे वापराने खोल्यांचा रंग, दरवाजे, खिडक्या खराब झाल्याने सदर इमारतीतील पहिल्या टप्प्यात १०० खोल्यांचे नूतनीकरण करणेत आले आहे. या कामासाठी अंदाजे

४.१० कोटी खर्च अपेक्षित आहे. सदर कामासाठी मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचे परवानगीसाठी दिवाणी अर्ज दाखल करणेत येत आहे.

**१७. साई आश्रम भाग – ०२ येथील हॉल्सकरिता लॉकर्स खरेदी करणे :–**

साई आश्रम प्रकल्पाचे भाग ०२ येथील डॉरमेटरी हॉल्समध्ये भक्तांचे सुविधेकरिता ५७६ नग एम.एस. (सी. आर. सी.ए.) लॉकर्स युनिट खरेदी करणे प्रस्तावीत आहे.

**१८. साई आश्रम भाग ०२ येथील हॉल्सकरीता कॉट खरेदी करणे :–**

साई आश्रम प्रकल्पाचे भाग ०२ येथील डॉरमेटरी हॉल्समध्ये भक्तांचे सुविधेकरीता १६८० नग एम.एस. (सी. आर. सी.ए. ) कॉटस् खरेदी करणे प्रस्तावीत आहे.

**१९. साईबाबा हॉस्पीटल आतील रंगकाम करणे :–**

श्री साईबाबा हॉस्पीटलचे आतील भागाचे रंगकाम बऱ्याच ठिकाणी खराब झालेले असल्याने रुग्णालय स्वच्छ व सुंदर दिसावे यासाठी येणारे रु.९,८३,५६०/– मात्रचे खर्चास मा. व्यवस्थापन समितीचे दि.०३/०८/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ६२४अन्वये मान्यता देणेत आली आहे.

**२०. साईआश्रम भक्तनिवास येथील बुक स्टॉलकरिता विक्री काऊंटर तयार करणे :–**

साई आश्रम भक्तनिवास येथे साईभक्तांना कॅलेंडर, डायरी, साईचरित्र ग्रंथ, सी.डी. इ. सुलभतेने मिळणेकामी बुकस्टॉल सुरु करणेत आहे. सदर ठिकाणी सेल्स काऊंटर तयार करावयाचे आहे. त्यासाठी रु.५०,०००/– मात्रचे खर्चास मान्यता देणेत आली आहे.

**२१. साईभक्तांचे मार्गदर्शनासाठी साईनगर रेल्वे स्टेशन व नगर मनमाड रस्त्याचे दुतर्फा माहिति फलकलावणे:–**

श्री साईंचे दर्शनासाठी येणाऱ्या साईभक्तांचे मार्गदर्शनासाठी शिर्डी रेल्वे स्टेशन व नगर मनमाड रोडचे बाजूस विविध ठिकाणी भक्तनिवास बाबतचे माहितीचे फलक हाय इंटेसिटी रेडियममध्ये तयार करुन लावणे प्रस्तावीत आहे. याकामी येणारे रु.१,२५,०००/– मात्रचे खर्चास मान्यता देणेत आली आहे.

**२२. श्री साईबाबा हॉस्पीटल येथील आय.सी.सी.यु. करिता बेडस् ची संख्या वाढविणे :–**

श्री साईबाबा हॉस्पीटल येथील न्युरो ओटीतील Recovery रुम, ऑर्थो ओटीमधील Recovery रुम व Minor ओटी हे दोन्ही विभाग एकत्रित करुन, तेथे १० ते १२ बेडस् चा आय.सी.सी. यु. वॉर्ड तयार करणेस व याकामी येणारे रु. ३,३६,०००/– मात्रचे खर्चास मान्यता देणेत आली आहे.

**२३. श्री साईबाबा हॉस्पीटल जनसंपर्क कार्यालयासमोर ॲवेनिंगशेड उभारणे :–**

श्री साईबाबा हॉस्पीटल येथील जनसंपर्क कार्यालयासमोर पेशंटचे नातेवाईकांचे ऊन, पावसापासून संरक्षण व्हावे यासाठी ॲवेनिंगशेड उभारणे प्रस्तावीत आहे.याकामी येणारे रु.७८,०००/– मात्रचे खर्चास मान्यता देणेत आली आहे.

**२४. साई आश्रम भक्तनिवास येथे कर्मचारी दुचाकी पार्किंग व्यवस्था करणे :–**

संस्थानचे साई आश्रम भक्तनिवास येथे कर्मचारी दुचाकी पार्किंग व्यवस्था टेंसाईल फॅब्रीक शिट रुफींगमध्ये शेड उभारणी करणे प्रस्तावीत आहे. याकामी रु.२६.२८ लक्ष मात्र इतका खर्च अपेक्षित आहे.

सदर कामासाठी मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांचे परवानगीसाठी सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करणेची कार्यवाही चालू आहे.

२५. **साईआश्रम भक्तनिवास येथे साईभक्तांकरीता बस वेटींग शेडचे बांधकाम करणे :–**

संस्थानचे साई आश्रम भक्तनिवास येथून भक्तांना मंदिरात श्रींचे दर्शनाकरीता येणेसाठी व मंदिरातुन भक्तनिवास येथे जाणेसाठी संस्थानमार्फत मोफत बसव्यवस्था उपलब्ध करण्यात आलेली आहे. त्यामुळे मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयान्वये सदर ठिकाणी भक्तांकरीता बस वेटींग शेडचे बांधकाम करणे प्रस्तावीत आहे. याकामी रु.९.७२ लक्ष मात्र इतका खर्च अपेक्षित आहे.

२६. **साई धर्मशाळा येथे साईभक्तांकरीता बस वेटींग शेडचे बांधकाम करणे :–**

संस्थानचे साई धर्मशाळा येथून भक्तांना मंदिरात श्रींचे दर्शनाकरिता येणेसाठी व मंदिरातून धर्मशाळा येथे जाणेसाठी संस्थानमार्फत मोफत बसव्यवस्था उपलब्ध करण्यात आलेली आहे. त्यामुळे वेटींग शेडचे बांधकाम करणे प्रस्तावीत आहे. याकामी रु.९.८६ लक्ष मात्र इतका खर्च अपेक्षित आहे.

२७. **साई आश्रम भक्तनिवास येथे साई भक्तांकरीता उपहारगृहाचे बांधकाम करणे :–**

संस्थानचे साई आश्रम भक्तनिवास हा प्रकल्प विस्तीर्ण स्वरुपाचा आहे तसेच तेथील निवास व्यवस्थाही मोठया स्वरुपाची आहे. त्यामुळे सदरहू ठिकाणी ०२ नविन उपहारगृहांचे बांधकाम करणे प्रस्तावीत आहे. याकामी रु.४८.४२ लक्ष मात्र इतका खर्च अपेक्षीत आहे. सदर कामासाठी मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचे परवानगीसाठी दिवाणी अर्ज दाखल करणेची कार्यवाही चालू आहे.

२८. **संस्थानचे मौजे निमगांव को-हाळे येथील गट नं.१६९ मधील कर्मचारी निवासस्थान इमारतीचे सांडपाण्याचे व्यवस्थापन करणे :–**

संस्थानचे वर्ग ४ कर्मचाऱ्यांकरिता मौजे निमगांव को-हाळे येथील गट नं.१६९ मध्ये ९६ सदनिका असलेल्या एकूण आठ इमारतीचे बांधकाम करणेत आलेले असून सदरहू सदनिकाचा वापर रहिवासाकरिता सुरु आहे. तसेच सदर निवासस्थानचे लगत संस्थान कर्मचाऱ्यांची श्री साईप्रसाद हौसिंग सोसायटी आहे. सदर इमारतीचे ड्रेनेज लाईनचे सांडपाणी तसेच गट नं.१७२ मधील साई धर्मशाळा मधील इमारतीचे सांडपाण्याचे लाईन नाला क्र. ३२ पर्यंत जोडलेली आहे. या दोन्ही ठिकाणचे सांडपाणी हे वसाहतीपासून ते नगर मनमाड रस्त्यांचे पूर्वेस एक गटारातून सोडणेकामी ४५० एम एम व्यासाची आर सी सी पाईप लाईन टाकावी लागणार आहे. सदरची लाईन टाकणेकामी येणाऱ्या अंदाजे ३३.९४ लक्ष मात्रचे खर्चास मा. व्यवस्थापन समितीचे सभेत मान्यता देण्यात आली आहे. तसेच उपरोक्त खर्चास संस्थानमार्फत मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात येऊन, मा. खंडपीठाच्या मान्यतेनंतर कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.

**इतर कामे :–**

२९. ऊन पावसापासून साईभक्तांचे संरक्षण व्हावे यासाठी द्वारावती भक्तनिवास / साईनाथ रुग्णालय परिसरातील कॅन्टीन समोर शेड उभारणेत आले आहे. त्यासाठी रु.४.२१ लक्ष इतका खर्च अपेक्षित आहे.

३०. श्री साईबाबा भक्तनिवास, द्वारावती भक्तनिवास, साई आश्रम भक्तनिवास व साई धर्मशाळा परिसरात वाहनांची गती नियंत्रीत ठेवणेसाठी उचित अंतरावर स्पीड ब्रेकर बसविणे प्रस्तावीत असून, याकामी रक्कम रु.६,१६,६८८/– मात्र इतका खर्च अपेक्षित आहे.

३१. श्री साईनाथ रुग्णालयातील कार्यालयीन फर्निचर, लिनन व स्टेशनरी विभागातील फर्निचर नूतनीकरण करणेचे रुग्णालयाचे आवश्यकते नुसार सदरहू कामे प्रस्तावीत असून, त्यासाठी एकूण रु.५.४० लक्ष खर्च अपेक्षित आहे.

३२. श्री साईनाथ रुग्णालयाचे पश्चिमेकडील (वायव्य) कोपऱ्यातील मोकळया जागेत रुग्णांचे नातेवाईकांना बसणेसाठी जागा उपलब्ध व्हावी यासाठी पेव्हींग ब्लॉक बसविणेसाठी रु.९.१० लक्ष खर्च अपेक्षित आहे.

३३. साईबाबा भक्तनिवास पुर्व व पश्चिम बाजुस इमारती लगत साफसफाई राहावी यासाठी पेव्हिंग ब्लॉक बसविणेसाठी रु.८.९१ लक्ष खर्च अपेक्षित आहे.

३४. द्वारावती भक्त निवास इमारतीत देणगीदार भक्तांचे नावाच्या देणगी नेम प्लेट बनविणेसाठी रु.१ लक्ष खर्च अपेक्षित आहे.

३५. द्वारावती भक्तनिवास इमारतीसमोरील गार्डन मध्ये पाथवे करणे – गार्डन मध्ये येणाऱ्या भक्त व नागरिकांचे सोयीसाठी पेव्हींग ब्लॉक बसवून पाथवे करणेसाठी रु.१२.३० लक्ष खर्च अपेक्षित असून याकामी मा.मुंबई उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठात दिवाणी अर्ज सादर करणेबाबत विधी विभागामार्फत कार्यवाही करणेत येत आहे.

३६. श्री साईनाथ रुग्णालयाचे इमारतीस डास प्रतिबंधात्मक सोय म्हणून ॲल्युमिनियम स्लायडिंग विंडो करणेसाठी रु.२०.८३ लक्ष खर्च अपेक्षित असून मा. मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांचे परवानगीसाठी अर्ज सादर करणेत येत आहे.

३७. द्वारावती इमारतीचे आतील भागचे रंगकाम करणे आवश्यकअसल्याने त्यासाठी येणाऱ्या रु.८२.६४ लक्ष खर्चास मान्यता मिळणेसाठी .मुंबई उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठात दिवाणी अर्ज विधी विभागामार्फत सादर करणेत येत आहे.

३८. साईनाथ रुग्णालय इमारतीचे अंतर्गत रंगकाम करणे आवश्यक असल्याने त्यासाठी रु.३०.३३ लक्ष खर्चास मान्यता मिळणेकामी मा. मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठात दिवाणी अर्ज सादर करणेत येत आहे.

३९. शैक्षणिक संकुल इमारतींचे रंगकाम करणे आवश्यक असल्याने त्यासाठी रु.१७.०९ लक्ष खर्चासमुंबई उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठात दिवाणी अर्ज विधी विभागामार्फत सादर करण्यात येत आहे.

४०. साईनाथ रुग्णालय इमारतीसाठी जागा कमी पडत असल्याने सध्याचे स्वयंसेवी प्रसाद भोजन (कॅन्टीन) इमारत उपलब्ध करुन देणेचे ठरले असल्याने कॅन्टीनसाठी नवीन शेड बांधणेसाठी रु.१८.९० लक्ष खर्चास मुंबई उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठात दिवाणी अर्ज विधी विभागामार्फत सादर करणेत येत आहे.

**४१.** सर्व्हे नं. १२४ मधील भांडार विभागाचे इमारतीचे संरक्षणाचे दृष्टीने यापरिसरातील कंम्पाउंडची उंची वाढविणे गरजेचे असल्याने त्यासाठी अपेक्षित रु.९.१८ लक्ष खर्चाचे काम प्रस्तावीत आहे.

**४२.** व्यायाम शाळेचे सुरक्षेचे दृष्टीने सध्याचे कंम्पाउंडची उंची वाढविणे व उर्वरीत भागात नविन कंम्पाउंड बांधणे आवश्यक असल्याने रु.९.७६ लक्ष खर्चाचे काम प्रस्तावीत आहे.

**४३.** द्वारावती इमारतीचे पुर्व व पश्चिम बाजुस पेव्हिंगब्लॉक बसविणेचे काम प्रस्तावित असून, याकामी रु.८ लक्ष मात्र खर्च अपेक्षित आहे.

**४४.** साईनाथ रुग्णालय गायनिक वार्ड नूतनीकरण करणेचे प्रस्तावित असून,रुग्णालयाचे आवश्यकतेनुसार गायनिक वॉर्डचे नूतनीकरणेसाठी रु.१.६४ लक्ष खर्च अपेक्षित आहे.

## अपारंपारिक उर्जा स्त्रोत प्रकल्प

केंद्र व राज्य शासनाचे धोरणानुसार व मार्गदर्शक तत्वांनुसार, उपलब्ध असणाऱ्या अपारंपारिक ऊर्जा स्त्रोतांचा वापर करुन घेण्याचे दृष्टीने संस्थानमार्फत खाली नमुद केलेले प्रकल्प कार्यान्वीत करणेतआलेले आहेत :

- **कार्यान्वीत प्रकल्प :–**

०१. साईप्रसाद निवासस्थान – सोलर वॉटर हिटींग सिस्टीम
०२. व्दारावती निवासस्थान – सोलर वॉटर हिटींग सिस्टीम
०३. श्री साईबाबा भक्तनिवासस्थान – सोलर वॉटर हिटींग सिस्टीम
०४. श्री साई प्रसादालय – सोलर स्टिम कुकींग प्रोजेक्ट
०५. विद्युत विभाग – २.५ मेगावॅट पवन ऊर्जा प्रकल्प ( भोयरे पठार, जि.अहमदनगर)
०६. साईनाथ व साईबाबा रुग्णालय – सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प
०७. साईनाथ व साईबाबा रुग्णालय – लिक्वीड ऑक्सिजन प्लँन्ट
०८. बगीचा विभाग – १५ मे.टन क्षमतेचा घनकचरा विघटन प्रकल्प
( शिर्डी नगरपंचायत व राहाता नगरपरिषद यांचे संयुक्त विद्यमाने)
०९. साई आश्रम प्रकल्प भाग १ व २ – सोलर वॉटर हिटींग सिस्टीम
१०. साई आश्रम प्रकल्प भाग १ व २ – सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प

# आर्थिक निधी उपलब्धतेबाबत

विश्वस्तव्यवस्थेमार्फतभक्तांना पुरविणेत येणाऱ्या सेवा–सुविधांसाठी तसेच साईभक्तांच्या सोयीसाठी शिर्डी परिसरातील पायाभूत सुविधांच्या विस्तारीकरणासाठी व उभारणीसाठी भरीव आर्थिक सहाय्य करणेत येत आहे. श्री साईंचे महानिर्वाणास सन २०१८ मध्ये एक शतक पूर्ण होईल. त्यानिमित्त विश्वस्तव्यवस्थेमार्फत **सन २०१७–१८ हे श्री साईबाबा पुण्यतिथी शतक महोत्सवी वर्ष** आणि या शतकमहोत्सवी वर्षातील श्री पुण्यतिथी उत्सव ( विजयादशमी ) – २०१८ हा ''**शतक महोत्सवी पुण्यतिथी उत्सव**'' म्हणून साजरा करण्याचे प्रयोजन आहे.

या शतक महोत्सवी पुण्यतिथी उत्सवासाठी तसेच वर्षामध्ये, श्री क्षेत्र शिर्डी येथे श्रींचे दर्शनासाठी लाखो साईभक्त येतील. त्यासाठी भक्तांना निवास, प्रसाद भोजन, स्वच्छता गृहे, वाहतुक, दळणवळण, पाणीपुरवठा, विदयुत, वाहनतळे आदि मूलभूत सेवा–सुविधा उपलब्ध करुन देणे गरजेचे राहील. ज्याप्रमाणे दर १२ वर्षांनी देशातील चार शहरांमध्ये कुंभमेळा भरविण्यासाठी केंद्र व राज्य शासनातर्फे निधी उपलब्ध करवून, नियोजनबध्द विकास करणेत आलेला आहे / येत आहे. त्याच धर्तीवर शिर्डी शहर व त्या आसपासचे परिसराचा नियोजनबध्द विकास होणे गरजेचे व आवश्यक आहे. त्यासाठी नियोजनबध्द कार्यक्रमांतर्गत विविध पायाभूत सेवा–सुविधांचे विकास प्रकल्प राबविणेसाठी केंद्र व राज्य शासनामार्फत ''**श्री क्षेत्र शिर्डी तीर्थक्षेत्र विकास योजना**'' तयार करुन त्यासाठी आवश्यक निधी शासनामार्फत उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे. शतक महोत्सवी पुण्यतिथी उत्सव ०४ वर्षांनी साजरा करावयाचा असल्याने, सदर योजना तातडीने तयार करुन त्याची अंमलबजावणी शासन यंत्रणेमार्फत युध्दपातळीवर हाती घेणे गरजेचे आहे.

उपरोक्तप्रमाणे सन २०१३ –१४ या आर्थिक वर्षाचा प्रशासकीय व लेखापरिक्षण अहवाल आपले माहितीस्तव सादर करण्यात येत आहे.

स्वाक्षरीत /– X X X

**(राजेंद्र जाधव)**
**कार्यकारी अधिकारी**
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी.

**KOCHAR & ASSOCIATES**
**CHARTERED ACCOUNTANTS**
302, Swapnabhoomi, A-Wing,
S. K. Bole Road, Dadar (West),
Mumbai – 400 028.
Tel. Fax : 2437 9537/2422 9490
Email : info@kocharassociates.com,
Kochar_associates@yahoo.com
Web Site:www.kocharassociates.com

**TO THE MEMBERS OF THE MANAGEMENT COMMITTEE**
**SHRI SAIBABA SANSTHAN TRUST, SHIRDI**

We have audited the Balance Sheet of Shri Saibaba Sansthan Trust, Shirdi (Hereinafter referred to as "The Trust") as at 31st March, 2014 and the Income & Expenditure Account of the Trust for the year ended on that annexed thereto.

1. We have presented this audit report on generally accepted reporting format, considering the provisions of the Shri Saibaba Sansthan Trust (Shirdi) Act, 2004.
2. We have conducted our audit in accordance with auditing standard generally accepted in India. Those standards require that we plan and perform the audit to obtain reasonable assurance about whether the financial statement is free of material misstatement. An audit includes assessing the accounting principles used and significant estimates made by the Management, as well as evaluating the overall financial presentation. We believe that our audit provides a reasonable basis for our opinion.
3. Further to our comments in the Audit Report and Schedules including annexure enclosed herewith, we report that:
   a) We have obtained all the information and explanation which to the best of our knowledge and belief are necessary for the purpose of our audit.
   b) In our opinion, proper books of accounts as required by Law, have been kept by the trust so far as appears from our examination of such books.
   c) The Balance Sheet and the Income & Expenditure Account referred to in this report are in agreement with the books of accounts.
   d) In our opinion, the Income & Expenditure Account and the Balance Sheet comply with Generally Accepted Accounting Standards.
   e) In our opinion and to the best of our information and according to the explanations given to us, the said Balance Sheet and the Income & Expenditure Account read together with the notes thereon give a true and fair view:-
      i) In so far as it relates to the Balance Sheet of the state of affairs on the Trust as at 31st March, 2014

      And

      ii) In so far as it relates to the Income & Expenditure Account of the surplus of the Trust for the year ended on that date.

**For KOCHAR & ASSOCIATES**
**CHARTERED ACCOUNTANTS**
**Firm Regn. No : 105256W**

**PLACE : SHIRDI**
**DATE : 26/09/2014**

**(CA YAGNESH C. DALAL)**
**PARTNER**
**M. No.: 035619**

## अ) एकुण उत्पन्न, खर्च व गुंतवणूक दर्शविणारा तुलनात्मक तक्ता

(रु. कोटी मध्ये)




## ब) देणगी रुपाने मिळालेल्या उत्पन्नाचा तक्ता



## क) साईभक्तांना पुरविल्या जाणाऱ्या सोयी सुविधांवर झालेल्या खर्चाचा तुलनात्मक तक्ता

(रु. कोटी मध्ये)



**KOCHAR & ASSOCIATES**
**CHARTERED ACCOUNTANTS**
302, Swapnabhoomi, A-Wing,
S. K. Bole Road, Dadar (West),
Mumbai – 400 028.
Tel. Fax : 2437 9537/2422 9490
Email : info@kocharassociates.com,
Kochar_associates@yahoo.com
Web Site:www.kocharassociates.com

To,
The Management Committee,
Shri Saibaba Sansthan Trust (Shirdi),
Shirdi, Tal – Rahata,
Dist - Ahmednagar.

Sirs,

**Sub:- Submission of Statutory Audit Report and Certified Copies of Financial Statements of the Year 2013-2014.**

With reference to letter of appointment issued by State Government vide letter No. O/W No.Account-2014/320/Letter No. 50/KA 16 dated. 01/09/2014, we have conducted & completed the Statutory Audit of Shree Saibaba Sansthan Trust, Shirdi based on books of accounts maintained with the help of “Tally” software and produced before us for verification and explanations given to us from time to time.

**Our observations on the working of the Sansthan are as under:-**

Management and administration of the Sansthan is governed by the Management Committee constituted by the Government of Maharashtra in terms of section No.5 & 7 of Shree Sai Baba Sansthan Trust (Shirdi) Act, 2004 (Maharashtra Act, XIV of 2004) w.e.f.17th August, 2004 and Shree Sai Baba Sansthan Trust (Shirdi) (Amendment) Act, 2004 w.e.f. 23rd August 2004.

As per order dated 13th March 2012 of Hon. High Court of Judicature at Bombay, Bench of Aurangabad in Public Interest Litigation No. 18 of 2011, all the affairs of “Shree Sai Baba Sansthan Trust, Shirdi” are supervised, maintained and looked after by committee consisting of

(A) The Principal District Judge, Ahmednagar.
(B) The Collector, Ahmednagar.
(C) The Chief Executive Officer of Shree Sai Baba Sansthan Trust Shirdi.

From 30th March 2012 until the State Government constitute a new Committee.
After the above order the State Government has appointed new committee vide order No. SST-2011/175(22) Desk-16 dated 27.03.2012

Then again Hon. High Court issued order on 30.03.2012 in Public Interest Litigation No. 27 of 2012 and further directed that until further orders passed by the said court, the affairs of the said "Shree Sai Baba Sansthan Trust, Shirdi" Dist. Ahmednagar shall be looked after and managed by the committee appointed by the said court vide judgment and order dated 13.03.2012 in Public Interest Litigation No. 18 of 2011.

1. **Last Statutory Audit :-**

Statutory Audit for the year 2012-13 was conducted by our firm and Audit Report was submitted to Sansthan on 16.09.2013, The said report was adopted by the Committee vide. Resolution 698 date 17.09.2013 Compliance Report to the said Statutory Audit Report was placed before Management Committee the same was adopted vide Resolution 388dt. 05.06.2014.

2. **Internal Audit :-**

Internal Audit and Pre Audit of the Sansthan for the year 2013-14 were entrusted to the following firms of Chartered Accountants.

| Name Of The Firm | Type Of Audit | Type Of Audit |
|---|---|---|
| Suresh Daule & Associates | Internal Audit (Sansthan) | Internal Audit |
| M/S Abhay Shastri & Associates, Pune | Pre Audit (sansthan) | Pre Audit |
| S. L. Kulkarni Chartered Accountants, Ahmednager | Internal Audit | Internal Audit (Hospital) |
| V.V.Kothari Chartered Accountants, Shrirampur | Pre Audit | Pre Audit (Hospital) |
| Shankar Andani Chartered Accountants, Ahmednagar | Tax Consultant Center's Audit | Tax Consultant (Sansthan + Hospital) |
| Amol Datar Chartered Accountants, Pune | | Center's Audit Information |
| Santosh Bhutda & Co, Chartered Accountants, Nashik | Rajiv Gandhi Scheme | Audit of Rajiv Gandhi Scheme |
| N.P.Redij, Mumbai& Co. Chartered Accountants, Mumbai | Internal Audit | Internal Audit Mumbai Office & Foreign Currency. |

In our previous three reports, we had suggested formation of "Audit Committee" in pursuance of section 17(2) (i) of Shree Sai Baba Sansthan Trust (Shirdi) (Amendment) Act, 2004. Appointment of professionals on the Committee would help monitoring the functioning of the Sansthan.

# SCRUTINY OF BALANCE SHEET

**LIABILITIES :-**

1. **Trust Corpus ....... Rs. 48,82,52,868.64**
   There is no change in the Trust Corpus Amount.

2. **Other Earmarked Funds ......... Rs. 5,38,63,08,840.06**
   During the scrutiny of operations in various fund accounts during the year 2013-14, we observed as under:

- **Annadan Fund :-**
  The opening balance in the fund stood at Rs 1,24,76,89,946.22/-which was increased by further donation of Rs 18,62,73,205.25/- during the year. Sansthan has transferred Rs 30,49,252/- from Nitya Prasadalaya Annadan Yojana to Annadan Fund & spent Rs 14,14,46,664.64 /- leaving a balance of Rs 1,40,78,57,833.99/-

- **Devotional Objects Fund :-**
  An amount of Rs 1,59,67,722.93 is spent during the year.

- **Maintenance/Repair & Establishment Fund :-**
  The opening balance in the fund stood at Rs 77,25,74,459.33 /- which was increased by further donation of Rs 28,11,45,741.08/- during the year. The closing Balance stood at Rs 1,12,32,51,901.75/-

- **Nitya Prasadalaya Annadan Yojana :-**
  The opening balance of Rs 30,49,252/- is transferred to Annadan Fund. Considering the influx of donation and funds lying with Sansthan for this noble cause, Sansthan should consider, lowering of the recoveries/free distribution of Prasad.

- **Permanent Fund :-**
  Accumulated balances under this account need to be utilized.

3. **Management Fund … … Rs 22,69,79,009**
   As against accumulation of Rs.58,15,01,904/- in the said Fund a sum of Rs. 35,45,22,895/- was utilized up to 31.03.2014 as per provisions of Section 22(3) of The Shree Sai Baba Sansthan Trust (Shirdi) Act, 2004.

4. **Depreciation Reserve … … Rs. 1,69,51,28,964.08**
   Depreciation Reserve represents accumulated Depreciation of Assets up to 31st March, 2014 excluding depreciation of Assets discarded in the year under review.

- Fixed Assets were depreciated at the rates considered appropriate by the Sansthan. There is no change in the rates of depreciation.
- In case of a net block of as asset reducing below 5% of the gross block, the depreciation is restricted so as to keep the net block at 5% of Original cost.

**5. Gratuity Reserve … … Rs. 36,29,99,548**

- As against accumulation of Fund of Rs. 36,29,99,548/- Sansthan had invested Rs.33,20,87,684/- with Group Gratuity Scheme of Life Insurance Corporation of India, Pune Divisional office, Thus there is a shortfall of Rs.3,09,11,864/- in Investments up to 31.03.2014 which should be made good at the earliest.
- During the year under review, a sum of Rs. 7,78,20,261/- is transferred to Gratuity Reserve based on the actual valuation and not as per actuarial valuation.

**6. Liabilities … … Rs. 38,23,66,745.48**

- Liabilities referred above include Deposits refundable, Creditors for Expenses and Creditors for Supplies as on 31st March, 2014. Balances under these Accounts are subject to confirmation.
  Further, age wise classifications of Deposits Refundable/ Other Deposits would help better monitoring of Funds.
- List of Liabilities for Expenses was available for inspection.

**7. Provident Fund Fluctuation Fund … … Rs 23,94,550.27**

This amount reflects contribution collected from staff members and contribution from Sansthan. This amount represents the excess over the amount transferred to Provident Fund Commissioner should be earmarked in separate investment and be utilized for staff welfare.

**8. Income and Expenditure Account. Rs. 10,24,68,78,590.34**

During the year under review, surplus of Rs. 1,88,64,08,663.29/- is credited to Income and Expenditure Appropriation Account.

**ASSETS :-**

**1. Land at Cost ....... Rs. 57,49,75,979.41**
**2. Buildings and Roads at Cost ....... Rs. 2,36,61,33,646.16**
**3. Buildings under Constructions .......**

- We have verified the Title Deeds and other Documents of the Land purchased during the year under review and found the same in order.
- The trust has filed suit against the property owners for possession of land admeasuring 3 Hectare 87 Are. The total cost of land Rs. 5,45,70,000/-, including the area not under possession, is capitalized and the matter is pending before the Court. (Survey no. 55/15 & Survey no. 125/6, 7, 8)

**4. Other Fixed Assets … Rs. 1,73,56,67,567.49**

"Other Fixed Assets" include Advance of Rs.1 crore was paid to State government for Water Supply Scheme of Shirdi Sansthan/Kankuri/Pimpalwadi.

State Government agreed to lease out the Scheme on Long Term basis for 2 villages and Shirdi Sansthan vide order dt.8th July, 2004 for which agreement among Shirdi Sansthan/Kankuri/ Pimpalwadi/Zillah Parishad, Ahmednagar should be executed at the earliest. The said expenditure should have been booked under "Capital Work in Progress".

- **Investments … Rs. 10,98,56,83,150.00**
- Details of Investments of Sansthan were as under as on 31.03.2014.

| Particulars | Amount |
|---|---|
| Fixed Deposits with Nationalized Banks | 10,98,56,83,150 |
| **Total:** | **10,98,56,83,150** |

Investments referred above are verified by us during the course of audit.

5. **Ornaments and Jewellery (At Cost) … Rs.74,31,36,557.76**
- Ornaments and Jewellery represents stock of Gold, Silver, Silver and Gold Coins, Gold Pendants, Copper & Brass items and Precious Stones/Other valuables.
- Stock of Gold & silver Articles/Ornaments with the Mandir Department should be weighted through Gold Smiths at the end of each year. These facts are reported in detail in the Audit Report of Departments issued separately.

6. **Stock of Consumables … Rs. 17,25,91,659.48**

Consumable Stock Items with various Departments (Refer Schedule G) were physically verified by Head of the Departments as on 31.03.2014 and certified by the Internal Auditors. Certified Copies were obtained for our inspection.

7. **Advances, Deposits & Receivables … Rs. 1,511,761,330.91**
- Balances of Advances, Deposits and Receivables were subject to confirmation as on 31.03.2014

8. **Bank Balances … Rs. 25,69,06,078.89**
- We have verified the reconciliation Statements of various banks maintained by the Sansthan wherein no long pending entries were noticed.

9. **Cash in Hand … Rs. 9,76,256.05**

**Foreign Currency on hand … Rs. 25,60,007**
- We supervised the “Hundi Counting” as on 12.09.2014 conducted by the staff of the Sansthan. Cash collections of Rs. 1,12,07,585 were received from Charity Boxes/Hundis on the above date. Similarly Donations in kind received through Hundis mentioned below were also verified by the Staff of the Sansthan and supervised by us. The same was found in order.

| Sr. No. | Type of Donation | Weight (in gms) | Amount (Rs) |
|---|---|---|---|
| 01. | Gold | 101.400 | 2,20,415 |
| 02. | Silver | 1619.800 | 53,142 |
| 03. | Clothes | | 7,614 |
| 04. | Copper & Brass | | 696 |
| 05. | Others | | 1,598 |

| | Quantity | Weight (in gms) |
|---|---|---|
| Valuable Stones | 38 | 15,230 |

We also verified Foreign Currency received through Hundi on even date and found the same in order.

## SCRUTINY OF INCOME AND EXPENDITURE ACCOUNT

**INCOME:**

**01.** During the year under review, Sansthan has earned income amounting to Rs. 3,47,27,16,209.19 by way of Rent, Interest on Saving Bank Accounts and Investments, Donations and Income from other sources and Profit on sale of Assets as against a sum of Rs. 3,33,07,70,609.32/- earned in the year 2012-13

**EXPENDITURE:**

**01.** During the year under review deficit of Rs. 6,65,23,854/- on Education Activities was adjusted to accumulated balance of Education Fund. Details of the same shown in 'Schedule N' reproduced below:

| Institution | Income(Rs.) | Expenses(Rs.) | Deficit(Rs.) |
|---|---|---|---|
| ITI | 39,73,953 | 2,92,73,426.45 | (2,52,99,473.45) |
| EMS | 84,02,237 | 2,26,21,954 | (1,42,19,717) |
| KVM | 4,155 | 1,19,36,613 | (1,19,32,458) |
| JC | 8,46,019 | 1,59,18,255 | (1,50,72,206) |
| | | **Total : -** | **(6,65,23,854.45)** |

- Deficit amounting to Rs. 12,17,80,809.83/- (Ref. Schedule O) after setting of the accumulated fund balance with Medical Fund have been considered as Expenditure on Objects of the Trust.

2. Details of Expenses towards Management Fund as in 'Schedule K' reproduced below:

| Particulars | Amount(Rs.) |
|---|---|
| Salaries & Allowances to Staff | 35,40,14,222 |
| Board Meeting Expenses | 1,660 |
| Traveling Expenses | 5,07,013 |
| **Total : -** | **35,45,22,895** |

As against above expenditure, contribution to Management Fund was calculated and brought into account of Rs. 45,63,48,060/- as per provisions of 22(2) of Shree Sai Baba Sansthan Trust (Shirdi) (Amendment) Act, 2004, leaving surplus of Rs. 22,69,79,009/-

3. The Charity on account of concessions in Medical bills to poor/needy patients of Rs. 5,11,15,944/- and Financial Aid for Life Saving Operations of Rs. 8,12,91,706/- aggregating to Rs. 13,24,07,650/- through Sainath and Saibaba Hospital was treated as revenue expenditure & shown under "Schedule M for Grant in Aid (Charity)".
It is pertinent to note that Expenditure and Income of Educational Institutions (KVM, EMS, I.T.I. and Junior College) and Hospital (Sainath/Saibaba) is not considered while calculating the expenditure towards Management Fund as the same are considered as the activities of the Sansthan.

**General:**

During the year under review, Sansthan had received 256 applications under Right to Information Act 2005, which have been responded by Sansthan.
We thank the Members of the Management Committee, the Executive Officer, the Deputy Executive Officer and other staff of the Sansthan for the co-operation extended to us while conducting the audit.

**For KOCHAR & ASSOCIATES**
**CHARTERED ACCOUNTANTS**
**FIRM REGN. No: 105256W**

**PLACE : SHIRDI**
**DATE : 26/09/2014**

**(CA YAGNESH C. DALAL)**
**PARTNER**
**MEMBERSHIP No.:-035619**

# SHRI SAIBABA SANSTHAN TRUST, SHIRDI (REGISTRATION No:- E-69,AHMEDNAGAR) BALANCE SHEET AS AT 31st MARCH, 2014

| PREVIOUS YEAR | FUNDS AND LIABILITIES | SCH | | CURRENT YEAR |
|---|---|---|---|---|
| | **TRUST CORPUS:** | | | |
| 488,252,868.64 | Balances as per Last Balance Sheet | | 488,252,868.64 | 488,252,868.64 |
| 3,687,446,663.06 | **OTHER EARMARKED FUNDS** | A | | 5,277,479,641.34 |
| | **MANAGEMENT FUND** | | | |
| 125,153,844.00 | Balances as per Last Balance Sheet | | 125,153,844.00 | |
| | Transfer from Income & Expenditure Account | | 456,348,060.00 | |
| | | | 581,501,904.00 | |
